रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

## चार दिवस अतिवृष्टीचा इशारा

**मुंबई :** रायगड जिल्ह्यासह कोकण आणि राज्यातील अनेक भागांत पुढील चार दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) दिला आहे. रायगडसह ठाणे, पालघर, रत्नागिरी, मुंबई आणि घाटमाथ्यावरील भागांसाठी विविध स्तरांचे इशारे जारी करण्यात आले असून, पुढील ४८ तास विशेष सतर्कता बाळगण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. नागरिकांनी अत्यावश्यक नसल्यास प्रवास टाळावा तसेच प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पाहिजेत
रिसॉर्टमध्ये कामासाठी एका जोडप्याची आवश्यकता आहे. ठिकाण - सासवणे.
संपर्क : ९६०७१०२३५७

रायगड | शुक्रवार । दि. २४ जुलै २०२६ । अंक ४८ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹ | । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## आज देशभरात हाक सीजेपीची

# धग आंदोलनाची

**दिल्लीत विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेल्या अमानुष लाठीहल्ल्यानंतर देशभरात संतापाची लाट उसळली आहे. विद्यार्थ्यांवरील या हल्ल्याचे पडसाद आता महाराष्ट्रासह विविध राज्यांत उमटू लागले असून, शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना ठाकरे गट, मनसे, काँग्रेस, विद्यार्थी संघटना आणि सामाजिक संघटनांनी रस्त्यावर उतरून सरकारविरोधात एल्गार पुकारला आहे. विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळणाऱ्या अकार्यक्षम केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, या मागणीवर विद्यार्थी ठाम आहेत. त्यासाठी कायदेशीर लढ्याची घोषणा करण्यात आली असून, कॉकरोच जनता पार्टीकडून शुक्रवारी (दि.२४) देशव्यापी आंदोलनाची हाक देण्यात आल्याने हा संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत.**

## भरपावसात पनवेल दणाणले!



- **नीटप्रकरणी शेकाप-मनसे-वंचितचा एल्गार**
- **विद्यार्थ्यांचा न्यायासाठी आक्रोश**

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

नीट प्रवेश प्रक्रियेतील कथित गोंधळ आणि विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसाठी पनवेलमधील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शेतकरी कामगार पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जोरदार आंदोलन करण्यात आले. मुसळधार पावसाची पर्वा न करता शेकडो विद्यार्थी, पालक आणि कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाल्याने चौक घोषणांनी दणाणून गेला.

हातातविविधमागण्यांचेफलक घेऊन आंदोलनकर्त्यांनी शासन आणि संबंधित यंत्रणांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ थांबवावा, नीट प्रवेश प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता आणावी, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि विद्यार्थ्यांना तातडीने न्याय मिळावा, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

पाऊस पडत असतानाही आंदोलनकर्त्यांचा उत्साह कमी झाला नाही. ''विद्यार्थ्यांना न्याय मिळालाच पाहिजे'', ''भवितव्याशी खेळ पान ५ वर

### विद्यार्थ्यांसाठी अण्णा मैदानात

नवी दिल्लीच्या जंतर-मंतरवरील विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर समाजसेवक अण्णा हजारे यांनी गुरुवारी मौन आंदोलनाला सुरुवात केली आहे. त्यांनी सकाळी अहिल्यानगरमधील वाडिया पार्क येथील गांधी स्मारकात आंदोलनाला सुरुवात केली. आंदोलनाआधी त्यांनी सरकारकडून दडपशाही नव्हे, तर संवाद हवा, अशी भूमिका बॅनरच्या मार्फत स्पष्ट केली. सरकारने संवाद साधून प्रश्न सोडवायला हवेत, अशी मागणीदेखील त्यांनी केली.



## देशभरात रस्त्यावर उतरणार विद्यार्थी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी) ने आज (दि. २४) देशभरातील सर्व जिल्ह्यांमध्ये शांततापूर्ण आंदोलन करण्याचे आवाहन केले आहे. अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या आंदोलनात विद्यार्थी, युवक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले असून, 'एक जिल्हा... एक दिवस... एकच मागणी' या घोषवाक्यासह देशव्यापी एल्गार पुकारण्यात आला आहे.

सीजेपीने समाजमाध्यम एक्सवर डिजिटल पत्रक प्रसिद्ध करून आंदोलनाची घोषणा केली आहे. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यात एकाच दिवशी शांततापूर्ण निदर्शने करण्यात येणार असून, नीट पेपरफुटी प्रकरण, विद्यार्थ्यांच्या विविध मागण्या आणि केंद्रीय पान ५ वर

## मुद्रांक कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाला यश

### सह दुय्यम निबंधक रवींद्र कोळी हल्लाप्रकरणी आरोपींना पोलिसांकडून अटक




**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

पुणे येथील सह दुय्यम निबंधक रवींद्र कोळी यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याच्या निषेधार्थ राज्यभर सुरू करण्यात आलेल्या नोंदणी व मुद्रांक विभागाच्या बेमुदत कामबंद आंदोलनाला अखेर यश आले आहे. पोलिसांनी हल्लाप्रकरणातील आरोपींना ताब्यात घेऊन अटक केल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले असून, विभागाचे नियमित कामकाज पुन्हा सुरू झाले आहे.

पुणे येथे शासकीय कर्तव्य बजावत असताना सह दुय्यम निबंधक रवींद्र कोळी यांच्यावर काही जणांनी जीवघेणा हल्ला करून अमानुष मारहाण केली होती. घटना घडून अनेक तास उलटूनही आरोपींवर गुन्हा दाखल न झाल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली होती. संघटनेच्या पाठपुराव्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला असला तरी आरोपींना संरक्षण मिळेल अशा स्वरूपाचे कलम लावल्याचा आरोप संघटनेकडून करण्यात आला होता.

या पार्श्वभूमीवर राज्यभरातील नोंदणी व मुद्रांक विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले. रायगड जिल्ह्यातही पान ५ वर

> सह दुय्यम निबंधक रवींद्र कोळी यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्यानंतर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला होता. शासनाने तातडीने दखल घेऊन न्याय्य कारवाई करावी, या मागणीसाठी आम्ही २० जुलैपासून कामबंद आंदोलन सुरू केले होते. आरोपींना पोलिसांनी अटक केल्यानंतर आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला असून, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत शासनाने कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक आहे.
>
> – विक्रांत आंब्रस्कर, जिल्हाध्यक्ष, नोंदणी व मुद्रांक विभाग अराजपत्रित अधिकारी व कर्मचारी संघटना, रायगड.

### दुचाकीच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलमधील कुंडेवहाळ बसस्थानकाजवळ भरधाव वेगाने जाणाऱ्या दुचाकीने रस्त्याने चालत जाणाऱ्या दोघांना धडक दिली. या अपघातात ३५ वर्षीय व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू, तर त्याचा सहकारी गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात मरण पावलेल्या व्यक्तीचे नाव राजुकुमार बिंद (३५) तर जखमी झालेल्या त्याच्या मित्राचे नाव चंदलाल राममल्हार बिंद (३०) असे आहे. चंदलाल बिंद व त्याचा मित्र राजुकुमार बिंद हे दोघे ओव्हळे येथून कुंडेवहाळच्या दिशेने पायी जात होते. दोघेही कुंडेवहाळ बसस्थानक रस्त्यावर आले असताना मागून येणाऱ्या भरधाव मोटारसायकलने दोघांना जोरदार धडक दिली. याबाबतचा अधिक तपास पनवेल पोलीस करीत आहेत.

## करदात्यांच्या शंकांचे अलिबागमध्ये निरसन




- **नगराध्यक्षा अक्षया नाईक यांच्या पुढाकारातून जनजागृती कार्यशाळा**
- **तज्ज्ञांकडून टीडीएससह आयकर विषयांवर सविस्तर मार्गदर्शन**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

करदात्यांमध्येकरप्रणालीबाबत जागरूकता निर्माण करण्यासह टीडीएस आणि आयकरासंदर्भातील विविध शंकांचे निरसन करण्याच्या उद्देशाने आयकर विभागाच्या वतीने अलिबागमध्ये जनजागृतीपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. तज्ज्ञ अधिकाऱ्यांनी करदात्यांशीथेटसंवादसाधतविविध कर विषयांवर मार्गदर्शन केल्याने उपस्थितांकडून कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

अलिबाग नगरपरिषदेच्या सभागृहात ठाणे-पनवेल आयकर विभागाच्या टीडीएस शाखेतर्फे ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. पुणे येथील आयकर आयुक्त वैभव जैन आणि ठाणे येथील अतिरिक्त आयकर आयुक्त समृद्धी हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. पान ५ वर

## विद्यार्थ्यांवरील दडपशाही खपवून घेणार नाही




- **पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ल्याच्या विरोधात पुरोगामी विद्यार्थी संघटना आक्रमक**
- **न्यायालयीन लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

विद्यार्थी आंदोलन दडपण्यासाठी सरकार आणि पोलीस यंत्रणेकडून संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांवर गदा आणली जात असून, शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर बेकायदेशीर कारवाया, ताबे, गुन्हे दाखल करणे आणि देखरेखीच्या नावाखाली छळ केला जात असल्याचा गंभीर आरोप पुरोगामी विद्यार्थी संघटनेने केला आहे. विद्यार्थ्यांवरील कारवायांविरोधात कायदेशीर लढा अधिक तीव्र करण्यात येणार असून, प्रत्येक विद्यार्थ्याच्या घटनात्मक अधिकारांच्या संरक्षणासाठी शेवटपर्यंत संघर्ष सुरू राहील, असा इशाराही संघटनेने दिला.

मुंबई येथे आयोजित पत्रकार परिषदेत पुरोगामी विद्यार्थी संघटनेच्या ॲड. साम्या कोरडे, एआयएसएफचे कॉ. आमिर काझी, तसेच आंदोलक विद्यार्थ्यांची बाजू मांडणारे ॲड. विक्रांत खरे, ॲड. कल्याणी माणगावे, ॲड. गणेश पंडित, अरहत धिवरे आणि छात्रभारतीचे पान ५ वर

### पेपरफुटीप्रकरणी कथित सूत्रधाराला क्लीन चिट

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

देशभरात गाजलेल्या नीट-यूजी २०२४ पेपरफुटी प्रकरणातील कथित मुख्य सूत्रधार संजीव कुमार उर्फ संजीव मुखिया याला केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) क्लीन चिट दिली आहे. प्रश्नपत्रिका चोरी किंवा वितरणात त्याचा थेट अथवा अप्रत्यक्ष सहभाग असल्याचे कोणतेही पुरावे तपासात आढळले नसल्याचे सीबीआयने स्पष्ट केले आहे. पान २ वर

## नागपूरमध्ये रणकंदन

**। नागपूर । प्रतिनिधी ।**

दिल्लीतील विद्यार्थी झालेल्या आंदोलनादरम्यान लाठीचार्जच्या पडसादाने बुधवारी नागपूरचे राजकीय वातावरण तापले. पेपरफुटी, शिक्षण व्यवस्थेतील सुधारणांची मागणी आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून संविधान चौकात विद्यार्थी, युवक आणि विविध संघटनांनी स्वयंस्फूर्त आंदोलन करीत सरकारविरोधात घोषणाबाजी केली. त्याचवेळी काँग्रेसने लोकभवनावर मोर्चा काढत घुसण्याचा प्रयत्न केल्याने पोलिसांशी झटापट झाली. दुसरीकडे भाजयुमोने काँग्रेस कार्यालयासमोर राहुल गांधी यांच्या निषेधार्थ आंदोलन केले. रात्री ११ वाजताच्या दरम्यान संविधान चौकात पुन्हा वादाची ठिणगी पडली. पोलिसांनी आंदोलकर्त्या युवकांची धरपकड केली. आंदोलनाची पान ५ वर

## विद्यार्थ्यांवरील लाठीहल्ल्याचा निषेध

### काँग्रेसचे रस्त्यावर उतरून सरकारविरोधात आंदोलन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

दिल्लीतील जंतर-मंतर येथे नीट पेपरफुटी प्रकरणी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ तसेच काँग्रेस नेते राहुल गांधी यांना दिलेल्या कथित वागणुकीविरोधात गुरुवारी अलिबागमध्ये काँग्रेसने जोरदार शक्तिप्रदर्शन केले. काँग्रेस भवनातून काढण्यात आलेल्या मोर्चात कार्यकर्त्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत




विद्यार्थ्यांवरील कारवाईचा निषेध नोंदविला. मोदी हटाव आणि शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा द्यावा अशा पान ५ वर

## महाडमध्ये पोलिसांची कारवाई




**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड शहर पोलिसांनी अवैध मद्यविक्री आणि वाहतुकीविरोधात मोठी कारवाई करत १० लाख २४ हजार रुपयांचा बेकायदेशीर मद्यसाठा आणि एक चारचाकी वाहन जप्त केले. याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. २१ जुलै रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास आनंदनगर येथील ए-०१ बिर्याणी शॉपसमोर उभी असलेली एमएच-०६-सीयू-२६६८ क्रमांकाची काळ्या रंगाची अर्टिगा संशयास्पदरीत्या आढळली. गुप्त माहितीच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक गर्जे आणि त्यांच्या पथकाने वाहनाची झडती घेतली.

झडतीदरम्यान कोणताही वैध परवाना नसताना वाहतूक करण्यात येत असलेल्या रॉयल स्टॅग डिलक्स व्हिस्की आणि टुबर्ग प्रिमियम बिअरच्या बाटल्या व बॉक्स मोठ्या प्रमाणात आढळून आले. पान ५ वर

### पन्नास हजारांची लाच पडली महागात

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

इलेक्ट्रीकल्स कंपनीच्या कामाचा सुसाध्यता अहवाल देण्यासाठी ५० हजार रुपयांची लाच मागण्यात आली. महावितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता यांना ही लाच महागात पडली. नवी मुंबई येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने छापा टाकून लाच घेताना त्यांना रंगेहाथ पकडले. ही घटना गुरुवारी घडली असून, याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रोहित रेवानंद मोरे (३२) असे या लाचखोर अधिकाऱ्याचे नाव आहे. हा अधिकारी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये तळोजा येथे सहाय्यक अभियंता या पदावर कार्यरत आहे. इलेक्ट्रीक कंपनीच्या कामाचा सुसाध्यता अहवाल मिळविण्यासाठी पान ५ वर

## शेकाप वर्धापनदिनाच्या तयारीला वेग

### जिल्हाभर चिटणीस मंडळाचा दौरा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

२ ऑगस्ट रोजी खालापूर येथे होणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापन दिन सोहळ्याच्या तयारीला वेग आला असून, संपूर्ण रायगड जिल्ह्यात पक्षाच्या जिल्हा चिटणीस मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचा नियोजन दौरा सुरू झाला आहे. तालुकानिहाय सभा, बैठका आणि कार्यकर्त्यांशी थेट संवादातून वर्धापन दिनाची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली असून, या सोहळ्यास सुमारे १५ हजार कार्यकर्ते उपस्थित राहतील, असा विश्वास शेकापचे जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांनी व्यक्त केला.




शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली २ ऑगस्ट रोजी खालापूर येथे शेतकरी कामगार पक्षाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर कार्यक्रमाचे नियोजन आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यासाठी पक्षाच्या विविध आघाड्यांचे पदाधिकारी तसेच जिल्हा चिटणीस मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचा तालुकानिहाय दौरा सुरू करण्यात आला आहे.

या दौऱ्याची सुरुवात बुधवारी (दि. २२) पोलादपूर येथून झाली. त्यानंतर महाड, माणगाव, तळा आणि श्रीवर्धन तालुक्यांमध्ये बैठका घेण्यात आल्या. गुरुवारी (दि. २३) कर्जत, खालापूर, पेण, रोहा आणि मुरूड तालुक्यांचा दौरा करून विविध ठिकाणी सभा आयोजित करण्यात आल्या. पान ५ वर

### एक दिवस तरी वारी अनुभवावी उपक्रमातून दिंडी | विद्यार्थी, महिला, वारकरी, नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

## टाळ-मृदुंगाच्या गजरात अलिबाग विठ्ठलमय

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त अलिबागमध्ये विठ्ठलनामाच्या अखंड गजराने भक्तिमय वातावरण निर्माण झाले. उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था आणि माणुसकी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'एक दिवस तरी वारी अनुभवावी' या अनोख्या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विठ्ठलभक्ती, समाजसेवा आणि सामाजिक एकात्मतेचा सुंदर संगम घडविणाऱ्या या दिंडीत लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत शेकडो भाविक सहभागी होत अलिबागकरांनी प्रत्यक्ष वारीचा आनंद अनुभवला.



अलिबाग येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातून गुरुवारी (दि. २३) पहाटे भक्तिमय दिंडीला प्रारंभ झाला. टाळ-मृदंगाच्या गजरात, ज्ञानोबा-तुकाराम आणि विठ्ठल... विठ्ठल... जय हरी विठ्ठल या अखंड नामघोषाने परिसर दुमदुमून गेला. वरसोली येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दिंडीची सांगता झाली.

या दिंडीत रामनाथ मराठी शाळेतील सुमारे ४० ते ५० विद्यार्थ्यांसह लायन्स क्लबचे पदाधिकारी, विविध महिला बचत गटांच्या सदस्य, नागरिक, उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेचे कर्मचारी आणि असंख्य वारकरी भक्त मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. कार्यक्रमाला धर्मादाय आयुक्त राजेश इंगोले, डॉ. कोकणे, जागृती फाऊंडेशनच्या जागृती बेलेकर, लायन्स क्लबचे प्रतिनिधी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभली.

वारीत सहभागी झालेल्या भाविकांसाठी जागृती फाउंडेशनच्या जागृती बेलेकर यांच्या वतीने पिण्याचे पाणी, चहा, नाश्ता तसेच आवश्यक साहित्याची व्यवस्था करण्यात आली. अनेक वारकऱ्यांना कुर्ते आणि सदरे वाटप करून सेवाभावाचे दर्शन घडविण्यात आले.

या संपूर्ण उपक्रमाचे आयोजन उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा उज्ज्वला चंदनशिव-चव्हाण, माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान, उपाध्यक्ष महेंद्र पाटील आणि खजिनदार पान ५ वर

# रेल्वे क्रॉसिंगवरील उड्डाणपूल धोकादायक



। उरण । प्रतिनिधी ।

सिडकोने बोकडविरा रेल्वे क्रॉसिंगवर उभारलेला उड्डाणपूल खचत असल्याचे वास्तव समोर येत आहे. तरी धोकादायक बनू पाहात असलेल्या सदर उड्डाणपूल पुलाची पाहणी सिडको, रेल्वे व्यवस्थापक, खा. श्रीरंग बारणे, आ. महेश बालदी तसेच संबंधित प्रशासनाने करुन उपाययोजना करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

तालुक्याचे औद्योगिकीकरण व नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे येथील वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यासाठी सिडको, जेएनपीए बंदर, केंद्र व राज्य सरकारने तालुक्यातील अनेक महत्त्वाच्या ठिकाणी रस्त्यांबरोबर उड्डाणपुलाची उभारणी केली आहे. परंतु, प्रशासनाच्या भ्रष्ट कारभारामुळे तालुक्यातील अनेक ठिकाणी रस्ते उड्डाणपूल खचल्याची घटना घडली आहे. त्यामुळे तालुक्यातील पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट संबंधित प्रशासनाकडून करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. मात्र, प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे आज सिडकोने बोकडविरा रेल्वे क्रॉसिंगवर उभारलेला उड्डाणपूल खचत असल्याचे वास्तव समोर येत आहे. तरी धोकादायक बनू पाहात असलेल्या सदर उड्डाणपूल पुलाची पाहणी सिडको, रेल्वे व्यवस्थापक, खा. श्रीरंग बारणे, आ. महेश बालदी तसेच संबंधित प्रशासनाने करुन उपाययोजना करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

उरण तालुक्यातील पागोटे, जसखार येथील रस्ते, उड्डाणपूल खचल्याच्या घटना समोर येत असतानाच आता बोकडविरा रेल्वे क्रॉसिंगवरील उड्डाणपूल खचल्याचे वास्तव समोर येत आहे. तरी या रस्त्यावर अपघात होण्याचा संभव आहे. तरी प्रशासनाने अपघात होण्याची वाट न पाहता सदर उड्डाणपुलाची पाहणी करून संबंधित प्रशासनाने दुरुस्तीचे काम हाती घ्यावे, नाहीतर अपघात झाला तर सर्व जबाबदारी ही संबंधित प्रशासनाची राहील, असा इशारा भेंडखळ येथील सामाजिक कार्यकर्ते शिवाजी ठाकूर यांनी दिला आहे.

# खासगी सुरक्षा रक्षकांना ५५ टक्के आरक्षणाची मागणी

■ महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक श्रम कामगार युनियनचे शासनाला निवेदन

। पनवेल । प्रतिनिधी ।

राज्यातील सर्व खासगी सुरक्षा रक्षक मंडळांमधील मंजूर पदभरती प्रक्रियेत नोंदणीकृत व कार्यरत सुरक्षा रक्षकांना किमान ५५ टक्के अंतर्गत आरक्षण अथवा प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक श्रम कामगार युनियनने राज्य शासनाकडे केली आहे. युनियनचे रायगड जिल्हा सरचिटणीस विनायक चंद्रकांत गांधी यांनी उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या प्रधान सचिवांना यासंदर्भात सविस्तर निवेदन सादर केले आहे. निवेदनात महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ अंतर्गत कार्यरत सुरक्षा रक्षक अनेक वर्षांपासून अल्प वेतनात प्रामाणिक सेवा बजावत असून, त्यांना कामाचा प्रदीर्घ अनुभव असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

त्यामुळे मंडळांमधील लिपिक, निरीक्षक, सहाय्यक, कार्यालयीन कर्मचारी आदी पदांवरील भरतीमध्ये अनुभवी सुरक्षा रक्षकांना अंतर्गत आरक्षण किंवा प्राधान्य देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच किमान पाच वर्षे नियमित सेवा केलेल्या सुरक्षा रक्षकांना प्राधान्य, सेवाअनुभवानुसार अतिरिक्त गुण, विभागीय निवड प्रक्रियेद्वारे पदोन्नतीची संधी तसेच आवश्यकतेनुसार प्रशिक्षण व कौशल्यविकासाची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली आहे. अनुभवी सुरक्षा रक्षकांच्या सेवेला न्याय मिळावा, प्रशासनाची कार्यक्षमता वाढावी आणि त्यांच्या अनुभवाचा प्रभावी उपयोग व्हावा, यासाठी शासनाने या मागण्यांचा सकारात्मक विचार करून आवश्यक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक श्रम कामगार युनियनने व्यक्त केली आहे.

# माथेरान पायथ्याशी वादळी पावसाचा तडाखा

■ बेकरेवाडीतील अंगणवाडीचे छप्पर उडाले

■ अंगणसेविकेने स्वतःच्या घरात भरवली अंगणवाडी

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील माथेरानच्या पायथ्याशी असलेल्या बेकरेवाडी या दुर्गम आदिवासी वाडीत मुसळधार पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्याने मोठे नुकसान झाले. वादळी पावसामुळे येथील अंगणवाडीचे छप्पर उडून गेल्याने इमारत पूर्णपणे उघडी पडली असून, शिक्षण व्यवस्थेवरही त्याचा परिणाम झाला आहे.

मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या वादळीपावसात अंगणवाडीवरील पत्रे उडून गेली. ही घटना रात्री घडल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, सकाळी अंगणवाडी सेविका कामावर आल्यानंतर तिला छप्पर उडाल्याचे दिसून आले. रात्रभर झालेल्या पावसामुळे अंगणवाडीत पाणी शिरले होते. वर्गात सर्वत्र चिखल आणि पाणी साचल्याने लहान मुलांना बसण्यासाठीही जागा उपलब्ध नव्हती. या प्रतिकूल परिस्थितीतही मुलांचे शिक्षण खंडित होऊ नये, या हेतूने अंगणवाडी सेविकेने पुढाकार घेत स्वतःच्या राहत्या घरीच अंगणवाडी भरवली. तिच्या या संवेदनशील आणि कर्तव्यदक्ष भूमिकेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या घटनेमुळे दुर्गम आदिवासी भागातील अंगणवाड्यांची दयनीय अवस्था पुन्हा एकदा समोर आली आहे. पावसाळ्यात अशा प्रकारच्या घटना वारंवार घडत असल्याने लहान बालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. ग्रामस्थांनी संबंधित प्रशासनाकडे तातडीने अंगणवाडीची दुरुस्ती करून सुरक्षित इमारत उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. तसेच दुर्गम आदिवासी वाड्यांमध्ये मजबूत आणि पक्क्या अंगणवाड्या उभारण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात येत आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमीन मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक अशोक भास्कर म्हात्रे रा. चौल ता. अलिबाग, जि रायगड यांच्याकडून कायम विकत घेण्याबाबत आमच्या अशिलांनी व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| चौल ता.अलिबाग, जि.रायगड | १८३ | ०-११-०० | ०.१९ |

सदर वर नमूद केलेली शेती मिळकत हि या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेन्स्, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख २३/०७/२०२६

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर
पो. अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड.

विद्यमान मालक
अशोक भास्कर म्हात्रे



## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**खुली ई-निविदा आमंत्रण सूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडतर्फे वरिष्ठ विभागीय अभियंता, रत्नागिरी यांच्याकडून खालील कामासाठी खुली ई-निविदा आमंत्रित करण्यात येत आहे.

**अ.क्र.: 1. कार्याचे नाव**: एसएसई/विलवडे सेक्शन अंतर्गत आडवली-I व II बोगद्यांमध्ये डीप स्क्रीनिंग तसेच संपूर्ण स्लीपर नूतनीकरण. **निविदा क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2026-19, तारीख : 24.07.2026. अंदाजित खर्च**: रु. 61,35,490/-. **ईएमडी**: रु. 1,22,700/-. **ऑनलाइन निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ**: 18.08.2026 रोजी 15:00 वा. पर्यंत.

**अ.क्र. : 2. कार्याचे नाव**: एसएसई/चिपळूण सेक्शन अंतर्गत आगवे कटिंग व आष्टी बोगद्यात डीप स्क्रीनिंग तसेच संपूर्ण स्लीपर नूतनीकरण. **निविदा क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2026-20, तारीख: 24.07.2026. अंदाजित खर्च**: रु. 59,97,563/-. **ईएमडी**: रु. 1,20,000/-. **ऑनलाइन निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ**: 18.08.2026 रोजी 15:00 वा. पर्यंत.

**अ.क्र.: 3. कार्याचे नाव**: एसएसई/विलवडे सेक्शन अंतर्गत कि.मी. 284/450 ते कि.मी. 287/150 दरम्यान डीप स्क्रीनिंग तसेच संपूर्ण स्लीपर नूतनीकरण. **निविदा क्र.: केआर-आरएन-डब्ल्यू-2026-21, तारीख : 24.07.2026. अंदाजित खर्च**: रु. 1,47,01,781/-. **ईएमडी**: रु. 2,94,000/-. **ऑनलाइन निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ**: 18.08.2026 रोजी 15:00 वा. पर्यंत.

अधिक माहितीसाठी विभागीय रेल्वे व्यवस्थापक, कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. (संकेतस्थळ : **https://www.ireps.gov.in**)



## जाहीर प्रगटन
**मा. कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार उरण यांचे न्यायालय उरण, ता. उरण, जि.रायगड**

चौकशी अर्ज क्र. ४२४/२०२६

श्री. दिनेश डाळूराम जोशी, — अर्जदार
रा.पिरकोन, ता. उरण, जि. रायगड.

विरूद्ध

ग्रामपंचायत अधिकारी.
ग्रामपंचायत पिरकोन. — सामनेवाला
ता. उरण, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार श्री. दिनेश डाळूराम जोशी, यांनी मा. कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार उरण यांचे न्यायालयात त्यांच्या जन्माची नोंद उपलब्ध नसल्याने दिवस ठरवून मिळण्याकरीता अर्ज दाखल केलेला आहे. तरी दिनांक २७/०७/१९८४ रोजी राहत्या घरी मौजे. पिरकोन, ता. उरण येथे जन्म झालेला आहे असे अर्जात नमूद केलेले आहे. अर्जदार यांनी उक्त नोंद सामनेवाला यांच्या कार्यालयात होणेकरीता आदेश मिळणेकामी सदरचा अर्ज मा.न्यायालयात दाखल केलेला आहे.

तरी श्री. दिनेश डाळूराम जोशी, यांच्या जन्माच्या नोंदीबाबत कोणाचीही हरकत, घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून १५ दिवसाचे आत लेखी अथवा तोंडी हरकती मा. न्यायालयाकडे योग्य त्या पुराव्यासह सादर कराव्यात.

याव्दारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती प्राप्त झाल्या नाहीत तर श्री.दिनेश डाळूराम जोशी, यांच्या जन्माची नोंद सामनेवाला यांच्या कार्यालयास घेणेकामी त्यांना आदेश पारीत करणेत येतील. तद्नंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घेणेंत यावी.

आज दिनांक २१/०५/२०२६ रोजी में. कोर्टाच्या सही शिक्यानिशी देण्यात आली.

सही/-
**(डॉ.उध्दव कदम)**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार उरण**



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वरंडे, ता.अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचा विद्यमान मालक १)श्रीमती सुजाता हरिश्चंद्र नाईक २)श्रीमती सारीका सुरेश घरत यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे व बयाणा रक्कम ही अदा केलेली आहे.

मिळकतीचे वर्णन

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| वरंडे | १२८ | ०-२३-८० | ५.५८ |
| | | पो.ख.०-०१-५० | |
| | | ०-२५-३० | |

तसेच सदर मिळकतीमध्ये येण्याजाण्याकरीता मौजे वरंडे गट नं.१२६ क्षेत्र ० हे.३.५०आर आकार ०.०६ रूपये पैसे या मिळकती मधील ० हे.१.५ आर मिळकती मधून येण्याजाण्याकरीता निरंतर वहिवाटीचा रस्ता.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी तसेच श्री.संकेत गोविंद राऊत यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, अदलाबदल, कुळवहिवाट, कसवणुक या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील मागाहून मुदतीनंतर असलेली कोणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. २४/७/२०२६

सही/-
**ॲड. माधवी नारायण ठाकूर.**
सी- ३०१, 'क्लिफ हेवन'
को. ऑप. हा. सोसायटी,
स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बाजूला,
कोर्ट रोड, अलिबाग, रायगड, ४०२ २०१.



## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड

RDCC Bank Let's grow together ISO 9001:2008 BANK

जा.क्र. — दिनांक २२ जुलै २०२६

**नोटीस मसुदा**

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग या सहकारी संस्थेच्या सर्व संचालकांना सुचित करण्यांत येते की, आपल्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळातील बिगरशेती सह संस्था मतदार संघ, प्राथमिक कृषी/संयुक्त शेती/धान्यकोषसह संस्था मतदार संघ तळा, प्राथमिक कृषी/संयुक्त शेती/धान्यकोषसह संस्था मतदार संघ पेण, प्राथमिक कृषी/संयुक्त शेती/धान्यकोषसह संस्था मतदार संघ अलिबाग, प्राथमिक कृषी/संयुक्त शेती/धान्यकोषसह संस्था मतदार संघ उरण (इ.मा.प्र.) मतदार संघातील संचालक/संचालकांच्या निवडीकरीता अध्यासी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९ जुलै २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग, केंद्र कार्यालय चौथा मजला संचालक मंडळ सभागृह या ठिकाणी संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यांत आलेले आहे. सर्व संचालकांनी संचालक मंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यांत येत आहे. सभेत नैमित्तिकपणे रिक्त झालेली पदे निवडीसाठी खालील निवडणूक कार्यक्रमानुसार कामकाज करण्यांत येणार आहे.

**निवडणूक कार्यक्रम**

| अ.क्र. | तपशील | वेळ |
|---|---|---|
| १ | नामनिर्देशनपत्र वाटप व स्विकृती | सकाळी ९.०० ते दुपारी १०.०० |
| २ | नामनिर्देशनपत्र छाननी | सकाळी १०.०० ते सकाळी १०.३० |
| ३ | वैध नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिद्धी | सकाळी ११.०० |
| ४ | नामनिर्देशन पत्र माघार | सकाळी ११.०० ते सकाळी ११.३० |
| ५ | अंतिम उमेदवाराची यादी जाहीर करणे | सकाळी ११.३० |
| ६ | मतदान प्रक्रिया | सकाळी १२.०० ते दुपारी १२.३० |
| ७ | मतमोजणी प्रक्रिया | दुपारी १२.३० ते दुपारी १.०० |
| ८ | निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांबाबत निकाल घोषीत करणे. | दुपारी १.०० |

टिप :- निवडणूक कार्यक्रमातील वेळेत फेरबदल करण्याचे अधिकार अध्यासी अधिकारी यांचे राहतील.
अध्यासी अधिकारी यांचे मान्यतेने

दिनांक :- २२ जुलै २०२६ — सही/-
ठिकाण :- अलिबाग — **मुख्य कार्यकारी अधिकारी**



## जाहीर निविदा
**ग्रुप ग्रामपंचायत पाणसई**
**ता.माणगाव जि.रायगड**
**१५ वा वित्त आयोग अंतर्गत विकास कामांची व साहित्याची निविदा खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | ग्रा.प. कडे निविदा सादर करणेचा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक | कामाची मुदत | निधीचा स्रोत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | मुठवली तर्फे निजामपूर येथील स्मशानभूमी दुरुस्ती करणे | ७०००० | २००/- | ७००/- | ०३/०८/२०२६ सायं ०६.१५ वा | दि ०४/०८/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२७ | ग्रामनिधी |
| २) | कालवण येथील स्मशानभूमी दुरुस्ती करणे | ७०००० | २००/- | ७०१/- | ०३/०८/२०२६ सायं ०६.१५ वा | दि ०४/०८/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२७ | ग्रामनिधी |
| ३) | सिद्धार्थनगर स्मशानभूमी येथे पेव्हर ब्लॉक बसविणे | ७०००० | २००/- | ७०२/- | ०३/०८/२०२६ सायं ०६.१५ वा | दि ०४/०८/२०२६ सकाळी ११.३० वा | ३१ मार्च २०२७ | ग्रामनिधी |

**अटी व शर्ती :**
१) सदर निविदा बाबत अधिक माहिती ग्रामपंचायत पाणसई येथे कार्यालयीन वेळेत मिळेल
२) निविदा मंजूर व नामंजूर करण्याचा अधिकार हा प्रशासक तथा ग्रामपंचायत पाणसई यांचा राहील. निविदा नामंजूर झाल्यास कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
३) उपलब्ध निधीनुसार देयक आदा करणेत येईल
४) निविदा प्रशासक तथा ग्रामपंचायत पाणसई ता.माणगाव जि.रायगड या पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. निविदा बंद लिफाफ्यात पाठविण्यात याव्यात
५) देयकातून शासन निर्णयाप्रमाणे कपाती केल्या जातील.
६) अपूर्ण व उशिरा पोहोचलेल्या निविदांचा विचार ग्रामपंचायत करणार नाही
७) ठेकेदारांनी वर्क ऑर्डर दिलेल्या तारखेपासून मुदतीत काम पूर्ण न केल्यास कोणतेही कल्पना न देता ठेका रद्द करण्यात येईल.

**सही/-** — **सही/-**
**ग्रामपंचायत अधिकारी** — **सरपंच/प्रशासक**
**ग्रुप ग्रामपंचायत पाणसई** — **ग्रुप ग्रामपंचायत पाणसई**



## ग्रुप ग्रामपंचायत कुंभे
**ता. माणगाव, जि. रायगड**
**निविदा सूचना**

कुंभे ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत खालील कामाकरिता जास्तीत जास्त नोंदणीकृत इच्छुक ठेकेदाराकडू निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | काम पूर्ण करण्याचे कालावधी | निविदा सादर करण्याची अंतिम तारीख | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कुंभेवाडी येथे शौचालय बांधणे | १५ व वित्त आयोग | १२१३१३ | ३ महिने | ३०/०७/२०२६ | कार्यालयीन वेळे पर्यंत | ग्रा.प.कार्यालय कुंभे |
| २ | पार्टे यांच्या घराकडे जाणाऱ्या रस्त्याला पायऱ्या करणे | ग्रामनिधी | १५०००० | ३ महिने | ३०/०७/२०२६ | कार्यालयीन वेळे पर्यंत | ग्रा.प.कार्यालय कुंभे |
| ३ | सार्वजनिक ठिकाणी सोलर बसविणे | १५ व वित्त आयोग | १०११८५६ | ३ महिने | ३०/०७/२०२६ | कार्यालयीन वेळे पर्यंत | ग्रा.प.कार्यालय कुंभे |

**अटी व शर्ती**
१ १ टक्के इसारा रक्कम अंदाजपत्रकीय रक्कमेचा कार्यारंभ आदेश देण्यापुर्वी भरावी लागेल व उर्वरित कपात रक्कम देकातून अदा केली जाईल.
२ कोरे निविदा फॉर्म रक्कम रुपये १००% इतकी रहील
३ कामाचे अंदाज पत्रक व आराखडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील आवश्यक असल्यास शुल्क भरून त्याची प्रत उपलब्ध केली जाईल.
४ प्राप्त निविदा माहे ३१/०७/२०२६ मासिक सभेत ग्रामपंचायत कार्यालय कुंभे येथे उपस्थितांचा समक्ष मा. सरपंच यांचा हस्ते उघडण्यात येईल.
५ निविदा भरणाऱ्या ठेकेदारांचे रजिस्ट्रेशन केलेले दाखले हे सत्य प्रत केलेले असावेत व चालू आर्थिक वर्षात केलेल्या कामाचा समक्ष प्राधिकारायचा दाखला असावा व ठेकेदार हा नोंदणीकृत (GSTधारक) असावा
६ कोणतीही एक किंवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारायचा सरपंच कुंभे यांनी राखून ठेवला आहे
७ प्रत्येक देयककडून शासन नियमाप्रमाणे रक्कम कपात केल्या जातील संबंधित खात्याचे मा. अभियंता सो ग्रामपंचायतीचे पदाधिकारी/सदस्य याचा मार्गदर्शन व देखरेखी खाली सदर काम करण्याचे असून काम समाधानकारक नसेल तर ते त्यांची स्थिती थांबवून कार्यरंभ आदेश रद्द करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवले आहेत.
८ काम अंतिमरित्या पूर्ण झाले नंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
९ प्राप्त निधी नुसार PFMS प्रणाली द्वारे कामाचे देयक अदा केले जाईल

**ग्रामपंचायत अधिकारी** — **सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत कुंभे** — **ग्रुप ग्रामपंचायत कुंभे**
**ता. माणगाव, जि. रायगड** — **ता. माणगाव, जि. रायगड**



## जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे वारे, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकत त्या मिळकतीचे मालक यमुनाबाई मनोहर म्हसे रा वारे ता.कर्जत जि.रायगड पिन ४१०२०१, यांची खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे.वारे येथे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ४७ | १/ब | एकूण क्षेत्र २.९७.०० हे.आर.पॉ. | १.५५ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकत त्या मिळकतीचे मालक यमुनाबाई मनोहर म्हसे यांनी सदरची मिळकत ही कायमच्या खरेदीखताने आमचे आशिलास विकत देण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, तोंडी अथवा लेखी करार असल्यास तसेच या इसमाचा अगर संस्थेंचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र, फरोक्त, वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील तसेच मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दिनांक : २४/०७/२०२६

**ॲड.भारत अंकुश सांवत**
(बी.कॉम.एल.एल.बी)
पत्ता-मु.पो.मोठे वेणगाव
ता.कर्जत जि.रायगड
संपर्क क्रमांक-९५५२२९६६२२



## जाहीर नोटीस

सर्वांना या नोटीसने असे कळविणेत येते की, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी मौजे सहाण येथील, खालील वर्णनाची मिळकत श्रेयस देवदत्त वनारसे यांचे खुद्द मालकीची आहे.

| गट/सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र(हे. आर. पॉ.) | आकार(रू.-पै.) |
|---|---|---|---|
| ३० | १ | ०-१५-२ | ३-७१ |

ग्रामपंचायत सहाण घर क्रमांक ६०८ हे आर.सी.सी.बांधकामातील घर व स्विमिंग पूल यासह.

आमचे अशिलांनी सदर जमिन व घर मिळकत खरेदी करण्याबाबत विद्यमान मालकांबरोबर बोलणी चालू केली असून, सदर खरेदी व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी वर नमूद गट/सर्व्हे नंबर ३०/१ या मिळकतीमध्ये त्रयस्थ व्यक्तीची/बँकेची/पतसंस्थेची काही जडजोखीम असल्यास अगर कोणताही वाद असल्यास त्याची माहिती मिळिवण्याकरिता ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

तरी, मौजे सहाण येथील गट/सर्व्हे नंबर ३०/१ या मिळकतीमध्ये वर नमूद मालकाव्यतिरिक्त इतर कोणाचाही दान, गहाण साठेकरार, वहिवाट, अग्रहक्क, रक्कमेचा बोजा, पोटगी अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व आमचे अशीलांनी ठरविलेल्या व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर व्यवहार ठरवतील आणि पूर्ण करतील, त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

तारीख : २३/०७/२०२६ — सही/-
**ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे**
शांतादुर्गा को ऑप. हौसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग-रायगड.
मोबाईल: ९२७०१६२९२९



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

| मौजे | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| नागाव ता. अलिबाग | ३३९/३ | १२.००.०० | २४.०० |

वर वर्णन केलेली बिनशेती जमिन मिळकत व त्यावर असणारी ग्रुप ग्रामपंचायत नागाव मालमत्ता क्र. १४५४ ही घर मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत ही विद्यमान मालक श्री विकास मनोहर सावंत यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीत असल्याचा व कायदेशिर हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशीलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील सदरबाबत कोणताही व्यवहार ठरविणेपुर्वी खातरजमा करणेंसाठी हि जाहीर नोटीस देण्यात येत आहे. या नोटीसने सर्वांना असे कळिवण्यात येते की, वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती हया विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहेत व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असून ही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशील विद्यमान मालकांबरोबर व्यवहार ठरवतील व त्यानंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक २३/०७/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
लक्ष्मी नारायण, पहिला मजला,
गाळा नं. ७ व ८, ब्राम्हण आळी राम मंदिर
समोर, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१



## जाहीर प्रगटन
**मा. कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार उरण यांचे न्यायालय उरण, ता. उरण, जि. रायगड**

चौकशी अर्ज क्र. ४२५/२०२६

सौ. मानसी मनोज म्हात्रे (लग्नानंतरचे नाव) — अर्जदार
चारुशिला डाळूराम जोशी (लग्नाअगोदरचे नाव),
रा. चिरनेर, ता. उरण, जि. रायगड

विरूद्ध

ग्रामपंचायत अधिकारी, — सामनेवाला
ग्रामपंचायत पिरकोन,
ता.उरण, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की.

ज्याअर्थी अर्जदार सौ.मानसी मनोज म्हात्रे (लग्नानंतरचे नाव)/ चारुशिला डाळूराम जोशी (लग्नाअगोदरचे नाव), यांनी मा. कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार उरण यांचे न्यायालयात त्यांची जन्माची नोंद उपलब्ध नसल्याने दिवस ठरवून मिळण्याकरीता अर्ज दाखल केलेला आहे. तरी दिनांक ३०/०६/१९८७ रोजी राहत्या घरी मौजे. पिरकोन, ता. उरण येथे जन्म झालेला आहे असे अर्जात नमूद केलेले आहे. अर्जदार यांनी उक्त नोंद सामनेवाला यांच्या कार्यालयात होणेकरीता आदेश मिळणेकामी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

तरी सौ. मानसी मनोज म्हात्रे (लग्नानंतरचे नाव)/ चारुशिला डाळूराम जोशी (लग्नाअगोदरचे नाव), हीच्या जन्माच्या नोंदीबाबत कोणासही हरकत, घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून १५ दिवसाचे आत लेखी अथवा तोंडी हरकती मा.न्यायालयाकडे योग्य त्या पुराव्यासह सादर कराव्यात.

याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती प्राप्त झाल्या नाहीत तर सौ. मानसी मनोज म्हात्रे (लग्नानंतरचे नाव)/ चारुशिला डाळूराम जोशी (लग्नाअगोदरचे नाव), हीच्या जन्माची नोंद सामनेवाला यांच्या कार्यालयास घेणेकामी त्यांना आदेश पारीत करणेंत येतील. तद्नंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घेणेंत यावी.

आज दिनांक १६/०७/२०२६ रोजी में. कोर्टाच्या सही शिक्यानिशी देण्यात आली.

सही/-
**(डॉ,उध्दव कदम)**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार उरण**

# सुधागडात आंदोलकांची संतप्त घोषणाबाजी

■ विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जचा जाहीर निषेध

■ शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी



●(छायाचित्र: धम्मशील सावंत)

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

दिल्लीतील जंतरमंतर येथे सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा देत वंचित बहुजन आघाडीने दिलेल्या महाराष्ट्र बंदच्या हाकेला सुधागड तालुक्यासह रायगड जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्र बंदची हाक दिली होती. त्यांच्या आवाहनाला राज्यभरातून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे चित्र दिसून आले. सुधागड तालुक्यातही गुरूवारी (दि.२३) बंद शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला. तसेच, पाली, परळी आणि पेडली येथील बाजारपेठा बंद ठेवून व्यापारी, नागरिक तसेच विविध सामाजिक संघटनांनी आंदोलनाला समर्थन दर्शविले.

पेपरफुटी प्रकरण, शैक्षणिक व्यवस्थेतील गैरप्रकार आणि दिल्लीत आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्र बंदची हाक दिली होती. त्यांच्या आवाहनाला राज्यभरातून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे चित्र दिसून आले. या बंदमध्ये अनेक संघटना, संस्था, राजकीय पक्ष, विविध क्षेत्रातील मान्यवर, व्यापारी असोसिएशन, बहुजनवादी, लोकशाहीवादी व समताविचारांचे नागरिक सहभागी झाले होते. यादरम्यान, हातात तिरंगा ध्वज घेऊन ''भारतीय संविधानाचा विजय असो, लोकशाही जिंदाबाद'' असे म्हणत ''अरे या शिक्षणमंत्र्याचं करायच काय? खाली डोकं वर पाय'', अशी घोषणाबाजी करत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. यावेळी व्यापारी वर्गानेही स्वयंस्फूर्तीने दुकाने बंद ठेवून आंदोलनाला पाठिंबा दिला. यादरम्यान, परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

**दोषींवर कारवाई करण्याची मागणी**

सुधागड तालुक्यातील बंद शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने यशस्वी पार पडला. आंदोलनकर्त्यांनी विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे केंद्र सरकारने गांभीर्याने लक्ष द्यावे, शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार व गैरप्रकारांवर कठोर कारवाई करावी आणि विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी केली.

या बंदमध्ये वंचित बहुजन आघाडी जिल्हा संघटक राहुल गायकवाड, उपाध्यक्ष चंद्रकांत साळुंखे, अशोक वाघमारे, नारायण जाधव, स्वप्नील गायकवाड, आनंद जाधव, ऑल इंडिया पँथर सेना जिल्हाअध्यक्ष संदेश भालेराव, आवेश भालेराव, राजेश गायकवाड, नितिन गायकवाड, ओबिसी नेते ॲड. प्रवीण कुंभार यांच्यासह उदय धुमाळ, सुनील साठे, भावेश गायकवाड, नितेश गायकवाड, दिपक गायकवाड, निशांत गायकवाड, ॲड. सुशिल गायकवाड, अक्षय भालेराव, चेतन भालेराव स्वप्नील कदम, विनोद कदम, चंद्रकांत जगताप, मयूर गायकवाड, संतोष गायकवाड, दामोदर जाधव, भीमसेन गायकवाड, निवास सोनावले, नितिन वाघमारे, राकेश, शिर्के, प्रशांत जाधव, प्रशांत गायकवाड आणि प्रशांत गायकवाड आदिंसह युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पनवेलमध्ये तरुणाईचा एल्गार



। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

नीट परीक्षा प्रकरणातील कथित गैरव्यवहार तसेच दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिसांच्या लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने पुकारलेल्या महाराष्ट्र बंदला पनवेलमध्ये तरुणाईचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. छत्रपती शिवाजी महाराज चौकातून निघालेल्या मोर्चाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर जोरदार निदर्शने केली. यावेळी महाविद्यालयीन विद्यार्थी, तरुण-तरुणी आणि युवक मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते. हातात फलक घेऊन त्यांनी, विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, परीक्षेतील कथित गैरव्यवहाराची सखोल चौकशी करावी आणि विद्यार्थ्यांवरील पोलीस कारवाईचा निषेध व्यक्त केला. आंदोलनकर्त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर बळाचा वापर न करता संवादातून तोडगा काढण्याची मागणी केली. तसेच, शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकता आणि विद्यार्थ्यांचा विश्वास कायम ठेवण्यासाठी योग्य पावले उचलावीत, अशी भूमिका व्यक्त करण्यात आली.

## निवडक



### चौक शहर बंदच्या हाकेला प्रतिसाद

**चौक** : दिल्ली येथे आंदोलक विद्यार्थ्यांवर पोलिसांकडून करण्यात आलेला अमानुष लाठीचार्ज आणि मारहाणीच्या घटनेचा निषेध करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्यावतीने पुकारण्यात आलेल्या चौक शहर बंदच्या हाकेला व्यापाऱ्यांसह सर्व सुजाण नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. लोकशाही मार्गाने आपल्या मागण्या मांडणाऱ्या विद्यार्थ्यांवरील बळाचा वापर संतापजनक असल्याचा आरोप करत कार्यकर्त्यांनी या कारवाईचा तीव्र निषेध नोंदवला. या आवाहनाला पाठिंबा देत शहरातील व्यापारी संघटनेने मुख्य बाजारपेठ आणि व्यावसायिक प्रतिष्ठाने स्वयंप्रेरणेने बंद ठेवल्याने सकाळपासूनच अत्यावश्यक सेवा वगळता सर्व व्यवहार ठप्प झाले होते. यावेळी चौक पोलीस प्रशासनाच्यावतीने मोलाचे सहकार्य केले. संपूर्ण शहरात पूर्णपणे शांततामय वातावरणात कडकडीत बंद पाळण्यात आला असून, अन्यायाविरुद्ध एकत्र येत चौक शहराने दाखवलेल्या या एकजुटीबद्दल वंचित बहुजन आघाडी व आयोजकांच्या वतीने व्यापारी, व्यावसायिक आणि सर्व नागरिकांचे आभार व्यक्त करण्यात आले.



### कोलाडवासियांचा बंदला प्रतिसाद

**कोलाड** : दिल्लीतील आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांवर अमानुष अत्याचार केल्याच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने दि.२३ जुलै रोजी महाराष्ट्र बंदची हाक दिली होती. या पार्श्वभूमीवर कोलाडवासियांनी महाराष्ट्र बंदला उत्तम प्रतिसाद दिला असून, बाजापेठेतील अत्याआवश्यक सेवा वगळून किराणा दुकान, हॉटेल, वाईन शॉप, पान टपऱ्या बंद करण्यात आल्या. दरम्यान, ज्या राजकीय पक्षांनी अजून विद्यार्थ्यांचे भवितव्य विचारात घेऊन विद्यार्थ्यांवर यापुढे लाठीहल्ला होऊ नये, छरे, गोळ्या, अश्रू धूर चालवू नये, यासाठी महाराष्ट्रातल्या जनतेने सरकार विरुद्ध आवाज उठवला पाहिजे, असेही आवाहन करण्यात आले.



### रेल्वे स्थानकावर कडेकोट बंदोबस्त

**खांदा कॉलनी** : वंचित बहुजन आघाडीने पुकारलेल्या महाराष्ट्र बंदच्या अनुषंगाने पनवेल रेल्वे स्थानकावर गुरूवारी (दि.२३) कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पनवेल रेल्वे पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात रेल्वे स्थानक व परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, तसेच प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत विशेष सुरक्षा व्यवस्था करण्यात आली. स्थानकाच्या मुख्य प्रवेशद्वारावर बॅरिकेड्स उभारून येणाऱ्या-जाणाऱ्या प्रवाशांवर बारकाईने नजर ठेवण्यात आली. बंदोबस्तासाठी गॅसगन पथक, हेल्मेटसह लाठी पथक, लाठी-ढाल पथक तसेच रायफलधारी पथक तैनात करण्यात आले होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय तायडे यांच्या नेतृत्वाखाली एक पोलीस निरीक्षक, तीन पोलीस उपनिरीक्षक आणि ३० पोलीस अंमलदार तैनात होते. तसेच लाठी, ढाल, गॅसगन, स्ट्रेचर, मेगाफोन आणि ५० रबरी राऊंडसह दोन रायफलची व्यवस्था करण्यात आली होती. याशिवाय पनवेलचे १ सहाय्यक सुरक्षा आयुक्त, ४ अधिकारी आणि १८ कर्मचारी बंदोबस्तासाठी उपस्थित होते. शहर पोलीस ठाण्याशी समन्वय साधून संपूर्ण रेल्वे स्थानक परिसरात सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्यात आली होती.

## बंदचा पनवेलमध्ये परिणाम



। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

जंतर-मंतर येथे परीक्षा प्रकरणातील कथित गैरव्यवहाराच्या विरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवरील पोलीस कारवाईच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने पुकारलेल्या महाराष्ट्र बंदचा परिणाम पनवेलमध्ये दिसून आला. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आंदोलनामुळे काही काळ चारही दिशांनी वाहनांच्या रांगा लागल्याने मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. त्यामुळे प्रवाशांना काही काळ गैरसोयीचा सामना करावा लागला. वाहतूक पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचून वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले. या आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विद्यार्थी आणि युवक मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते.

## 'न्यायासाठी साहित्यिकांनी लिहावे'

। अलिबाग । प्रतिनिधी ।

निट पेपर फुटी विरोधात दिल्लीतील जंतर मंतरवर सोनम वांगचुक शांतपणे आमरण उपोषण करीत होते. तसेच, अभिजित दिपके यांच्या सोबतच्या विद्यार्थ्यांचा लढा शांतपणे होत असताना, तो लढा चिरडण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न लोकशाही आणि देशासाठी फारच घातक ठरला आहे. त्यामुळे साहित्यिकांनी या विषयावर लिहून युवा पिढीला, त्यांच्या पालकांच्या वेदनांना न्याय देऊ शकाल. त्यासाठी लिहू या, असे आवाहन साहित्यरत्न प्रा. एल.बी. पाटील यांनी केले आहे.

## हल्ल्याबाबत रिपब्लिकन सेना आक्रमक



■ हल्ला करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

■ उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांना निवेदन

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

नीट परीक्षा प्रकरणातील कथित गैरव्यवहार, तसेच दिल्ली येथील जंतर मंतर येथे सुरु असलेल्या आंदोलकांवर सोमवारी (दि.२०) अमानुषपणे लाठी हल्ला झाला. या घटनेबाबत रिपब्लिकन सेनेकडून तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा या प्रमुख मागणीसह हल्ला करणाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी रायगड जिल्हा अध्यक्ष प्रदिप ओव्हाळ यांनी केली आहे. याबाबत त्यांनी निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांना निवेदन दिले.

नीट पेपर फुटीप्रकरणी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा, पारदर्शक चौकशी करण्यात यावी, या मागणीसाठी सोनम वांगचुक आणि कॉक्रोच जनता पार्टीचे अभिजीत दिपके यांनी आंदोलन सुरु केले आहे. दिल्ली येथील जंतर मंतर येथे गेल्या अनेक दिवसांपासून हा लढा सुरु आहे. देशभरातील असंख्य तरुणांनी या आंदोलनात सहभाग घेतला होता. संसद भवनावर हे आंदोलन जाण्याच्या तयारी होती. मात्र, भाजप सरकारने आंदोलन मोडीत काढण्यासाठी पोलीस बलाचा वापर केला. सोमवारी (दि.२०) दिल्लीमधील पोलिसांनी हजारो तरुण व तरुणींवर अमानुषपणे लाठी हल्ला करून त्यांना जखमी केले. या घटनेचे पडसाद महाराष्ट्र राज्यासह रायगड जिल्ह्यात उमटले असून, गेल्या दोन दिवसांपासन वेगवेगळ्या संस्था, संघटनांकडून निषेध व्यक्त केला जात आहे. तसेच, वेगवेगळ्या माध्यमातून होत असलेल्या चर्चेतून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. विद्यार्थी व विद्यार्थीनींवर झालेल्या या लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ रिपब्लिकन सेना अध्यक्ष आनंदराव आंबेडकर यांनी संताप व्यक्त केला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यामध्ये रिपब्लिकन सेनेने आक्रमक भुमिका घेतली आहे.

दरम्यान, रिपब्लिकन सेनेचे जिल्हा अध्यक्ष प्रदिप ओव्हाळ यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने रायगडचे जिल्हाधिकारी यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयातील निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात, विद्यार्थ्यांना मारहाण करणाऱ्या पोलिसांविरोधात गून्हे दाखल करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी रिपब्लिकन सेनेचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष रोशन मोरे, जिल्हा सल्लागार सचिन गायकवाड, जिल्हा सचिव अनंत धोत्रे, तालुका अध्यक्ष नागेश सुर्वे, पेणचे उपाध्यक्ष उत्तम कांबळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## दुकानदारांना हात जोडून आवाहन

■ वंचित बहुजन आघाडीने पुकारलेल्या बंदला प्रतिसाद



। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिसांच्या लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने पुकारलेल्या महाराष्ट्र बंदला पनवेलमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शहरातील प्रमुख बाजारपेठांमध्ये फिरून व्यापारी व दुकानदारांना हात जोडून दुकाने बंद ठेवण्याचे आवाहन केले. छत्रपती शिवाजी महाराज चौक, बाजारपेठ व परिसरात कार्यकर्त्यांनी शांततापूर्ण रॅली काढत विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, लाठीचार्जचा निषेध करण्यात यावा आणि प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी मागणी केली. ''विद्यार्थ्यांना न्याय द्या'', ''लोकशाहीचा विजय असो'', ''जय भीम'' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनादरम्यान अनेक व्यापाऱ्यांनी कार्यकर्त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत दुकाने काही काळ बंद ठेवली, तर काहींनी आंदोलनाला नैतिक पाठिंबा दर्शविला. कार्यकर्त्यांनी कोणताही तणाव निर्माण न करता शांततेच्या मार्गाने बंदचे आवाहन केले.

## 'कधीही न पाहिलेलं अहंकारी सरकार'

। माणगाव । प्रतिनिधी ।

केंद्रातील शिक्षण मंत्र्याच्या विरोधात सोनम वांगचुक उपोषण करत आहेत, त्याची दखलही सरकारने घेतली नाही. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांवर भयंकर अमानुष, अमानवी लाठीमार करून अनेक विद्यार्थ्यांना जायबंदी केले. सरकारने आपला अहंकारीपणा दाखवून दिला आहे. देश स्वातंत्र्यानंतर एवढे निष्ठूर अहंकारी सरकार या देशाने कधीही पाहिले नसून, त्याची मोठी किंमत सरकारला चुकवावी लागेल. असे शिव, फुले, शाहू, आंबेडकर प्रतिष्ठानचे महाराष्ट्र अध्यक्ष प्रभाकर मसुरे यांनी नमूद केले आहे.

## कर्जतमध्ये कडकडीत बंद



। कर्जत । प्रतिनिधी ।

वंचित बहुजन आघाडीच्यावतीने दि.२३ जुलै रोजी महाराष्ट्र बंदचे आवाहन करण्यात आले होते. त्या पार्श्वभूमीवर कर्जत तालुक्यातील वंचित बहुजन आघाडीच्यावतीने पोलीस प्रशासन, व्यापारी फेडरेशन तसेच विविध सामाजिक, व्यापारी व नागरिक संघटनांना सहकार्याची विनंती करणारी निवेदने देण्यात आली. त्याप्रमाणे कर्जत बाजारपेठेत कडकडीत बंद ठेवण्यात आला होता.

निट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्ज व अत्याचाराचा वंचित बहुजन आघाडीने तीव्र निषेध व्यक्त केला आहे. या घटनेच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी दि. २३ जुलै रोजी महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे. या अनुषंगाने कर्जत तालुका वंचित बहुजन आघाडीच्यावतीने कर्जत पोलीस उपविभागीय अधिकारी यांना शांततापूर्ण आंदोलनासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याची विनंती करण्यात आली. तसेच व्यापारी फेडरेशन, व्यापारी संघटना व इतर सामाजिक संस्थांना समाजहित व विद्यार्थ्यांप्रती ऐक्य व्यक्त करण्यासाठी स्वयंस्फूर्तीने बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते.

## शेकापच्या कार्यकर्त्यांची बैठक



। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।

खालापूर येथे होणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाच्या २ ऑगस्ट वर्धापन दिनाच्या नियोजनासाठी शेकापच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक मंगळवारी (दि.२१) पाली येथे पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी शेकापचे जिल्हा चिटणीस सुरेश खैरे हे होते. यावेळी महिला, कार्यकर्ते व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाचे नियोजन, तयारी आणि जबाबदाऱ्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मार्गदर्शन करताना सुरेश खैरे यांनी, कार्यकर्त्यांना पक्षाची ध्येय-धोरणे तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे आणि वर्धापन दिन मोठ्या उत्साहात यशस्वी करण्याचे आवाहन केले. तसेच, वर्धापन दिन खोपोली येथे मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात येणार असून, त्यासाठी विविध समित्यांचीही घोषणा केली.

**सत्ताधारी प्रभावक्षेत्रातील निवडक शाळांवर कोट्यवधींची बरसात** | **सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांचा आरोप**

# एकाच शाळेवर अनेकवेळा खर्च

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील ३१५ शाळा नादुरुस्त असताना सत्ताधारी प्रभाव क्षेत्रातील निवडक शाळांवर कोट्यवधी रुपयांची बरसात होत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी केला आहे. एकाच शाळांवर दोन ते तीन वेळा खर्च केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. राजिप प्राथमिक शिक्षण विभागाने माहितीचा अधिकार अंतर्गत उपलब्ध करून दिलेल्या कागदपत्रांमधून प्राथमिक शाळांच्या दुरुस्ती व विकासकामांबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाने माहितीचा अधिकार अंतर्गत उपलब्ध करून दिलेल्या कागदपत्रांमधून प्राथमिक शाळांच्या दुरुस्ती व विकासकामांबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. जिल्ह्यात ३१५ शाळा अजूनही नादुरुस्त (जून २०२६ पर्यंत), २५ कोटी ८३ लाख रुपयांची गरज असताना निधी अपुरा, रखडलेला तसेच अनेक शाळांमध्ये पायाभूत सुविधांचा अभाव, पटसंख्या घट (२९ शाळा बंद), शिक्षक रिक्त (९७१ पदे) अशी परिस्थिती असताना केवळ सत्ताधारी कार्यकर्त्यांच्या कार्यक्षेत्रातच बहुतांश निधी खर्च व एकाच शाळांवर दोन-तीन वेळा खर्च होत असल्याचे उघड झाले. त्यामुळे जिल्हा नियोजन विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याची टीका संजय सावंत यांनी केली आहे.

सावंत यांच्या माहितीनुसार, अलिबाग तालुक्यातील सहाण, कुसुंबळे, सारळ, कुर्डुस, धाकट शहापूर, चौल यांसारख्या शाळांवर वेगवेगळ्या वर्षांत दुरुस्ती, नवीन इमारत, वर्गखोल्या किंवा स्वच्छतागृह अशा विविध कामांसाठी पुन्हा पुन्हा निधी मंजूर झाल्याची नोंद आहे. काही शाळांवर एकापेक्षा अधिक विकासकामे मंजूर करण्यात आल्याचे दस्तऐवज दर्शवितात. दस्तऐवजात वाडगाव येथे नवीन शाळा इमारतीसाठी ५० लाख, वाडगाव येथेच दुरुस्तीसाठी १० लाख, सहाण येथे नवीन शाळा इमारतीसाठी २० लाख, तसेच जिल्ह्यातील अनेक शाळांसाठी ३ लाख ते २० लाखांपर्यंत दुरुस्ती व इतर कामांसाठी निधी मंजूर झाल्याची माहिती आहे.

संजय सावंत यांना प्राथमिक शिक्षण विभागाने २४६ पानांची माहिती उपलब्ध करून दिली आहे. या माहितीच्या आधारे त्यांनी निधी वाटपाच्या निकषांवर प्रश्न उपस्थित करत निधीचे समान वितरण झाले का, एकाच शाळांना वारंवार निधी का देण्यात आला आणि प्रत्यक्ष कामांची गुणवत्ता काय आहे, याची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी केली आहे. आरटीआय यादीत सहाण, कुर्डुस, कुसुंबळे, पेझारी, वाडगाव इत्यादी शाळांवर २०२३ ते २०२६ मध्ये अनेकदा दुरुस्ती, नवीन कामे मंजूर यामुळे दुरुपयोगाचा संशय निर्माण होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

दरम्यान, प्राथमिक शाळांच्या दुरुस्तीचा बहुतांश निधी सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या प्रभावक्षेत्रातील गावांमध्ये खर्च करण्यात आला असून, काही निवडक शाळांवर दोन ते तीन वेळा निधी मंजूर करण्यात आला आहे, असा आरोपही संजय सावंत यांनी केला आहे.

**एकाच शाळेवर एकापेक्षा अधिक विकासकामे मंजूर**

काही शाळांवर एकापेक्षा अधिक विकासकामे मंजूर करण्यात आल्याचे दस्तऐवज दर्शवितात. या दस्तऐवजात वाडगाव येथे नवीन शाळा इमारतीसाठी ५० लाख, वाडगाव येथेच दुरुस्तीसाठी १० लाख, सहाण येथे नवीन शाळा इमारतीसाठी २० लाख, तसेच जिल्ह्यातील अनेक शाळांसाठी ३ लाख ते २० लाखांपर्यंत दुरुस्ती व इतर कामांसाठी निधी मंजूर झाल्याची माहिती आहे.

# ...आणि ही माणसांची फूट

जंतरमंतरवर नीटच्या पेपरफुटीबाबत आंदोलन चालू आहे. त्याच वेळी अंतराळ तंत्रज्ञानातील सर्वोच्च सरकारी संस्था इस्रोमधून शास्त्रज्ञ व अभियंत्यांच्या राजीनाम्याची जणू लाट आली आहे. इस्रोसारख्या मोक्याच्या संस्थेमधून मोक्याची माणसे फुटणे ही चिंताजनक बाब आहे. गेल्या काही महिन्यांमधून इस्रोमधून किमान १०० ते १२० शास्त्रज्ञ वगैरे बाहेर पडले आहेत. जास्त पगाराच्या नोकऱ्या व संधी मिळत असल्याने खासगी कंपन्यांकडे जाण्याकडे त्यांचा ओढा दिसतो आहे. इस्रोच्यायूआर राव स्पेस सेंटर व विक्रम साराभाई स्पेस सेंटर या दोन शाखा आहेत. तिथून मोठ्या प्रमाणात गळती झाली आहे. तीनच वर्षांपूर्वी म्हणजे २३ ऑगस्ट २०२३ रोजी इस्रोचे चांद्रयान-तीन चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरले होते. त्यामुळे देशभर एक उल्हासाची व उत्साहाची लाट उसळली होती. अनेक तरुण इस्रोकडे आणि अंतराळ विज्ञानाकडे आकर्षित होतील असे सांगितले जात होते. तसे काही प्रमाणात झालेही असेल. पण तीनच वर्षांनी इस्रोला स्वतःचे घर सांभाळताना नाकी नऊ येत आहेत असे दिसते. इस्रोचे पुढचे उद्दिष्ट २०२७ पर्यंत गगनयान सोडण्याचे होते. मानवाला अंतराळात घेऊन जाण्याचे व सुरक्षित परत आणण्याचे होते. त्यानंतर २०३५ मध्ये अंतराळात एक कायम चा तळ उभारण्याची महत्वाकांक्षाही इस्रो बाळगून आहे. पण या सगळ्या योजनांना आता धक्का बसू शकतो. कारण, गगनयान व इतर मोहिमांची आखणी करणारे अनेक शास्त्रज्ञ खासगी कंपन्यांकडे जाऊ लागले आहेत. यामुळे अखेर सरकारला हस्तक्षेप करावा लागला. शास्त्रज्ञांचे राजीनामे मंजूर करायचे की नाही याचा निर्णय त्यांचे विभागप्रमुख नव्हे तर दिल्लीतील केंद्र सरकारच्या आंतरिक्ष खात्यातील वरिष्ठ अधिकारी घेतील असे ठरवण्यात आले. यामुळे या राजीनाम्यांची गती मंद होईल किंवा काही राजीनामे अमान्य केले जातील. पण त्यामुळे मूळ प्रश्न कितपत सुटू शकेल हा प्रश्न आहे. चांगले संशोधन करायला मिळावे व हातून देशसेवा घडावी या उद्देशानेच हे शास्त्रज्ञ मुळात इस्रोमध्ये आले असतील यात शंका नाही. त्यापासून ते का दूर होऊ लागले याचा शोध घेण्याची गरज आहे.

## मोदी काळातील खासगीकरण

याचे मूळ मोदी सरकारच्या २०२० च्या धोरणात आहे. त्या वर्षी अवकाश विज्ञानासंदर्भात खासगी कंपन्यांना मोकळीक देण्याचे जाहीर झाले. त्यानंतर घडायचे तेच घडले. बड्या कंपन्यांकडे भरपूर पैसा असला तरी अवकाश तंत्रज्ञानातले जाणकार शास्त्रज्ञ वा इंजिनिअर नव्हते. ते सरकारी कंपन्या किंवा इस्रोमध्येच होते. त्यांच्याकडून हे फोडले जाणार हे उघड होते. यापूर्वी प्रत्येक खासगीकरणाच्या वेळी हेच घडले होते. बँकांचे खासगीकरण झाले तेव्हा आयसीआयसीआय किंवा एचडीएफसीम ध्ये आरंभी सरकारी बँकांमधूनच अधिकारी गेली होती. खासगी टीव्ही वाहिन्या आल्या तेव्हा त्यांच्यातले बहुसंख्य कॅमेरामन, एडिटर, तंत्रज्ञ, कार्यक्रम तयार करणारे अधिकारी हे सरकारी दूरदर्शनकडूनच गेले होते. एअर इंडिया या सरकारी कंपनीनेच खासगी विमान कंपन्यांना मनुष्यबळाचा पुरवठा केला होता व स्वतः एअर इंडिया कंगाल झाली होती. टेलिफोन खात्यातही हेच घडले होते. टाटा, बिर्ला, अंबानी किंवा नंतर एअरटेल आणि व्होडाफोनच्या सेवा सरकारी बीएसएनएलला कमकुवत करूनच मोठ्या झाल्या. आधी या कंपन्यांचे मनुष्यबळ फोडायचे, त्यांची धोरणे चोरायची, त्यांच्याकडचे ज्ञान लंपास करायचे आणि नंतर सरकारला हाताशी धरून सरकारी कंपन्या मातीत जातील असे पाहायचे हा एक ठराविक मार्ग आहे. आता अवकाश विज्ञान हे क्षेत्रही त्याच रस्त्याने चाललेले दिसते. अर्थातच हे अनेक अर्थांनी धोकादायक आहे. इस्रोमार्फत आकाशात देशाचे उपग्रह सोडले जातात. त्या उपग्रहांमुळेच देशातील जमिनींचे नकाशे बनवता आले. हवामानाचे अचूक अंदाज वर्तवता येऊ लागले. सर्वात महत्वाचे म्हणजे भारतातील मोबाईल फोन व इंटरनेटचे जबरदस्त जाळे याच उपग्रहांच्या जिवावर कार्यरत आहे. हे सर्व सरकारी यंत्रणांच्या मार्फत झाल्याने त्यावर सरकारचे नियंत्रण आहे. इथे सरकार याचा अर्थ काँग्रेस वा भाजप असा अभिप्रेत नाही. सरकारी नियंत्रण म्हणजे सार्वजनिक उत्तरदायित्व. इस्रोमध्ये पैसे कसे खर्च झाले, कोणती धोरणे आखण्यात व राबवण्यात आली याची चिकित्सा संसदेत किंवा संसदीय समितीत होऊ शकते. याबाबत खासदार प्रश्न विचारू शकतात. त्यांच्या मार्फत जनता जाब विचारू शकते.

## वचक कोण ठेवणार?

खासगी कंपन्यांमध्ये यातील काहीच घडणार नाही. त्यांचे काय चालू आहे याचा थांगपत्ता लागणार नाही. अधिकाधिक नफा मिळवणे हा एकमेव उद्देश राहील. संपूर्ण जगात भारतामधील इंटरनेटचे दर स्वस्त आहेत असे म्हणतात. सरकारी उपग्रह आणि नफ्याची हाव नसणे यामुळेच हे शक्य झाले आहे. अब्जावधी भारतीयांना त्याचा रोज फायदा होतो आहे. हा विकास खासगी क्षेत्राने केला असता तर हे घडले नसते. मात्र आता या फायद्याच्या लोण्याचा गोळा मटकावण्यासाठी खासगीवाले पुढे येऊ लागले आहेत. खासगी ते ते सर्वच वाईट असे कोणीही म्हणणार नाही. पण वर दिलेल्या उदाहरणांवरून प्रत्येक महत्वाच्या क्षेत्रामध्ये घुसलेल्या खासगी कंपन्यांचा व्यवहार हा भानगडींचा राहिलेला आहे. त्यांच्यामुळे त्या त्या क्षेत्रात नफेबाजी बोकाळली आहे. खासगी बँकांमुळे कर्जे मिळणे काहीसे सुलभ झाले असले तरी लबाड भांडवलदारांनी बँकांशी संगनमत करून लुटण्याचे प्रकारही वाढले आहेत. शिवाय गरिबांना या बँका दारातही उभ्या करीत नाहीत हेही घडतेच आहे. खासगी मोबाईल कंपन्यांमुळे अनेकांच्या मुठ्ठीत मोबाईल आला असला तरी आता या कंपन्या ग्राहकांकडून जबर पैसा उकळू लागल्या आहेत. विमान कंपन्यांची दादागिरी वाढली आहे. याच रीतीने अवकाश तंत्रज्ञानात पैसेवाल्या कंपन्यांची मक्तेदारी निर्माण झाली व त्यांनी हे शास्त्र केवळ आपल्याला फायद्याच्या गोष्टींसाठी वापरायला सुरुवात केली तर ते धोकादायक ठरेल. अलिकडेच स्कायरूट या हैदराबादच्या कंपनीने तयार केलेल्या विक्रम वन या खासगी रॉकेटचे यशस्वी प्रक्षेपण करण्यात आले. भारतातले हे अशा प्रकारचे पहिलेच उड्डाण होते. स्कायरुट ही कंपनी पूर्वाश्रमीच्या इस्रोच्या वैज्ञानिकांनीच स्थापन केली आहे. अशाच प्रकारच्या आणखी किमान ४०० स्टार्टअप्स म्हणजे नवीन कंपन्या या क्षेत्रात उतरल्या आहेत. उपग्रह तयार करणे, रॉकेट विकसित करणे इत्यादी गोष्टी त्या करतील. या कंपन्यांमधून विक्रमी नफा होण्याची शक्यता तूर्तास तरी नाही. अगदी अमेरिकेत मस्क यांची स्पेसएक्स ही कंपनी नासाच्या म्हणजेच अमेरिकी सरकारच्या कंत्राटांच्या मदतीनेच वाढली आहे. या स्थितीत या कंपन्यांमध्ये लागणारे भांडवल नक्की कोणाचे आहे व त्यांचे उद्देश काय आहेत हे तपासावे लागणार आहेत. उपग्रह प्रक्षेपणाच्या क्षेत्रात इस्रोने जगात नाव कमावले असून अमेरिकी वा युरोपीय सरकारे किंवा गुगलसारख्या कंपन्यांचाही तिच्यावर भरवसा आहे. अशा स्थितीत इस्रोला कमकुवत करण्याचा हा काही डाव तर नाही ना हेही पाहावे लागणार आहे. मोदी सरकारने हे तपासावे अशी सर्वांची अपेक्षा असेल. मुद्दा असा आहे की, ते तपासण्याची मोदी सरकारची इच्छा व नियत आहे का ?

विचार

# भारताच्या अवकाश महत्त्वाकांक्षेला नवे पंख

***भारताने अवकाश क्षेत्रातील यशाचा पाया वैज्ञानिकांच्या बुद्धिमत्तेवर आणि काटकसरीवर उभा केला. आता त्यात व्यावसायिक दृष्टिकोनाची भर घालण्याची वेळ आली आहे. 'इस्रो'ने संशोधनावर लक्ष केंद्रित करताना खासगी उद्योगांना मोठी भूमिका दिली पाहिजे. धोरणात्मक सुधारणांबरोबरच गुंतवणूक, करसवलती, जागतिक भागीदारी आणि संशोधनासाठी विद्यापीठांना प्रोत्साहन देणेही तितकेच आवश्यक आहे.***




**नंदकुमार काळे**

भारताने गेल्या दोन दशकांमध्ये अवकाश संशोधन क्षेत्रात जगाला थक्क करणारी कामगिरी केली आहे. मंगळ मोहिमेपासून चांद्रयानपर्यंत आणि एका वेळी १०४ उपग्रह प्रक्षेपित करण्यापर्यंत 'इस्रो'ने अनेक अशक्य वाटणारे पराक्रम केले. कमी खर्च, उच्च विश्वासार्हता आणि वैज्ञानिक कौशल्य या तीन आधारांवर भारताने जागतिक अवकाश उद्योगात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले; मात्र अवकाश उद्योग आता नव्या टप्प्यात प्रवेश करत आहे. येथे स्पर्धा केवळ उपग्रह प्रक्षेपित करण्यापुरती राहिलेली नाही, तर किती वेगाने, किती कमी खर्चात आणि किती वेळा एकाच रॉकेटचा पुनर्रवापर करता येते, यावर भविष्यातील नेतृत्व ठरणार आहे. म्हणूनच पुनर्वापरक्षम रॉकेट्स हे आजच्या काळातील सर्वात महत्त्वाचे तंत्रज्ञान बनले आहे. एके काळी प्रत्येक प्रक्षेपणानंतर रॉकेट समुद्रात कोसळणे किंवा जळून नष्ट होणे हेच सामान्य मानले जात होते. अवकाश मोहिमांचा प्रचंड खर्च याच कारणामुळे होत असे; परंतु अमेरिकेतील 'स्पेसएक्स' कंपनीने हा विचारच बदलून टाकला. रॉकेटचा पहिला टप्पा सुरक्षितपणे पृथ्वीवर उतरवून त्याचा पुन्हा वापर करण्याची कल्पना प्रत्यक्षात आणली. आज एकाच बूस्टरचा अनेक वेळा वापर केला जात आहे. परिणामी, प्रक्षेपणाचा खर्च मोठ्या प्रमाणात कमी झाला असून उपग्रह उद्योगात आर्थिक क्रांती घडली आहे. आज जगातील प्रत्येक मोठा देश या दिशेने धावत आहे. चीनने अलीकडेच पुनर्वापरक्षम रॉकेटची यशस्वी चाचणी घेतली. जपान, युरोप आणि रशियाही अशाच तंत्रज्ञानावर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहेत. कारण त्यांना माहीत आहे, की पुढील दशकात अवकाश क्षेत्रात अब्जावधी डॉलरची अर्थव्यवस्था उभी राहणार आहे.

अवकाश उद्योगाच्या वाढीमागे अनेक कारणे आहेत. जगभरात उपग्रहांद्वारे इंटरनेट सेवा पुरवण्याचा वेग वाढत आहे. 'स्टारलिंक', 'वनवेब', 'ॲमेझॉन'ची कायपर योजना यांसारख्या प्रकल्पांमुळे हजारो उपग्रह पृथ्वीभोवती फिरत आहेत. हवामानबदलाचे निरीक्षण, आपत्ती व्यवस्थापन, शेती, नौकानयन, संरक्षण, दूरसंचार, ड्रोन, स्वयंचलित वाहने आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसाठीही उपग्रहांची मागणी सातत्याने वाढत आहे. परिणामी, दर वर्षी शेकडो नव्हे, तर हजारो उपग्रह प्रक्षेपित करण्याची गरज निर्माण होत आहे. अशा परिस्थितीमध्ये पारंपरिक रॉकेट तंत्रज्ञानावर टिकून राहणे कोणत्याही देशाला परवडणारे नाही. कारण प्रत्येक प्रक्षेपणासाठी नवे रॉकेट तयार करणे म्हणजे वेळ, पैसा आणि संसाधनांचा मोठा अपव्यय होय. पुनर्वापरक्षम रॉकेट्समुळे हा खर्च निम्म्याहून अधिक कमी होऊ शकतो. त्यामुळे व्यावसायिक ग्राहकही अशाच सेवा देणाऱ्या कंपन्यांकडे वळत आहेत. याच ठिकाणी भारतासमोर मोठे आव्हान उभे आहे. 'इस्रो'ची विश्वासार्हता आजही अबाधित असली, तरी व्यावसायिक बाजारात भारताचा वाटा सातत्याने कमी होत आहे. एके काळी कमी खर्चामुळे भारताकडे आकर्षित होणारे ग्राहक आता पुनर्वापरक्षम तंत्रज्ञानामुळे 'स्पेसएक्स'कडे वळत आहेत. कमी खर्चाचा भारताचा सर्वात मोठा फायदा आता तितका प्रभावी राहिलेला नाही. भारताकडे या परिस्थितीवर मात करण्याची क्षमता आहे.

'इस्रो'ने यापूर्वी 'रियुजेबल लाँच व्हेईकल टेक्नॉलॉजी डेमोस्ट्रेटर' (आरएलव्ही-टीडी) सारख्या प्रयोगांमध्ये यश मिळवले आहे. विंग असलेल्या वाहनाची यशस्वी चाचणी करून भारताने या क्षेत्रातील आपली क्षमता दाखवून दिली आहे; मात्र प्रयोगशाळेतील यश आणि व्यावसायिक सेवा यामध्ये मोठा फरक असतो. आता संशोधनातून प्रत्यक्ष उत्पादनाकडे वाटचाल करणे आवश्यक आहे. यासाठी सरकारने 'नेक्स्ट जनरेशन लाँच व्हेईकल' (एनजीएलव्ही) प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पाकडून मोठ्या अपेक्षा आहेत; मात्र या प्रकल्पाची गती वाढवणे तितकेच महत्त्वाचे आहे. कारण स्पर्धक देश थांबलेले नाहीत. तंत्रज्ञानातील विलंब म्हणजे बाजारपेठ गमावण्याची शक्यता. अवकाश उद्योग हा केवळ प्रतिष्ठेचा विषय राहिलेला नाही, तर थेट अर्थव्यवस्थेशी जोडला गेला आहे. उपग्रह प्रक्षेपण, उपग्रहनिर्मिती, डेटा सेवा, पृथ्वी निरीक्षण, अवकाश पर्यटन, चंद्रावरील संसाधनांचा शोध आणि भविष्यातील अवकाश उद्योग यामध्ये लाखो रोजगार निर्माण होणार आहेत. भारताने या उद्योगात वेळेत गुंतवणूक केली, तर तो जागतिक अर्थव्यवस्थेतील मोठा भाग मिळवू शकतो. यामध्ये खासगी उद्योगांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. भारतात 'स्कायरूट एरोस्पेस', अग्निकुल कॉसमॉस, बेलाट्रिक्स, पिक्सेल, दिगंतरा यांसारखे अनेक स्टार्टअप्स उदयास आले आहेत. त्यांनी कमी खर्चातील इंजिन, नवीन इंधन तंत्रज्ञान आणि लहान उपग्रह प्रक्षेपण प्रणाली विकसित करण्यास सुरुवात केली आहे. ही सकारात्मक बाब असली, तरी पुनर्वापरक्षम रॉकेटसारख्या तंत्रज्ञानासाठी दीर्घकालीन भांडवली गुंतवणूक, सातत्यपूर्ण संशोधन आणि सरकारी पाठबळ आवश्यक आहे.

राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीनेही या तंत्रज्ञानाचे म हत्त्व वाढले आहे. आजचे युद्ध केवळ रणांगणावर लढले जात नाही. उपग्रहांद्वारे माहिती संकलन, क्षेपणास्त्रांचे मार्गदर्शन, सीमा निरीक्षण, सायबर सुरक्षा आणि संचार व्यवस्था नियंत्रित केली जाते. अशा वेळी स्वतःची प्रक्षेपण क्षमता असणे ही साम रिक गरज आहे. भविष्यातील कोणत्याही संघर्षात परदेशी प्रक्षेपण सेवांवर अवलंबून राहणे भारताला परवडणारे नाही. पर्यावरणाच्या दृष्टीनेही पुनर्वापरक्षम रॉकेट्स फायदेशीर आहेत. प्रत्येक वेळी नवीन रॉकेट तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर धातू, इंधन आणि औद्योगिक संसाधने वापरावी लागतात. पुनर्वापरामुळे उत्पादन कमी होऊन कार्बन उत्सर्जन आणि औद्योगिक कचऱ्यातही घट होऊ शकते. अर्थात, रॉकेट इंधनामुळे होणाऱ्या प्रदूषणावर अजूनही संशोधन आवश्यक आहे, तरीही संसाधनांचा कार्यक्षम वापर ही या तंत्रज्ञानाची मोठी जमेची बाजू आहे. अवकाश क्षेत्रातील पुढील दहा वर्षे निर्णायक ठरणार आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम तंत्रज्ञान, उपग्रह इंटरनेट आणि चंद्र मोहिमा यामुळे अवकाश उद्योगाची व्याप्ती अभूतपूर्व वाढणार आहे. या नव्या युगात प्रक्षेपण खर्च सर्वात कमी ठेवणाऱ्या देशाकडे जगातील ग्राहक वळतील. त्यामुळे पुनर्वापरक्षम रॉकेट्स हे केवळ तांत्रिक संशोधन नसून आर्थिक, सामरिक आणि औद्योगिक स्वातंत्र्याचे साधन आहे. भारताकडे प्रतिभा आहे, अनुभव आहे आणि यशस्वी अवकाश मोहिमांचा समृद्ध इतिहासही आहे. आता आवश्यक आहे ती धाडसी धोरणे, जलद निर्णय आणि सातत्यपूर्ण गुंतवणूक.

आज जग अवकाश अर्थव्यवस्थेच्या नव्या पर्वात प्रवेश करत असताना भारताने केवळ सहभागी न होता नेतृत्व करण्याचे ध्येय ठेवले पाहिजे. कारण सर्वाधिक रॉकेट्स नसली तरी सर्वाधिक वेळा उड्डाण करू शकणारी पुनर्वापरक्षम रॉकेट्स राखून असणारा देशच भविष्यात अवकाश जिंकेल. भारताने ही शर्यत आजच वेगाने सुरू केली, तर 'आत्मनिर्भर भारता'चा पुढील टप्पा अवकाशातच लिहिला जाईल. एके काळी उपग्रह अवकाशात पाठवणे ही केवळ महासत्तांची मक्तेदारी मानली जात होती; परंतु गेल्या दोन दशकांमध्ये भारताने आपल्या कमी खर्चातील आणि विश्वासार्ह प्रक्षेपण सेवांमुळे जागतिक अवकाश क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली. २०१७ मध्ये 'इस्रो'ने एका 'पीएसएलव्ही रॉकेट'मधून एकाच वेळी १०४ उपग्रह प्रक्षेपित करून जागतिक विक्रम केला आणि भारताच्या वैज्ञानिक क्षमतेची दखल जगाला घ्यावी लागली; मात्र अवकाश क्षेत्राचा वेग आता बदलत आहे. आज प्रश्न केवळ कमी खर्चात उपग्रह प्रक्षेपित करण्याचा नाही, तर रॉकेट्सचा पुनर्वापर करून अवकाश मोहिमा अधिक स्वस्त, जलद आणि व्यावसायिकदृष्ट्या फायदेशीर बनवण्याचा आहे. या नव्या शर्यतीत अमेरिका, चीन, जपान आणि युरोप झपाट्याने पुढे जात असताना भारतानेही निर्णायक पावले उचलण्याची वेळ आली आहे. रॉकेट प्रक्षेपणाचा सर्वाधिक खर्च हा त्याच्या पहिल्या टप्प्यातील बूस्टरवर होतो. पारंपरिक पद्धतीत हा बूस्टर एकदाच वापरला जातो आणि नंतर समुद्रात किंवा निर्जन भागात कोसळतो. परिणामी, प्रत्येक प्रक्षेपणासाठी नवीन रॉकेट तयार करावे लागते. यामुळे खर्च प्रचंड वाढतो. यावर उपाय म्हणून 'स्पेसएक्स'ने पुनर्वापरक्षम रॉकेट तंत्रज्ञान विकसित केले.

प्रक्षेपणानंतर बूस्टर सुरक्षितपणे पृथ्वीवर उतरवून पुन्हा वापर करण्याची संकल्पना त्यांनी प्रत्यक्षात आणली. आज 'स्पेसएक्स'चे फाल्कन-९ रॉकेट अनेक वेळा वापरले जात आहे. परिणामी, प्रक्षेपणाचा खर्च मोठ्या प्रमाणावर कमी झाला आणि कंपनीने जागतिक उपग्रह प्रक्षेपण बाजारावर वर्चस्व निर्माण केले. 'स्पेसएक्स'चे यश पाहून जगातील इतर देशही आता या तंत्रज्ञानाच्या विकासात गुंतले आहेत. चीनने अलीकडेच आपल्या 'लाँग मार्च टेन बी' रॉकेटच्या पुनर्वापरक्षम क्षमतेचे यशस्वी प्रदर्शन केले. जपाननेही छोट्या प्रमाणावर अशाच तंत्रज्ञानाची चाचणी केली आहे. युरोपमधील एरियनग्रुप 'थेमिस' पुनर्वापरक्षम वाहन विकसित करत आहे, तर रशियाने २०२८ पर्यंत स्वतःचे पुनर्वापरक्षम रॉकेट विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यावरून स्पष्ट होते की अवकाशक्षेत्रातील पुढील स्पर्धा पुनर्वापरक्षम रॉकेट तंत्रज्ञानाभोवतीच फिरणार आहे.

चर्चा आजची

# तरुण , शिक्षण अन राजकारण

**सुयोग आंग्रे**

लडाखमधील सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी दिल्लीतील जंतरमंतरवर बसलेल्या झुरळ जनता पार्टी (सीजेपी) या गटासोबत शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची आणि एनईईटीसह केंद्रीय परीक्षांमधील अनियमितता दूर करण्याच्या मागणीसाठी उपोषण सुरू केले, तेव्हा त्यांच्या वक्तव्याने ते पुढचा विचार करत असल्याचा आभास झाला आणि शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा ही केवळ सुरुवात आहे. मग विशेष प्रकारचे कार्यकर्ते आणि पक्षाचे नेतेही त्यांना भेटायला येऊ लागले.सोनम वांगचुक यांनी जंतरमंतरवर सुरू असलेल्या प्रचाराला राजकीय रंग देण्यास सुरुवात केली. त्याला रुग्णालयात नेल्यानंतर या गटाने सोमवारी संसदेच्या दिशेने कूच केले. त्यात सहभागी लोकांनी केलेल्या दगडफेकीत असंख्य पोलीस जखमी झाले. या सर्व प्रकारामुळे शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीच्या नावाखाली राजकीय आंदोलन उभारण्याचा म्हणजेच सत्ताबदलाचा प्रयत्न सुरू असल्याचा संशय व्यक्त होत आहे.राजकीय आंदोलन करण्यात किंवा सत्ताबदल घडवून आणण्यात काहीच गैर नाही, पण शिक्षण क्षेत्र आणि विद्यार्थ्यांना त्याचे साधन बनवण्यात दुहेरी चूक आहे.

त्यामुळे शिक्षणासारखा गंभीर विषय पक्षीय राजकारणाचा बळी ठरतो. जो विषय राजकारणापासून दूर ठेऊन सुधारणे आणि हाताळणे गरजेचे आहे, तो विषय दुर्लक्षित होऊन तसाच राहतो, तर तो बिघडण्याच्या दिशेने जातो.१९७४ पासून पक्षीय राजकारणासाठी विद्यार्थी आणि तरुणांचा वापर केल्याचे अनेकदा दिसून आले आहे. सोनम वांगचुक आणि तिच्या सहकाऱ्यांचा असा हेतू नसेल तर त्यांनी शैक्षणिक मुद्द्यावर लक्ष केंद्रित करून त्याच्या विविध पैलूंवर पूर्ण लक्ष द्यायला हवे होते. पक्षीय राजकारणापासून ते काटेकोरपणे वेगळे ठेवून शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञांशी चर्चा करून सुधारणेची चौकट तयार करायला हवी होती. हे धोरण निर्मात्यांना देखील मदत करेल. त्याऐवजी केवळ शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा हवा असल्याने अनेक प्रश्न निर्माण होतात. शैक्षणिक संस्थांचे पावित्र्य, शैक्षणिक साहित्याचा दर्जा, गुणवंतांना योग्य प्रोत्साहन, पात्र शिक्षकांना स्थान देणे आणि अनियमिततेचे सर्व मुद्दे दुरुस्त करणे याकडे लक्ष दिले जाईल तेव्हाच कोणताही खरा प्रयत्न सार्थ ठरेल. त्याऐवजी राजीनाम्याचा आग्रह, विविध प्रकारच्या लोकांची जमवाजमव, प्रक्षोभक चर्चा आणि राजकीय चळवळ चालवण्याचे उघड आणि छुपे इशारे, हे सर्व जाणूनबुजून किंवा नकळत निष्पाप विद्यार्थी आणि तरुणांचा वापर करण्याचा हेतू दर्शविते. यामध्ये शिक्षणाचा काहीही फायदा नाही. यावर गुरुदेव टागोरांनी गांधीजींनाही अडवले.शैक्षणिक क्षेत्र सुधारून दर्जेदार बनवायचे असेल, तर त्याची पहिली अट पक्षीय राजकारणापासून दूर ठेवण्याची आहे, अन्यथा पक्षीय राजकारण आणि सत्ता परिवर्तनाची इच्छा यामुळे सारे लक्ष इतर गोष्टींवर केंद्रित होईल. मूळ मुद्दा किरकोळ होईल. याआधीही देशात आणि परदेशात अनेक ठिकाणी असे प्रकार घडले आहेत. येथे जेपी आंदोलन आणि अण्णा आंदोलन या दोन्हींचा इतिहास स्पष्टपणे दाखवतो.दोघांनीही सामाजिक प्रश्न उपस्थित केले, ज्यात मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि तरुणांचा समावेश होता, ज्यांच्याकडे आदर्शांची उच्च भावना आहे, परंतु दोन्ही वेळा केवळ सत्तेच्या भुकेल्या नेत्यांनी चळवळीचा वापर केला.जेपी आणि अण्णांच्या पाठीवर स्वार होऊन स्वार्थी नेते पुढे सरसावले. जेपी आणि अण्णा हजारे स्वतः मागे राहिले. त्याच्या आधीही तो मुद्दा कुठेतरी बाजूला पडला होता. सत्तेवर डोळा ठेवणाऱ्या घटकांनी त्यांचा उपयोग आपल्या हव्या त्या इच्छा पूर्ण करण्यासाठी केला. तर मूळ मुद्दा तसाच राहिला.अण्णा हजारे यांनी १५ वर्षांपूर्वी याच जंतरमंतरवर सुरू केलेल्या भ्रष्टाचाराविरुद्धच्या आंदोलनाचे काय झाले?तेव्हापासून भ्रष्टाचारात काही फरक पडला आहे असे आज कोणी म्हणेल का? अण्णांचे आंदोलन अयशस्वी ठरले कारण एखाद्या समस्येचे बारकावे गांभीर्याने तपासणे, त्याच्या निराकरणासाठी वास्तववादी रूपरेषा तयार करणे इत्यादी ऐवजी केवळ प्रसिद्धी, गोंगाट, संताप इत्यादींवर लक्ष केंद्रित केले गेले, ज्याचा उपयोग सुज्ञ नेत्यांनी केला.मुद्दा आणि अण्णा दोघेही पार्श्वभूमीवर मागे पडले. वांगचुक आणि त्यांचे सहकारी या जवळच्या इतिहासाबद्दल अनभिज्ञ आहेत का? याचे उत्तर फक्त त्यांनाच माहीत आहे, पण कोणत्याही सामाजिक-सांस्कृतिक विषयाला पक्षपातीपणाशी जोडल्याने ते बिघडते हे निश्चित. शिक्षणाबाबत असे काही घडले तर ते अधिक दुर्दैवी ठरेल, कारण यामुळे हजारो निष्पाप विद्यार्थ्यांच्या साध्या श्रद्धेला तडा जातो. मग पुढची पिढी आशेने उठेपर्यंत जवळजवळ संपूर्ण पिढी निराशेच्या गर्तेत बुडते. शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याला 'सुरुवात' म्हणणे म्हणजे राजकीय दुफळीचे संकेत देण्याशिवाय काहीच नाही. सीजीपीला राजकीय गटबाजी निर्माण करायची असेल तर शिक्षणाला त्याचे हत्यार बनवू नका. शिक्षणाला गुणवत्तापूर्ण आणि गैरप्रकारांपासून मुक्त करण्याची खरोखरच काळजी असेल, तर अशा आगपाखड समर्थकांना 'नमस्कार' म्हणायला हवे, ज्यांना केवळ एक ना एक बहाणा करून सध्याचे सरकार घालवायचे आहे.जंतरमंतरवर दूरदूरवरून आलेल्या आदर्शवादी विद्यार्थी आणि तरुणांबरोबरच खळबळ माजवणारे आणि पोलिस आणि प्रशासनाशी मुद्दाम हाणामारी करणारे लोकही होते. बऱ्याचदा उत्तेजना आणि संघर्षामुळे प्रकरण बदलण्याची शक्यता असते. ही काही आंदोलकांचीही इच्छा आहे. त्यांना फक्त मथळे करून सरकारला हादरवायचे आहे. असे उद्दिष्ट शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या हितापासून वेगळे असते.किंबहुना, केवळ वांगचुक आणि त्यांच्या सहकाऱ्यांनीच नव्हे, तर सर्व जबाबदार नेत्यांनी हे समजून घेतले पाहिजे की, शिक्षण क्षेत्र ही एक गंभीर बाब आहे, ज्याचा परिणाम सर्व देशवासीयांवर होतो. सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या विवेकी नेत्यांनी शिक्षण हा राष्ट्रीय विषय मानून आचरण केले पाहिजे, जेणेकरून ते संकुचित हितसंबंधांच्या पकडीपासून सुरक्षित राहील. अन्यथा हे देशाच्या सर्वात मौल्यवान संसाधनांपैकी एक प्रदूषित करण्यासारखे होईल. त्याचे दुष्परिणाम सर्वांसाठी हानिकारक असतील.

लोकसंसद

## कर्नाटकात मद्य सेवनाची क्रेझ वाढली



देशांतील दरडोई मद्यसेवन जास्त असलेल्या राज्यांमध्ये कर्नाटकचा समावेश होत असल्याचे राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण ५ मधील आकडेवारीतून समोर आले आहे राज्यांतील प्रत्येक व्यक्ती वर्षाला सरासरी ९.१ लिटर मद्यसेवन करत आहे हा आकडा देशाच्या ६.४ लिटर सरासरीपेक्षा लक्षणीयरीत्या अधिक आहे त्यामुळे हि कर्नाटक साठी धोक्याची घंटा असू शकते त्यासाठी याचा सरकारने गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे विशेष म्हणजे राज्यांतील केवळ ११ टक्के नागरीक मद्यपान करतात मात्र मद्यपान करणाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात मद्याचे सेवन होत असल्याने हि चिंतेची बाब आहे तज्ञांच्यामते दक्षिण भारतातील पांच राज्यांच्या देशांतील एकूण मद्य विक्रीत सुमारे ४५ टक्के वाटा असून त्यात कर्नाटकचे स्थान महत्वाचे असल्याचे स्पष्ट झाले आहे लोकांचे वाढते उत्पन्न, बदलती जीवनशैली, वेगाने होणारे शहरीकरण, खर्च करण्याच्या पद्धतीतील बदल, तसेच समाजात मद्यपानाला वाढती स्विकारार्हता, यासारख्या कारणांमुळे मद्यसेवन वाढत असल्याचे बोलले जात असून लहान वयापासून मद्यपानाला सुरुवात होत असल्याने व्यसनाधीनता वाढत आहे यामुळे पैसासह शरीर आणि इतर धोक्यांना सामोर जावे लागते याचा मद्यपींनी विचार करणे जरुरीचे आहे !

**– राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

दिनविशेष

# सच्चे रंगकर्मी स्वर्गीय जयंत सावरकर!

मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते स्वर्गीय जयंत सावरकर यांच्या आज तिसऱ्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

२४ जुलै २०२३ रोजी वयाच्या ८७व्या वर्षी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या जाण्याने मराठी रंगभूमीने अभिनयाची उपासना करणारा, कलेशी अखंड निष्ठा राखणारा आणि रंगभूमीला आयुष्य अर्पण करणारा एक सच्चा रंगकर्मी गमावला. ३ मे १९३६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यात जन्मलेल्या जयंत सावरकरांनी उपजीविकेसाठी मुंबई गाठली. काही काळ त्यांनी नोकरी केली; मात्र अभिनयाची ओढ त्यांना स्वस्थ बसू देईना. अखेर त्यांनी नोकरीचा सुरक्षित मार्ग सोडून रंगभूमीचा खडतर प्रवास स्वीकारला. त्यांच्या या निर्णयाला सुरुवातीला कुटुंबातून विरोध झाला, तरीही त्यांनी आपल्या ध्येयाशी तडजोड केली नाही.

कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात त्यांनी बॅकस्टेज कलाकार म्हणूनही काम केले. मात्र संयम, जिद्द आणि स्वतःच्या कर्तृत्वावर असलेला विश्वास यामुळे त्यांना अभिनयाच्या संधी मिळू लागल्या. भूमिका मोठी की छोटी, यापेक्षा ती किती परिणामकारक आहे, यालाच त्यांनी महत्त्व दिले. त्यामुळे अगदी छोट्या भूमिकांमधूनही त्यांनी आपल्या अभिनयाची वेगळी छाप उमटवली आणि अल्पावधीतच मराठी रंगभूमीवरील एक प्रभावी अभिनेता म्हणून ओळख निर्माण केली. पुढे त्यांनी अनेक नाटकांत प्रमुख भूमिका साकारल्या. एकच प्याला मधील तळीराम, तुझे आहे तुजपाशी मधील आचार्य, व्यक्ती आणि वल्ली मधील



अंतू बर्वा आणि हरितात्या या भूमिका आजही रसिकांच्या स्मरणात आहेत. सौजन्याची ऐसी तैशी, टिळकआगरकर, ययातीदेवयानी आणि सूर्यास्त यांसारख्या नाटकांमधील त्यांचा अभिनय विशेष गाजला.

मामा पेंडसे, केशवराव दाते, दत्ताराम यांच्यापासून ते चंद्रकांत कुलकर्णी आणि मंगेश कदम यांसारख्या विविध पिढ्यांतील दिग्दर्शकांसोबत त्यांनी काम केले. शंभरहून अधिक नाटकांबरोबरच तीसहून अधिक मराठी व हिंदी चित्रपट आणि अनेक दूरचित्रवाणी मालिकांमधूनही त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. तरीही त्यांची खरी ओळख रंगभूमीवरील सिद्धहस्त कलाकार अशीच राहिली.

जयंत सावरकर यांच्या अभिनयात कृत्रिमता नव्हती. सहज, नैसर्गिक आणि जीवनाशी जोडलेला अभिनय हे त्यांचे वैशिष्ट्य होते.

त्यामुळे रंगमंचावरची त्यांची प्रत्येक व्यक्तिरेखा प्रेक्षकांना आपल्या घरातील एखाद्या माणसासारखी वाटायची. अभिनयातील ही सहजता आणि प्रामाणिकपणाच त्यांच्या लोकप्रियतेचे खरे रहस्य होते. त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत त्यांना अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले. अखिल भारतीय नाट्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. तसेच १९९७ मध्ये भरलेल्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले. ''एक छोटा माणूस'' हे त्यांचे आत्मचरित्र त्यांच्या कलाप्रवासाचे प्रेरणादायी दस्तऐवज आहे.

आज त्यांच्या तिसऱ्या स्मृतिदिनी त्यांची आठवण काढताना जाणवते की, कलाकाराचे शरीर काळाच्या पडद्याआड जाते; परंतु त्याची कला आणि त्याने साकारलेल्या भूमिका कायम जिवंत राहतात. जयंत सावरकर यांनी आपल्या अभिनयातून मराठी रंगभूमीला समृद्ध केले आणि असंख्य कलाकारांना प्रेरणा दिली. त्यांचे योगदान मराठी नाट्यविश्व कधीही विसरणार नाही.

ज्येष्ठ रंगकर्मी स्वर्गीय जयंत सावरकर यांना तिसऱ्या स्मृतिदिनी भावपूर्ण विनम्र अभिवादन!

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२४ जुलै

१) श्रीम.आशा काशिनाथ म्हात्रे
ठिकरूळ नाका, अलिबाग,
दि.२४-७-१९४७

२)श्री.प्रशांत वसंत घरत
मु.चेंढरे, अलिबाग
दि.२४-७-१९५५

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८
**(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**कु. किआरा सुनील जैन, वाढदिवस अलिबाग**

# कुंडलिका नदी
# पुलावरील प्रवास धोकादायक

## ● तीन वेळा पुराचा तडाखा ● संरक्षण कठडे वाहून गेले



**। रोहा । प्रतिनिधी ।**

रोहा शहरातील कुंडलिका नदीवरील पुलावर संरक्षण कठडे तुटून वाहून गेल्याने वाहनचालक आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पुलावरून प्रवास करताना नागरिकांना जीव मुठीत धरून मार्गक्रमण करावे लागत आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने संरक्षण कठडे उभारण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

६ जुलै रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे कुंडलिका नदीला मोठा पूर आला होता. त्यानंतर सलग चार दिवस झालेल्या अतिवृष्टीमुळे या कालावधीत तब्बल तीन वेळा कुंडलिका नदीला मोठा पूर आला. पुराच्या प्रत्येक लोंढ्यात नदीचा प्रवाह अत्यंत वेगवान होता. त्यामुळे पुलाला सार्वजनिक बांधकाम उपविभागाने बसविलेले लोखंडी संरक्षण कठडे पूर्णपणे पाण्याखाली गेले. अखेर प्रचंड वेगाच्या पाण्याच्या प्रवाहापुढे हे कठडे टिकू शकले नाहीत. पाण्याच्या प्रवाहासोबत अनेक ठिकाणी हे कठडे तुटून वाहून गेले असून या मार्गावरून प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांसहित वाहनचालक तसेच प्रवासी नागरिक यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. सध्या पुलाच्या कडेला संरक्षण कठडे नसल्यामुळे विशेषतः रात्रीच्या वेळी, मुसळधार पावसात किंवा कमी दृश्यमानतेच्या परिस्थितीत वाहनचालकांसाठी मोठा धोका निर्माण झाला आहे. एखाद्या वाहनाचे नियंत्रण सुटल्यास अथवा घसरल्यास थेट नदीपात्रात कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. पुराच्या पाण्यात संरक्षण कठडे वाहून गेल्याने पुलावर प्रवास करणे अथवा पायपीट करणे जिकिरीचे जात आहे त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने संरक्षण कठडे उभारण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

### मजबूत, टिकाऊ संरक्षण कठडे बसवावेत

रोहा शहर आणि परिसराला जोडणारा हा पूल अत्यंत महत्त्वाचा असल्याने दररोज हजारो वाहनांची ये-जा येथे सुरू असते. त्यामुळे कोणतीही दुर्घटना घडण्यापूर्वीच सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने कुंडलिका नदी पुलावर मजबूत व टिकाऊ संरक्षण कठडे बसवून नागरिकांच्या सुरक्षिततेची खात्री करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.



# 'किमान एक तरी झाड लावा'

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याने पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. वाढते प्रदूषण, तापमानातील वाढ आणि नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण लक्षात घेता वृक्षसंवर्धनाची गरज पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाची बनली आहे. पर्यावरणाचे संरक्षण ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असून, विकासकामे करताना पर्यावरणाचा समतोल राखणे आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर नागरिकांनी ''प्रत्येकाने किमान एक झाड लावा आणि त्याचे संगोपन करा'' असे आवाहन नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांनी केले. त्या कोकण उन्नती मित्र मंडळाचे वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय बॅ.ए.आर.अंतुले संकुल मुरूड जंजिरा महाविद्यालयातील सभागृहात स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण कार्यक्रमावेळी बोलत होत्या. कार्यक्रमाची सुरुवात माजी उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तद्नंतर मान्यवरांकडून पुष्पवृष्टी करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर नगराध्यक्षा आराधना दांडेकर व मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयातील प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले.

पान १ वरुन

## भरपावसात पनवेल दणाणले!

थांबवा'', ''नीट प्रक्रियेत पारदर्शकता आणा'' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांनी दाखविलेल्या निर्धारामुळे आंदोलनाने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

शेकाप, मनसे आणि वंचितच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांना पाठिंबा देत शासनाने तातडीने हस्तक्षेप करून विद्यार्थ्यांवरील अन्याय दूर करावा, अशी मागणी केली. नीट प्रवेश प्रक्रियेतील त्रुटींमुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य धोक्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला. यावेळी शेकापचे माजी आ. बाळाराम पाटील यांनीही सरकारला खडे बोल सुनावले. तसेच विद्यार्थ्यांच्या पाठीशी शेतकरी कामगार पक्ष कायम आहे, असा विश्वास यावेळी उपस्थित असणाऱ्या विद्यार्थ्यांना दिला.

आंदोलनामुळे काही काळ परिसरातील वाहतुकीवर परिणाम झाला. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवत परिस्थिती नियंत्रणात ठेवली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर शासनाने त्वरित सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला.

भरपावसात विद्यार्थ्यांनी दाखविलेला निर्धार आणि विविध राजकीय पक्षांनी दिलेला पाठिंबा यामुळे हे आंदोलन शहरात चर्चेचा विषय ठरले आहे. आता विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत शासन कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## देशभरात रस्त्यावर उतरणार विद्यार्थी

शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी आंदोलनातून करण्यात येणार आहे.

देशभरातील विद्यार्थी आणि युवकांनी शांततापूर्ण मार्गाने लोकशाही पद्धतीने आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन करत पत्रकाच्या शेवटी इन्कलाब जिंदाबाद आणि भारत माता की जय अशा घोषणा देण्यात आल्या आहेत.

## विद्यार्थ्यांवरील दडपशाही खपवून घेणार नाही

लेस्ली डिसुझा उपस्थित होते.

यावेळी अ‍ॅड. साम्या कोरडे यांनी स्वतःला करण्यात आलेल्या हाऊस अरेस्टचा उल्लेख करत, ही पद्धत आणीबाणीच्या काळाची आठवण करून देणारी असून, सरकार आणि पोलीस यंत्रणा लोकशाहीऐवजी दडपशाहीचा मार्ग स्वीकारत असल्याचा आरोप केला. नागरिकांना घरातच रोखणे, आंदोलनात सहभागी होण्यापासून अडवणे आणि कायदेशीर प्रक्रियेविना ताब्यात घेणे हे पूर्णपणे बेकायदेशीर असल्याचे त्यांनी सांगितले.

अ‍ॅड. विक्रांत खरे यांनी विद्यार्थ्यांवर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, भारतीय न्याय संहिता आणि मुंबई पोलीस कायद्यांतर्गत दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. दादर स्थानक परिसरातून विद्यार्थ्यांना ताब्यात घेणे, मोबाईल फोन जप्त करणे, त्यांची तपासणी करणे, मोबाईल लोकेशन आणि व्हॉट्सअ‍ॅप लाईव्ह लोकेशन शेअर करण्यास भाग पाडणे, हे नागरिकांच्या गोपनीयतेच्या आणि स्वातंत्र्याच्या अधिकारावर थेट अतिक्रमण असल्याचा दावा त्यांनी केला.

अ‍ॅड. कल्याणी माणगावे यांनी लेखी आदेशाशिवाय आंदोलकांना ताब्यात घेणे कोणत्याही कायद्यात मान्य नसल्याचे सांगत अशा कारवाया पूर्णपणे बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट केले.

छात्रभारतीचे लेस्ली डिसुझा यांनी सांगितले की, २२ जुलैच्या मध्यरात्रीपर्यंत जमावबंदी लागू नसतानाही विद्यार्थ्यांना ताब्यात घेणे, नोटिसा बजावणे आणि त्यांच्याविरोधात गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. अनेक विद्यार्थ्यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३५(३) अंतर्गत नोटिसा देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

एआयएसएफचे कॉ. आमिर काझी यांनी पोलिसांनी ताब्यात घेताना केलेल्या कथित धक्काबुक्कीमुळे स्वतःला गंभीर दुखापत झाल्याचा आरोप केला. वैद्यकीय तपासणी आणि एमआरआय करण्यापूर्वीच गुन्हा दाखल करण्याची घाई पोलिसांनी केल्याचा दावा करत विद्यार्थ्यांशी अमानुष वागणूक दिली जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

पत्रकार परिषदेत शांततापूर्ण आंदोलन, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संचार स्वातंत्र्य आणि गोपनीयतेचा अधिकार हे भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला बहाल केलेले मूलभूत अधिकार असल्याचे अधोरेखित करण्यात आले. या अधिकारांवर गदा आणणाऱ्या कोणत्याही कारवाया बेकायदेशीर असून, विद्यार्थ्यांवर दाखल करण्यात आलेल्या सर्व कारवायांविरोधात न्यायालयीन लढा सुरू राहील, असे संघटनेने स्पष्ट केले.

आंदोलन करणे हा गुन्हा नसून संविधानाने दिलेला अधिकार आहे. विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठीचा लढा कोणत्याही दडपशाहीसमोर थांबणार नाही. लोकशाही आणि संविधानाच्या चौकटीत राहून संघर्ष अधिक तीव्र करण्यात येईल, असा निर्धार पुरोगामी विद्यार्थी संघटनेने व्यक्त केला.

## विद्यार्थ्यांवरील लाठीहल्ल्याचा निषेध

घोषणांनी अलिबाग शहर दणाणून गेले.

अलिबाग तालुका काँग्रेसचे अध्यक्ष सुनील थळे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस भवन येथे प्रथम निदर्शने करण्यात आली. त्यानंतर काँग्रेस भवन ते मारुती नाका, बालाजी नाका, महावीर चौक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक असा भव्य मोर्चा काढण्यात आला. पायी निघालेल्या या मोर्चात मोठ्या संख्येने काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.

या आंदोलनात माजी अध्यक्ष योगेश मगर, नगरसेवक समीर ठाकूर, काका ठाकूर, उमेश ठाकूर, भास्कर चव्हाण, आकाश राणे, अभय म्हामुणकर, प्रभाकर राणे, सरोज डाकी, कृष्णा भोपी, अ‍ॅड. दिनेश सोष्टे, शैलेश घरत यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

यावेळी दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा देताना सोनम वांगचुक आणि अभिजीत दिपके यांच्यासह आंदोलनात सहभागी युवकांवरील पोलीस कारवाईचा निषेध करण्यात आला. विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीहल्ल्याचा आणि राहुल गांधी यांना दिलेल्या कथित वागणुकीचा निषेध व्यक्त करत कार्यकर्त्यांनी महायुती सरकार व भाजपविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

मोर्चाची सांगता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात झाली. येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न, लोकशाही मूल्यांची कथित पायमल्ली आणि विद्यार्थ्यांवरील अन्यायकारक कारवाईविरोधात काँग्रेसने तीव्र निषेध व्यक्त केला.

## नागपूरमध्ये रणकंदन

मुदत संपल्याचे सांगत पोलिसांनी येथे काही युवकांना ताब्यात घेतले.आंदोलनकर्त्यांनी आपल्या मागण्यांसाठी रात्रभर ठाण मांडण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, आंदोलनासाठी पोलिसांनी केवळ सात वाजेपर्यंतचीच वेळ दिली होती. त्यानंतरही आंदोलक रात्री उशिरापर्यंत ठाण मांडून होते. शेवटी पोलिसांनी बळाचा वापर करीत त्यांना गाडीत डांबले.

## पेपरफुटीप्रकरणी कथित सूत्रधाराला क्लीन चिट

या प्रकरणात सीबीआयने ४५ जणांविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले असून, संजीव मुखियाविरुद्ध पुरावे न मिळाल्याने त्याचे नाव आरोपपत्रात समाविष्ट करण्यात आलेले नाही. मात्र, इतर पेपरफुटी प्रकरणांतील गुन्ह्यांमुळे तो सध्या न्यायालयीन कोठडीतच आहे.

## शेकाप वर्धापनदिनाच्या तयारीला वेग

या सभांमधून कार्यकर्त्यांशी संवाद साधत वर्धापन दिनाच्या नियोजनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या दौऱ्यात शेकाप नेत्या तथा रायगड जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकापच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, महिला आघाडी प्रमुख अ‍ॅड. मानसी म्हात्रे, कामगार आघाडी प्रमुख प्रदीप नाईक, जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, अतुल म्हात्रे आणि प्रमोद घासे यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

२ ऑगस्ट रोजी होणाऱ्या वर्धापन दिन सोहळ्यास हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पदाधिकाऱ्यांकडून करण्यात येत आहे. जिल्हाभर सुरू असलेल्या या सभा आणि बैठकींना कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, पक्षाच्या वर्धापन दिनाबाबत कार्यकर्त्यांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

२२ जुलैपासून सुरू झालेल्या या दौऱ्याचा समारोप २७ जुलै रोजी होणार आहे. त्या दिवशी सकाळी १० वाजता शेतकरी भवन येथील सभागृहात बैठक आयोजित करण्यात आली असून, त्यानंतर दुपारी साडेबारा वाजता उरण आणि दुपारी २ वाजता पनवेल येथे दौरा होणार असल्याची माहिती जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांनी दिली. या सर्व बैठकींना कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

## मुद्रांक कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाला यश

सोमवारी (दि. २०) अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

या आंदोलनात नोंदणी व मुद्रांक विभाग अराजपत्रित अधिकारी व कर्मचारी संघटनेचे रायगड जिल्हाध्यक्ष विक्रांत आंब्रस्कर, उपाध्यक्ष एम.डी. पवार, सचिव पी.एस. पालवणकर, खजिनदार सोनम गोळे, धन्यता पावशे, पी.एस. दळवी, जे.जे. बारे, एस.एच. पिंपळे, जी.एस. चव्हाण यांच्यासह शेकडो अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

आंदोलकांनी आरोपींवर कठोर कलमांखाली कारवाई करावी, संबंधित निष्काळजी अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात यावी तसेच नोंदणी व मुद्रांक विभागाच्या सर्व कार्यालयांना महाराष्ट्र सुरक्षा दलाची सुरक्षा उपलब्ध करून द्यावी, अशा प्रमुख मागण्या केल्या होत्या.

या आंदोलनामुळे राज्यभरात दस्तनोंदणी, मालमत्ता खरेदी-विक्रीसह हजारो व्यवहार ठप्प झाले होते. परिणामी, कोट्यवधी रुपयांची आर्थिक उलाढालही खोळंबली होती. अखेर पुणे पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेऊन अटक केल्यानंतर संघटनेने आंदोलन मागे घेत नियमित शासकीय कामकाज सुरू करण्याचा निर्णय घेतला.

## करदात्यांच्या शंकांचे अलिबागमध्ये निरसन

यावेळी ठाणे येथील उपआयकर आयुक्त शैलेश कुमार, आयकर अधिकारी गिरीश कांबळे आणि पनवेल येथील आयकर अधिकारी रत्नेश कुमार यांनी करदाते व कर कपात करणाऱ्यांना टीडीएसची अंमलबजावणी, आयकर नियम, कर भरण्याची प्रक्रिया तसेच विविध कायदेशीर बाबींविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देत अधिकाऱ्यांनी संवादात्मक पद्धतीने शंकानिरसन केले.

रायगड जिल्ह्यातील सुमारे ७० करदाते आणि कर कपात करणाऱ्यांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला. अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक यांनीही कार्यशाळेला उपस्थित राहून आयकर विभागाच्या जनजागृती उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी त्यांनी उपआयकर आयुक्त शैलेश कुमार यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

याप्रसंगी बोलताना नगराध्यक्षा अक्षया नाईक म्हणाल्या, करप्रणालीबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी अशा कार्यशाळा अत्यंत उपयुक्त आहेत. करदात्यांनी अशा उपक्रमांचा लाभ घेऊन करासंदर्भातील नियम व जबाबदाऱ्या समजून घ्याव्यात.

## पन्नास हजारांची लाच पडली महागात

या कार्यालयात तक्रारदाराने अर्ज केला होता. मात्र, रोहित मोरे यांनी हा अहवाल देण्यासाठी ५० हजार रुपयांची लाच १३ जुलै रोजी मागितली. अखेर तक्रारदाराने नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक कार्यालयात तक्रार केली. घटनेचे गांभीर्य ओळखून उपअधीक्षक धर्मराज सोनके यांनी कारवाईची मोहीम हाती घेतली. तक्रारीच्या पडताळणीनंतर मोरे याने लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर गुरुवारी (दि. २३) पथकामार्फत सापळा रचून ५० हजार रुपये घेताना रंगेहाथ पकडले. त्यामध्ये पाचशेच्या १००च्या नोटांचा समावेश होता. धर्मराज सोनके यांच्या मार्गदर्शनाखाली या कारवाईत त्यांच्या पथकाचे मोलाचे योगदान राहिले.

## महाडमध्ये पोलिसांची कारवाई

पोलिसांनी मद्यसाठ्यासह अर्टिगा वाहन असा एकूण १० लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या कारवाईत आकाश विलास महाबळे (२४, रा. पुनाडेवाडी, ता. महाड) आणि सुरेश कोंडू गोरे (४८, रा. हिरकणीवाडी, ता. महाड) यांना ताब्यात घेण्यात आले. दोघांविरुद्ध महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक नारायण एकशिंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीमती राधौत करीत आहेत. अवैध मद्यविक्री व वाहतुकीविरोधातील मोहीम पुढेही अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला असून, या कारवाईचे नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे.

## टाळ-मृदुंगाच्या गजरात अलिबाग विठ्ठलमय

डॉ. नितीन गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या उपक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे संस्थेच्या अध्यक्षा उज्ज्वला चंदनशिव-चव्हाण यांनी अलिबाग ते वरसोली हा संपूर्ण पालखी सोहळा पालखी खांद्यावर घेत पायी पूर्ण केला. त्यांच्या भक्तिभाव, समर्पण आणि सेवाभावाने उपस्थित वारकरी व भाविकांना प्रेरणा दिली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी माथाडी कामगार संघटना, स्वयंसेवक, सामाजिक संस्था, महिला बचत गट, लायन्स क्लब, जागृती फाऊंडेशन, विद्यार्थी आणि सर्व वारकरी भक्तांचे आयोजकांनी आभार मानले. 'एक दिवस तरी वारी अनुभवावी' या उपक्रमातून भक्ती, सेवा, संस्कार आणि सामाजिक ऐक्याचा अनोखा संदेश अलिबागकरांपर्यंत प्रभावीपणे पोहोचला. या उपक्रमाचे अलिबागमध्ये सर्व स्तरातून कौतुक करण्यात येऊन आयोजकांचे आभार मानण्यात आले.

---

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये जप्ती आदेश

जा.क्र./ /कलम १५६/मिळकत जप्ती/२०२६-२७
विशेष वसुली अधिकारी, अलिबाग यांचे कार्यालय
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या
अलिबाग मुख्य कार्यालय
दिनांक : २२/०७/२०२६

**: जप्ती आदेश :**

वाचले : १.मा.सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सहा. निबंधक, सह. संस्था-अलिबाग यांचे कार्यालयाकडील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये मिळालेला वसुलीचा दाखला क्रमांक ३२२/२०१७-१८/१२/०६/२०१७

२. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७

३. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था रायगड अलिबाग यांचेकडील आदेश क्रमांक जाक्र.जिउनि/कात-६/कलम-१५६/आदेश /रायगड जि.म.स. बँक/९८२/सन २०२६ दिनांक ४ मे २०२६ रोजीचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ (१) व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ चे अधिकार प्रदान आदेश

१ ज्याअर्थी, मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग यांनी १. श्री नितीन शंकर तुणतुणे मु. सहाणगोठी, पो. कुरुळ, ता. अलिबाग जि रायगड, कर्जदार २. श्री संदीप धोंडू घरत मु. पो. वेश्वी, ता. अलिबाग जि रायगड, ३. श्री सुधिर लक्ष्मण म्हात्रे मु. वेलवली, पो.मापगाव, ता. अलिबाग जि. रायगड ४. श्री संदेश तुकाराम थळे मु. बहिरोळे, पो. मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड तारणदार यांचे विरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र, दिनांक १२ जून २०१७ रोजी दिलेला आहे;

२. आणी ज्याअर्थी, विशेष वसुली अधिकारी, अलिबाग यांनी नियम १०७ अन्वये नोटीस रा.जि.म.स./वसुली/०५/ सब सन दिनांक ३१ मे २०२१ रोजी मागणी नोटीस देणेत आली होती;

३. आणि, ज्याअर्थी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था रायगड अलिबाग यांचेकडील आदेश क्रमांक जाक्र.जिउनि/कात -६/कलम -१५६/आदेश/रायगड जि.म.स.बँक/९८२/सन २०२६ दिनांक ४ मे २०२६ रोजीचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ (१) व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ चे अधिकार प्रदान आदेशाने श्री किरण कमळाकांत राउत निम्न स्वाक्षरीदार यांना कलम १५६ व नियम १०७ चे अधिकार प्रदान करणेत आले आहेत;

४. आणी ज्याअर्थी श्री नितीन शंकर तुणतुणे मु. सहाणगोठी, पो. कुरुळ, ता. अलिबाग जि रायगड, कर्जदार, वसुली दाखल्यात नमुद रक्कमेची वसुली व रक्कमेचा भरणा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग यांचेकडे केलेला नाही. तसेच त्यांचेकडून अद्यापी दिनांक २१ जुलै २०२६ अखेर रक्कम रुपये ४,२८,४१९/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख अठ्ठावीस हजार चारशे एकोणीस मात्र) अधिक व्याज दिनांक ०१/०४/२०१७ पासुन पुढील व्याज, खर्च, शासकीय अधिभार इ.वसुल करावयाचे आहेत,

५. आणी, ज्याअर्थी, विशेष वसुली अधिकारी, अलिबाग यांचे असे निदर्शनास आले आहे की, वसुली प्रमाणपत्र मध्ये नमुद श्री संदेश तुकाराम थळे मु. बहिरोळे, पो. मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड, यांच्या मालकी वहिवाटीची व हिश्श्याची स्थावर मिळकत खालीलप्रमाणे आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

मौजे मापगाव, तलाठी सजा मापगाव, सिटी सर्व्हे अलिबाग, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड तसेच मे.सह. दुय्यम निबंधक व तहसिलदार अलिबाग यांच्या अधिकार/ कार्यक्षेत्रातील हद्दीतील स्थावर मिळकत पुढीलप्रमाणे

| मिळकतदाराचे नांव | मिळकतीचा तपशिल | मिळकत क्रमांक |
|---|---|---|
| श्री संदेश तुकाराम थळे | शेतजमीन पड जमीन गाव मापगाव हद्दीतील मिळकत क्र १७७/३ क्षेत्र १.६७.०५ हे. आर | १७७/३ |

६. ज्याअर्थी वसुली अधिकारी, अलिबाग यांच्या असेही निदर्शनास आले आहे की, श्री संदेश तुकाराम थळे मु. बहिरोळे, पो. मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड ह्यांच्या हिश्श्याची वर नमूद केलेली स्थावर मालमत्ता जप्त करुन विक्री केल्यास यांचेकडून येणेबाकी असलेली रक्क्म वसूल होणे शक्य आहे.

त्याअर्थी मी विशेष वसुली अधिकारी, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**: आदेश :**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ (११) ड त्यातील संबंधित पोटनियमाद्वारे मला प्राप्त झालेले अधिकार व तरतुदीस अनुसरुन मी, श्री किरण कमळाकांत राउत वसुली अधिकारी, अलिबाग, द्वारा/- रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग, श्री संदेश तुकाराम थळे मु. बहिरोळे, पो. मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड यांची खाली वर्णन केलेली त्यांचे मालकी वहिवाटीची व हिश्श्याची स्थावर मिळकत या आदेशान्वये जप्त करीत आहे.

१. जप्त करण्यात आलेल्या स्थावर मिळकतीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

मौजे मापगाव, तलाठी सजा मापगाव, सिटी सर्व्हे अलिबाग, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड तसेच मे. सह. दुय्यम निबंधक व तहसिलदार अलिबाग यांच्या अधिकार/ कार्यक्षेत्रातील हद्दीतील स्थावर मिळकत पुढीलप्रमाणे

| मिळकतदाराचे नांव | मिळकतीचा तपशिल | मिळकत क्रमांक |
|---|---|---|
| श्री संदेश तुकाराम थळे | शेतजमीन पड जमीन गाव मापगाव हद्दीतील मिळकत क्र १७७/३ क्षेत्र १.६७.०५ हे. आर | १७७/३ |

२. श्री संदेश तुकाराम थळे मु. बहिरोळे, पो. मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड आणि त्यांचे प्रतिनिधी अगर दलाल यांना सदर मालमत्तेची विक्री करणे अगर त्यावर बोजा निर्माण करणे अगर सदर मालमत्तेचे कोणत्याही तऱ्हेने हस्तांतरण करणे यास या आदेशाने प्रतिबंध करण्यात येत आहे.

३. तमाम लोकांस कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या आणि जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेबाबत. श्री संदेश तुकाराम थळे मु. बहिरोळे, पो. मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड अगर त्यांचे प्रतिनिधी अगर दलाल यांचेबरोबर कसलाही कोणताही व्यवहार करु नये. या आदेशाविरुध्द कोणास कोणत्याही स्वरुपाची हरकत घेणे असल्यास/नोंदविणे असल्यास खाली सही करणार यांना लेखी पुराव्यानिशी ३० दिवसात कळविण्यात यावे, अन्यथा अशी कोणतीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कारवाई केली जाईल. या आदेशाविरुध्द यदा कदाचित कोणाही इसमाने वरील मिळकतीबाबत. श्री संदेश तुकाराम थळे मु. बहिरोळे, पो. मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड अगर त्यांचे प्रतिनिधी, अगर दलाल यांचेबरोबर व्यवहार केल्यास सदर व्यवहार खाली सही करणार व वसुली प्रमाणपत्र/अ‍ॅवॉर्ड धारण करणार रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग यांचेवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

४. श्री नितीन शंकर तुणतुणे मु. सहाणगोठी, पो. कुरुळ, ता. अलिबाग जि रायगड, व इतर यांनी हा आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत दिनांक २१ ऑगस्ट २०२६ अखेर रक्कम रुपये ४,२८,४१९/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख अठ्ठावीस हजार चारशे एकोणीस मात्र ) अधिक दिनांक ०१/०४/२०१७ पासून होणारे व्याज तसेच वसुलीचा खर्च, शासकीय अधिभार वसुल करावयाचे भरणा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग यांचेकडे समक्ष भरणा करावा.

५. श्री नितीन शंकर तुणतुणे मु. सहाणगोठी, पो. कुरुळ, ता. अलिबाग जि रायगड, व इतर यांनी संपूर्ण रक्कमेचा भरणा वरील मुदतीत केला नाही तर त्यांच्या वर नमूद केलेली आणि जप्त केलेल्या स्थावर मिळकतीची विक्री करण्यात येईल व सदर विक्रीच्या रकमेतून बँकेस येणे असलेल्या रकमेची वसुली करण्यात येईल.

६. महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम १४६(न) मधील तरतुदीनूसार, ''एखाद्या संस्थेच्या सदस्याने संस्थेचा अग्रहक्क असलेल्या मालमत्तेची लबाडीने विल्हेवाट लावणे किंवा एखाद्या सदस्याने किंवा अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने किंवा कोणत्याही व्यक्तीने संस्थेची देणी टाळण्याच्या लबाड उद्देशाने विक्री, हस्तांतर, गहाण, देणगी, बक्षीसपत्र याद्वारे किंवा अन्यथा आपल्या मालमत्तांची विल्हेवाट लावणे अपराध ठरेल याची नोंद घ्यावी.

हा आदेश कार्यालयीन शिक्का व माझे स्वाक्षरीसह दिनांक २२ जुलै २०२६ रोजी दिला आहे.

स्थळ : अलिबाग
दिनांक : २२/०७/२०२६

सही/-
**(श्री किरण क राउत )**
**विशेष वसुली अधिकारी, अलिबाग**
**(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७)**
**द्वारा/- रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग**

प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सादर

१. मा. तहसिलदार अलिबाग / सिटी सर्व्हे, अलिबाग
यांना विनंती करण्यात येते की, कृपया वरील जप्तीच्या आदेशाची आपल्याकडील अभिलेखी नोंद घ्यावी व बँकेच्या बोजाची नोंद करावी व तसे आम्हास वरील कार्यालयीन पत्त्यावर कळवावे-

२. तलाठी सजा मापगाव तालुका अलिबाग
आपण या आदेशाची दंवडी पिटवुन घोषित करणेत यावी. तसेच दंवडी नोंदणी नोंदवहीचा प्रत सोबत सादर करावी.

३. सहाय्यक दुय्यम निबंधक, अलिबाग

४.मा शाखा व्यवस्थापक साहेब रा जि म सह बँक जिल्हा परिषद शाखा

५. मा. सरव्यवस्थापक साहेब, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग यांना सविनय सादर

## निवडक



### कुडलीत अजितदादांची जयंती साजरी

**सुतारवाडी** : कुडली केंद्र शाळेत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे मुख्याध्यापक मोहन राठोड यांनी अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून केली. यानंतर उपस्थितांनी प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या कार्याला उजाळा दिला. यावेळी शिक्षक अविनाश जाधवर, संदीप राठोड तसेच इयत्ता पहिली ते सातवीमधील सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक मोहन राठोड यांनी विद्यार्थ्यांना अजितदादा पवार यांच्या नेतृत्व गुणांविषयी, विकास कामांविषयी तसेच शिक्षणाचे महत्त्व पटवून देत त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

### लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ आंदोलन

**पाली/वाघोशी** : दिल्लीतील जंतरमंतर येथे नीट व इतर स्पर्धा परीक्षांतील कथित पेपरफुटीविरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ बुधवारी पाली येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात विविध सामाजिक, विद्यार्थी व राजकीय संघटनांनी तीव्र निषेध व्यक्त करत आंदोलन केले. विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, पेपरफुटी कायमची थांबवावी तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी बहुजन विद्यार्थी



संघटनेचे रायगड जिल्हाध्यक्ष अमित गायकवाड यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. विद्यार्थी आपल्या हक्कासाठी शांततेने आंदोलन करत असताना त्यांच्यावर लाठीमार केला जातो, ही लोकशाहीची हत्या आहे. पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य उध्वस्त होत असताना सरकार दोषीं-वर कारवाई करण्याऐवजी आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करत आहे. हा विद्यार्थ्यांच्या स्वप्नांवर झालेला हल्ला असून देशातील तरुणाई हा अन्याय सहन करणार नाही, असे घणाघाती वक्तव्य केले. या आंदोलनात अमित निंबाळकर, मनसे तालुका अध्यक्ष सुनील साठे, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष स्वप्निल गायकवाड यांच्यासह विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पाली पोलिसांच्या चोख बंदोबस्तात आंदोलन शांततेत पार पडले.

### तटकरे महाविद्यालयात 'भारतीय शिक्षण दिन'

**| माणगाव | प्रतिनिधी |**

संस्कृति उत्थान न्यास व माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने द. ग. तटकरे महाविद्यालयातील बी.एम. एस. (प्रबंधन अध्ययन स्नातक) विभागातर्फे ङ्गभारतीय शिक्षण दिनफ या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने महाविद्यालय परिसरात वृक्षारोपणाचा सामाजिक उपक्रमही राबविण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन, सरस्वती पूजन तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरेचे कुलसचिव डॉ. अमित शेष होते. शिक्षा संस्कृती उत्थान न्यासच्या संयोजिका डॉ. मनप्रीत कौर यांनी शिक्षा संस्कृती उत्थान न्यास एवं न्यास के विविध आयामम या विषयावर मार्गदर्शन केले. प्रा. श्रीनिवास वारखंडकर यांनी पंच परिवर्तन या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधत अभ्यासपूर्ण विचार मांडले. प्रभारी प्राचार्य डॉ. जे. आर. पांडेय यांनी प्रास्ताविकातून कार्यशाळेच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजेंद्र आचार्य, डॉ. संगीता उतेकर, डॉ. बबन सिनगारे, प्रा. दिपेश केकाणे, प्रा. स्वप्नील सकपाळ, प्रा. देवांक परब, प्रा. मंजिरी सावंत प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, संस्थेचे पदाधिकारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. सुष्मिता महामुणकर व प्रा. शाश्वती महाडिक यांनी केले.

### डॉ. नानासाहेबांच्या प्रतिमेचे अनावरण



**रसायनी** : महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्मधिकारी, व पदमश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या प्रतिमा अनावरण रसायनीतील ग्रामपंचायत तुराडे येथे सरपंच रंजना गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी अनन्या गाताडे, रंजनाताई गायकवाड, लीना ठाकूर, मालती वाघमारे, विलास पाटील, पूजा भोईर, सचिन मते, ग्रामविकास अधिकारी अस्मिता मोकल, पाटील गुरुजी, प्रदीप माळी, संतोष वाघमारे, सतीश ठाकूर तसेच आशा सेविका, अंगणवाडी सेविका, सुनील म्हात्रे, ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्जुन ठाकूर यांनी केले. आभार प्रदर्शन विश्वनाथ गायकवाड यांनी केले. उपस्थित मान्यवर, ग्रामस्थ आणि महिलांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे सोहळा संस्मरणीय ठरला.


## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफची** आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, कॉन्टिनेंटल कुक, वेटर, हाऊसकिपर, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते ६ या वेळेत संपर्क साधावा. अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. **मोबाईल** : ७५५९१८४६१२
- **वाडगाव अलिबाग येथे विलावर** राहण्यासाठी एक जोडपे हवे आहे. कृपया पुढील नंबर वर संपर्क करावा. ९८२२९३८४४४
- **अलिबाग साईइन रिसॉर्ट येथे** बँक ऑफिससाठी रिटायर व्यक्ती Computer ज्ञान आवश्यक व वेटर पाहिजेत. अर्जासह समक्ष भेटा साई इन रिसॉर्ट, चोंढी, अलिबाग.
- **८-१५ ते १० या** वेळात घरकामासाठी बाई पाहिजे. संपर्क-९२८४५५५३१४

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**


# शांतता क्षेत्रात स्पीकरचा दणदणाट

## अलिबाग पोलिसांकडून बघ्याची भूमिका

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

**अलिबागमधील जिल्हा टपाल कार्यालय ते क्रीडा संकुल हा परिसर शांतता क्षेत्र म्हणून घोषित असून, या भागात ध्वनिक्षेपक व वाद्यांवर बंदी आहे. याच परिसरात गुरुवारी सत्ताधारी आमदारांच्या कार्यक्रमासाठी मोठ्या आवाजात स्पीकर लावण्यात आल्याचा प्रकार समोर आला. विशेष म्हणजे, या कार्यक्रमासाठी आपले सरकार पोर्टलवरून आवश्यक परवानगी घेण्यात आली नसल्याची माहिती समोर येत असून, पोलिसांनी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याची चर्चा रंगली आहे.**



जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांच्या हितासाठी हा परिसर शांतता क्षेत्र घोषित करण्यात आला आहे. या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे ध्वनिक्षेपक अथवा वाद्य वापरण्यास मनाई आहे. गणेशोत्सवातील मिरवणुकीतही या परिसरातून वाद्य न वाजविण्याचे आदेश असतात. मात्र, गुरुवारी (दि. २३) सकाळी शिंदे गटाच्या आमदारांच्या कार्यक्रमासाठी रुग्णालयाच्या हाकेच्या अंतरावर तीन ते चार स्पीकर लावण्यात आले होते.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ध्वनिक्षेपक वापरण्यासाठी आपले सरकार पोर्टलवरून परवानगी घेणे बंधनकारक आहे. मात्र, आयोजकांनी अशी कोणतीही परवानगी घेतली नसल्याची चर्चा असून, केवळ अलिबाग पोलीस ठाण्यात एक पत्र दिल्याचे समजते. त्यामुळे शांतता क्षेत्रात विनापरवाना ध्वनिक्षेपकाचा वापर करून नियमांचे उल्लंघन झाले का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### सौजन्याची रुग्णाहिका शल्यचिकित्सकांच्या नावावर

गुरुवारी जिल्हा रुग्णालय परिसरात आमदारांच्या सौजन्याने मोफत रुग्णवाहिका उपलब्ध करून दिल्याचा लोकार्पण सोहळा पार पडला. मात्र, एमएच-०६-बीडब्ल्यू-५३०३ क्रमांकाची ही रुग्णवाहिका जिल्हा शल्यचिकित्सकांच्या नावावर नोंद असून, तिची खरेदी २२ फेब्रुवारी २०२१ रोजी झाली असून, ९ एप्रिल २०२१ रोजी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात नोंदणी झाल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. या रुग्णवाहिकेची किंमत सुमारे १९ लाख ५७ हजार १८७ रुपये असल्याचे समजते. पाच वर्षांपूर्वी खरेदी झालेल्या सरकारी रुग्णवाहिकेचा आता लोकार्पण सोहळा का करण्यात आला? तसेच ती आमदारांच्या सौजन्याने दिल्याचा उल्लेख का करण्यात आला? असा प्रश्न उपस्थित होत असून, रुग्णवाहिकेचे मालक शासन की आमदार? अशी चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. कार्यक्रमादरम्यान ही रुग्णवाहिका जुनी असल्याची चर्चाही दबक्या आवाजात रंगली.

## सुधागड तालुक्यात मत्स्यबीज वाटप

**| पाली | प्रतिनिधी |**



महाराष्ट्रशासन कृषी विभागातर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माननीय उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून आत्मा योजना अंतर्गत सुधागड पाली तालुक्यातील ५० शेतकऱ्यांना शेततळे व जलकुंडामध्ये मत्स्य उत्पादन वाढीसाठी प्रति शेतकरी १००० मत्स्यबीजाचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम बुधवारी (दि. २२) जुलै रोजी उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमास पंचायत समिती सुधागडचे उपसभापती संदेश शेवाळे, निवडणूक नायब तहसीलदार नकुल पोळेकर, वन परि

क्षेत्र अधिकारी सोनवणे तसेच तालुका कृषी अधिकारी सुधागड पाली दयावंती कदम उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते रोहू, कटला व सायप्रिनस या मत्स्यबीजांचे शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले.

सुधागड पाली तालुक्यातील शेततळे व मागील वर्षी खोदण्यात आलेल्या जलकुंडातील पाण्याचा वापर संरक्षित सिंचनासाठी करण्यात येत असून, या जलस्रोतांमधून मत्स्यपालन व्यवसाय केल्यास शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होणार असल्याचे यावेळी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितली.

या कार्यक्रमास मंडळ कृषी अधिकारी पाली विनोद बोबडे, मंडळ कृषी अधिकारी परळी रामकिशन शिंदे तसेच सुधागड तालुक्यातील सर्व उपकृषी अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उप कृषी अधिकारी उदय भोसले यांनी विशेष परिश्रम घेतले. आत्मा योजने अंतर्गत शेततळे व जलकुंडांचा बहुउद्देशीय वापर करून संरक्षित सिंचनाबरोबरच मत्स्य उत्पादनातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याचा कृषी विभागाचा प्रयत्न असल्याचे तालुका कृषी अधिकारी कदम यांनी सांगितले.

## पेण स्मशानभूमीत वृक्षारोपण

**| माणगाव | प्रतिनिधी |**



जिथे जीवनाचा शेवटचा प्रवास संपतो, त्याच स्मशानभूमी परिसरात नवजीवनाची हिरवी पालवी फुलविण्याचा प्रेरणादायी उपक्रम पेण येथे राबविण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या स्तुत्य वृक्षारोपण उपक्रमाने उपस्थितांच्या मनाला स्पर्श केला.

छावा प्रतिष्ठान, बालाजी नर्सरी, माणगाव तसेच ग्रीन कम्युनिटीज फाऊंडेशन व त्यांच्या सहकाऱ्यांच्या संयुक्त विद्यमाने विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

मृत्यूच्या शांत साक्षीदार असलेल्या स्मशानभूमीत आज हिरव्या आशेची बीजे रुजली. भविष्यात हा परिसर वृक्षांच्या सावलीने नटावा, पर्यावरणाचा समतोल राखला जावा आणि पुढील पिढ्यांना स्वच्छ, सुंदर व हिरवेगार वातावरण लाभावे, या उदात्त भावनेतून हा उपक्रम साकारण्यात आला.

यावेळी उपस्थितांनी एक झाड, एक जीवन हा संदेश देत वृक्ष लावणे ही केवळ जबाबदारी नसून भावी पिढ्यांसाठी दिलेली अमूल्य भेट असल्याचे सांगितले. लावलेल्या प्रत्येक वृक्षाचे संगोपन करण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला.

परिसरातील नागरिकांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत करत आयोजकांचे कौतुक केले. समाजसेवा आणि पर्यावरण संवर्धन यांचा सुंदर संगम घडवून आणणारा हा उपक्रम पेण परिसरासाठी प्रेरणादायी ठरला. यावेळी प्रतिष्ठानचे संस्थापक निलेश थोरे, अमित ढाकवळ, प्रा. ओमकार देशमुख, मनोहर पाटील, कृष्णा मोंडे, सौरभ पांडे, श्रीराम कळंबे, रुपाली कासारे, समीर बक्कम, नयन पोटले, अमोल पवार, अनिकेत कांबळे, पूजा पवार, पंकज लहाने, रचना थोरे, परेश सांगळे, राजेश पवार, समीर पवार, सुबोध कासारे, अविनाश सोळंके, राहुल तळकर व इतर सदस्य उपस्थित होते.

## वर्गात 'एसआयआर'चे काम खारघरमधील शाळेत पालकांत नाराजी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

मतदारयादी अधिक पारदर्शक आणि निर्दोष करण्यासाठी निवडणूक आयोगतर्फे सुरु करण्यात आलेल्या मतदारयादी विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेच्या कामासाठी खारघरमधील काही शाळांमध्ये वर्गखोल्यांचा वापर करण्यात येत असल्याने विद्यार्थी-विद्यार्थिनी, पालक आणि शिक्षकांमधून नाराजी व्यक्त होत आहे. काही ठिकाणी एकाच वर्गात विद्यार्थ्यांना शिकवणी सुरु असताना त्याच खोलीत दुसऱ्या बाजूला निवडणुकीसंबंधी कागदपत्रांची पडताळणी, अर्ज स्वीकारणे आणि इतर प्रशासकीय कामे सुरु आहेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासात व्यत्यय येत असून, वर्गातील शैक्षणिक वातावरणावर परिणाम होत असल्याची तक्रार पालकांनी केली आहे.

प्रगणकांनी घरोघरी जाऊन मतदार पडताळणी करणे आवश्यक आहे. मात्र, बहुतांश बीएलओ शाळेत ठाण मांडून बसले आहेत. काही ठिकाणी एकच वर्ग खोली असल्यामुळे एकीकडे शिक्षक मुलांना धडे देत असल्याचे तर दुसरीकडे निवडणुकीच्या कामासाठी येणाऱ्या नागरिकांची सततची ये-जामुळे विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होत असल्याचे चित्र दिसत आहे.

## रेवदंड्यात नारळ उत्पादक शेतकऱ्यांसाठी कार्यशाळा

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**




नारळ उत्पादक शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, शासकीय योजना आणि उत्पादनवाढीच्या प्रभावी पद्धतींची माहिती मिळावी, या उद्देशाने नारळ विकास बोर्ड, ठाणे यांच्या माध्यमातून चौल-रेवदंडा परिसरातील शेतकऱ्यांसाठी विशेष नारळ लागवड प्रात्यक्षिक व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

रेवदंडा येथील दिलीप पाटील यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमादरम्यान तालुका कृषी मंडळ अधिकारी सूर्यवंशी यांनी शेतीसाठी उपयुक्त ठरणारे 'गोअमृत' घरच्या घरी तयार करण्याची पद्धत व फॉर्म्युला शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकासह समजावून सांगितला.

पीक वाढीसोबतच उत्पादनवाढीसाठी हे मिश्रण प्रभावी ठरू शकते याबद्दल माहिती त्यांनी दिली. तसेच जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या विविध कृषीविषयक योजनांचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

नारळ विकास बोर्डाचे उपसंचालक रवींद्र कुमार सिंह यांनी नारळ लागवडीसाठी उपलब्ध असलेले अनुदान, पाडेकऱ्यांसाठी 'केरा सुरक्षा योजना', नारळाच्या वाढीसाठी मोफत खत तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. शेतकऱ्यांनी या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घेत आधुनिक पद्धतींचा अवलंब करून नारळ उत्पादनात वाढ करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषक कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष प्रमोद पाटील, माजी अध्यक्ष रवींद्र पाटील, उपाध्यक्ष दिलीप पाटील, वसंत घरत, विनायक थळकर, सुधाकर राऊळ, प्रकाश पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. चौल व रेवदंडा परिसरातील अनेक नारळ उत्पादक शेतकरी या कार्यशाळेला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाळवटीत शैक्षणिक साहित्य वाटप

**| कापोली | प्रतिनिधी |**



किसान हायस्कूल, वाळवटी येथे कुमारी ओशीन फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य वाटपाचा उपक्रम उत्साहात संपन्न झाला. फाऊंडेशनचे सदस्य सुनील मोरे शिरवणे यांच्या सौजन्याने शाळेतील १६५ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण व्हाव्यात या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. शिक्षणाची प्रचंड आवड असल्यामुळेच कुमारी ओशीन फाऊंडेशनची स्थापना तिच्या वडिलांनी स्मृती प्रित्यर्थ दोन वर्षापूर्वी तिची आठवण म्हणून केली आहे.

प्रथम श्रीवर्धन तालुक्यातील किसान हायस्कूल वाळवटीची निवड करून ग्रामीण भागातील शालेय मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्याचे ठरवले. जसे शक्य होईल तसे यापुढेही इतर भागातील विद्यार्थ्यांना कुमारी ओशीन फाउंडेशनच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्याची मदत केली जाईल असे सांगण्यात आले.

किसान हायस्कूलमधील विद्यार्थ्यांनी या अनोख्या उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त करत कुमारी ओशीन फाऊंडेशनचे आभार मानले. कार्यक्रमास विनायक पारधी, संजय मोरे, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चोरढ्यात यांत्रिक पद्धतीने भात लागवड

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**



मुरूड तालुक्यातील चोरढे येथील प्रगतशील शेतकरी सुनील सुदाम घाग यांच्या शेतावर सहाय्यक कृषी अधिकारी मनोज कदम तसेच कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली यांत्रिक पद्धतीने भात पिकाची लागवड करण्यात आली.

चालू वर्षात एल-निनोच्या परिणामामुळे तसेच काही दिवसांपूर्वी झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी भात रोपवाटिकांचे नुकसान झाले. मात्र, सुनील घाग यांनी भात लागवडीसाठी आवश्यक रोपे ट्रेमध्ये तयार केल्याने रोपांची समान वाढ होऊन ती सुस्थितीत राहिली. या पद्धतीमुळे प्रति एकरी केवळ १० किलो बियाण्याची आवश्यकता भासली. सुमारे १५ दिवसांच्या भात रोपांची यंत्राद्वारे लागवड करण्यात आली. यंत्राच्या साहाय्याने लागवड केल्यामुळे ओळीतील व रोपांतील आवश्यक अंतर अचूक राखले गेले. यांत्रिक लागवडीमुळे मजुरीचा खर्च मोठ्या प्रमाणात कमी होतो. कमी कालावधीत अधिक क्षेत्राची लागवड पूर्ण होत असल्याने वेळेची बचत होते. तरी अधिकाधिक शेतकऱ्यांनी यांत्रिक भात लागवड तंत्रज्ञानाचा अवलंब करावा असे आवाहन सहाय्यक कृषी अधिकारी मनोज कदम यांनी केले आहे.

## २,७४८ लाभार्थ्यांना योजनांचा लाभ | पोलीसपदी निवड झालेल्या युवकाचा सन्मान

# माणगांव महाराजस्व समाधान शिबीर उत्साहात

**| माणगाव | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार, जनतेच्या दारी कल्याणकारी योजनांचा लाभ थेट पोहोचवण्यासाठी बुधवारी (दि.२२) जुलै, रोजी माणगांव येथील ज. गांधी मेमोरि अल सभागृहात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान उत्साहात पार पडले. कार्यक्रमास मंत्री आदिती तटकरे या मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होत्या. तसेच प्रशांत शिंदे, लोकप्रतिनिधी, विविध विभागांचे वरिष्ठ शासकीय अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शिबिरामध्ये एकूण २,७४८ नागरिकांना निरनिराळ्या योजनांचा लाभ मंजूर करण्यात आला, ज्यातील १०६ लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात मंचावर मान्यवरांच्या हस्ते लाभ सुपूर्द करण्यात आले, तसेच यामध्ये प्रामुख्याने शासनाच्या सुचनेनुसार, समाजातील वंचित व दुर्लक्षित घटक असलेल्या अनाथ घटकाला प्राधान्याने लाभ देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. या अनुषंगाने तालुक्यांतील ढालघर येथील रहिवासी ओंकार शिंदे या युवकास माणगांव प्रशासनाने तत्परतेने अनाथ प्रमाणपत्र उपलब्ध करून दिले. या प्रमाणपत्राच्या आधारे अनाथ समांतर आरक्षणांतर्गत ओंकार शिंदे यांची मुंबई पोलीस विभागात पोलीस शिपाई पदी निवड झाल्या बद्दल मंत्री तटकरे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

महसूल विभागामार्फत सर्वाधिक नागरिकांना विविध दाखले व योजनांचा लाभ देण्यात आला. त्यामध्ये १,५८८ नागरिकांना जात प्रमाणपत्र, डोमिसाईल, उत्पन्न दाखले, ई. प्रमाणपत्र, ३९७ शेतकऱ्यांना जिवंत ७/१२ मोहिमेंतर्गत सुधारित ७/१२, ६७ शेतकऱ्यांना अग्रीस्टॅककार्ड, ६१ लाभार्थ्यांना संजय गांधी योजनेचे मंजुरी आदेश, ५३ कुटुंबांना नवीन रेशनकार्ड, २७ नागरिकांना जन्म-मृत्यू नोंदणीचे अधिकृत आदेश, ३ महिलांना जमिनीवर हक्क मिळवून देत लक्ष्मी मुक्ती योजनेचा लाभ, देण्यात आले.

### बचत गटांना आर्थिक अनुदान

स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी ११ महिला बचत गटांना वैयक्तिक व्यवसायासाठी आर्थिक अनुदान देण्यात आले तसेच शिक्षण विभागामार्फत ११ गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले व ३७ लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा वाटप करणेत आले आहे.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे-नावंढे, ता. खालापूर. जि.- रायगड येथील खालील वर्णनाची मालमत्ता, मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदीने विकत घेण्याविषयी, आमचे अशिलांनी त्यांच्याबरोबर बोलणी केली आहे.

| मालकाचे नाव | ग.क्र./भू.क्र | एकूण क्षेत्रफळ आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| लोकेश देवकिसन जाखोटिया<br>सुनील महादू पिंगळे | १२५/३ | ७-००-०० | ७०.०० |

तरी सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही वारसा हक्क, दान, बक्षीस, गहाण, साठेकरार, फरोक्त अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क अथवा अधिकार असल्यास किंवा सदर खरेदी बद्दल कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील पत्त्यावर योग्य कागदपत्रांसह लेखी हरकत द्यावी. उक्त मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मिळकतीच्या पुढील व्यवहाराबाबत बोलणी करून कार्यवाही पूर्ण केली जाईल व मागावून घेतलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड. सोनाली गंगाधरे शहासने**
'सीता-सदन' वाकण, पो.-पाटणसई,
ता.-रोहा, जि.रायगड, ४०२१०६
मो. क्र. ७७७५८९०४५५,

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी मौजे आक्षी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बागायत जमीन मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| आक्षी ता.अलिबाग | ३०९ | बागायत ०-३०-६०<br>पो. ख. ०-०२-५०<br>०-३३-१० | १२.८८ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकती पैकी विद्यमान यांचे नावे असलेले ०-१६-६० हे.आर. बागायत क्षेत्र या नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक श्रीमती कमल सुधीर पाटील यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकण्याचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा,वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवंसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती हया विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे.

ठिकाण- अलिबाग
दिनांक - २३/०७/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस- लक्ष्मी नारायण, पहिला मजला,
गाळा नं. ७ व ८, ब्राम्हण आळी, राम मंदिर समोर, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पसार्वे, ता. पनवेल, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ७५/३ | एकूण क्षेत्र ०-५३-३० हे.आर,<br>या पैकी राजेश ऊर्फ राजेशकुमार वसंतराय दोशी याचे मालकीचे खाता नं. ३११ ज्याचे क्षेत्र ०-२०-०० हे.आर या मिळकतीबाबत | ३.७८ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :-२४/०७/२०२६

सही/-
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे बहिरोळे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीच्या विद्यमान मालक श्रीमती पुष्पा आत्माराम पुरो उर्फ वर्षा वसंत म्हात्रे यांच्याकडून आमच्या अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तिचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| बहिरोळे | ३६१ | ०-१०-९०<br>पो.ख. ०-०१-००<br>०-११-९० | २.२५ |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, अदलाबदल, कुळवहिवाट, कसवणुक या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, तसेच सदर मिळकत कराराने खरेदी घेणेस योग्य आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व सदर हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. तसेच संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडुन दिल्या आहेत, असे समजणेत येईल, हे सर्वांस कळावे.

ता. २४/७/२०२६

सही/-
**ॲड. माधवी नारायण ठाकूर.**
सी- ३०१, 'क्लिफ हेवन'
को. ऑप. हा. सोसायटी,
स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बाजूला,
कोर्ट रोड, अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशीलांच्या मालकीच्या व ताबेकब्जाच्या खाली वर्णन केलेल्या जमीन मिळकती मौजे तळाशेत, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे आहेत. सदर जमीन मिळकतीमध्ये आमच्या अशीलांचा कायदेशीर हक्क, हितसंबंध व अधिकार आहे.

| अ. क्र. | मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|---|
| १ | तळाशेत | १४६ | ०-०५-१० | ०-६२ |
| २ | तळाशेत | ११२ | १-०५-७० | १९-७६ |
| ३ | तळाशेत | १३५ | ०-११-१० | १-०६ |
| ४ | तळाशेत | १४८ | ०-०८-३० | १-१९ |
| ५ | तळाशेत | १४९ | ०-०४-८० | ०-५२ |
| ६ | तळाशेत | १५० | ०-०२-५० | ०-४५ |
| ७ | तळाशेत | १५१ | ०-१०-५० | १-०६ |
| ८ | तळाशेत | १५२ | ०-०१-३० | ०-१२ |
| ९ | तळाशेत | १५३ | ०-०३-०० | ०-३० |
| १० | तळाशेत | ११० | ०-०४-८० | ०-१५ |

तरी सदर जमीन मिळकतींवरील आमच्या अशीलांच्या मालकी व ताबेकब्जा संदर्भात कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास तशी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आंत खाली सही करणार यांच्याकडे कागदोपत्री पुराव्यानिशी दाखल करावी. जर उक्त मुदतीत कोणीही हरकत दाखल केली नाहीतर आमच्या अशीलांच्या सदर जमीन मिळकती निर्वेध आहेत असे मानण्यात येईल.

अलिबाग,
दिनांक : २३-०७-२०२६.

**(ॲड. अमर अशोक घरत)**
मु.पो.- थळ, ता.-अलिबाग,
जिल्हा-रायगड.
मो - ८८०५०३७४७४.

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे मोरोंडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली वरकस जमिन मिळकत श्री. सुरेश परशुराम तेंडुलकर, राहणार रामराज, ता. अलिबाग यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. सुरेश परशुराम तेंडुलकर, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, सदर जमिन मालकांचे मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती / संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस
कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| मोरोंडे, ता.अलिबाग, | १०० | ३-७५-००<br>१-१३-०० पो.ख.<br>४-८८-०० एकूण | ६-९२ |

अलिबाग,
दिनांक : २३/०७/२०२६.

सही/
**(ॲड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी, अे विंग,
टिळक रोड, अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, पांडुरंग तात्या ठमके, जनार्दन तात्या ठमके, देहु सटु शिंदे, माई गोपीनाथ धामणे, राधीका तात्या ठमके ता.पेण,जि. रायगड, येथील रहिवासी असून यांच्या मालकीची जमिन कुरनाड ता.पेण, जि.रायगड येथे असून मी स्वतः सुजीत प्रभाकर पाटील प्लॉट नं. ६, नवीन कुकशेत गाव, सारसोळे डेपो जवळ, सेक्टर १४ नेरुळ, वेस्ट, पिन कोड ४००७०६ नवी मुंबई ठाणे येथील रहिवासी असून मी खालील वर्णनाची जमिन विकत घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे....

| गाव | मालक | भूमापन क्र. व उपविभाग | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| कुरनाड | पांडुरंग तात्या ठमके<br>जनार्दन तात्या ठमके<br>देहु सटु शिंदे<br>माई गोपीनाथ धामणे<br>राधीका तात्या ठमके | १ | ०.२०.३० | २.९८ |

वरील संपूर्ण मिळकती पैकी राधीका तात्या ठमके यांच्या अविभक्त हिश्याचे मिळकत विकत घेण्याचे ठरविले आहे.

तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकत मी स्वताः कायमस्वरूपी विकत घेत आहे. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसाच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वतः जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करेन व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
२४/०७/२०२६

**सुजीत प्रभाकर पाटील**
प्लॉट नं. ६, नवीन कुकशेत गाव,
सारसोळे डेपो जवळ, सेक्टर १४ नेरुळ, वेस्ट,
पिन कोड ४००७०६ नवी मुंबई ठाणे,
मोबाईल नं. ९३२२२९४४९९

## जाहीर प्रगटन

**मा. कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार उरण यांचे न्यायालय उरण, ता. उरण, जि. रायगड**

चौकशी अर्ज क्र. ४२६/२०२६

सौ. प्रज्ञा प्रदिप म्हात्रे (लग्नानंतरचे नाव)
कविता डाळूराम जोशी (लग्नाअगोदरचे नाव), अर्जदार
रा. म्हातवली. ता. उरण, जि. रायगड

विरूद्ध

ग्रामपंचायत अधिकारी, सामनेवाला
ग्रामपंचायत पिरकोन,
ता.उरण, जि.रायगड.

तमाम लोकांस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार सौ.प्रज्ञा प्रदिप म्हात्रे (लग्नानंतरचे नाव)/ कविता डाळूराम जोशी (लग्नाअगोदरचे नाव ), यांनी मा.कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार उरण यांचे न्यायालयात त्यांची जन्माची नोंद उपलब्ध नसल्याने दिवस ठरवून मिळण्याकरीता अर्ज दाखल केलेला आहे. तरी दिनांक ०४/०७/१९७९ रोजी राहत्या घरी मौजे.पिरकोन, ता.उरण येथे जन्म झालेला आहे असे अर्जात नमूद केलेले आहे. अर्जदार यांनी उक्त नोंद सामनेवाला यांच्या कार्यालयात होणेकरीता आदेश मिळणेकामी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. तरी सौ.प्रज्ञा प्रदिप म्हात्रे (लग्नानंतरचे नाव)/ कविता डाळूराम जोशी (लग्नाअगोदरचे नाव), हीच्या जन्माच्या नोंदीबाबत कोणासही हरकत, घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून १५ दिवसाचे आत लेखी अथवा तोंडी हरकती मा. न्यायालयाकडे योग्य त्या पुराव्यासह सादर कराव्यात.

याव्दारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती प्राप्त झाल्या नाहीत तर सौ.प्रज्ञा प्रदिप म्हात्रे (लग्नानंतरचे नाव)/ कविता डाळूराम जोशी (लग्नाअगोदरचे नाव), हीच्या जन्माची नोंद सामनेवाला यांच्या कार्यालयास घेणेकामी त्यांना आदेश पारीत करणेंत येतील. तद्नंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घेणेंत यावी. आज दिनांक २१/०७/२०२६ रोजी में. कोर्टाच्या सही शिक्यानिशी देण्यात आली.

सही/-
**(डॉ.उध्दव कदम)**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार उरण**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुरेश वामन घरत, रा. मु. पो. मुळे, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून विकत घेणेचे ठरलेले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग नं. | क्षेत्र (हे. आर ) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| कार्ले ता.अलिबाग | ३४७ | ०-०५-००<br>पो. ख ०-०१-३०<br>०-०६-३० | ०-१३ |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. २३-०७-२०२६.

सही/-
**ॲड. आर. बी. कोसमकर**
चिरायु, ब्राम्हणआळी, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड.

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
## विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड

फॉर्म झेड
(नियम १०७ चा उपनियम ११ ( डी ११ )
स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा रेवदंडा चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक ०२/०१/२०२६ रोजी निर्गमित केली. व त्या नंतर दिनांक ०६.०६.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार १) सौ वृद्धी औदुंबर गोंधळी २) श्री रोहण अरुण म्हात्रे यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक १०.०२.२०२५ पर्यंतची रक्कम रुपये १,३३,२९,५२२/- व दिनांक ०१.०४.२०२४ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज १३ टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती भुमापन व उपविभाग जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११ (डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून मौजे ग्रुप ग्रामपंचायत रेवदंडा मधील श्री शरद पांडुरंग गोंधळी यांच्या नावे असलेली मिळकत क्र २९४५अ २९४५ब, २९४५/१० व २९४५/११ येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग च्या दिनांक १०.०२.२०२५ पर्यंतची रक्कम रुपये १,३३,२९,५२२/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- १) सौ वृद्धी औदुंबर गोंधळी २) श्री रोहण अरुण म्हात्रे**

मौजे ग्रुप ग्रामपंचायत रेवदंडा मधील श्री शरद पांडुरंग गोंधळी यांच्या नावे असलेली मिळकत क्र २९४५ अ क्षेत्र ७५० चौ फु, २९४५ब क्षेत्र ७५० चौ फु, २९४५/१० क्षेत्र ७५० चौ फु व २९४५/११ क्षेत्र ७५० चौ फु

स्थळ : अलिबाग
दिनांक : २३.०७.२०२६

सही/-
**श्री के. के. राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
## विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड

फॉर्म झेड
(नियम १०७ चा उपनियम ११( डी ११ )
स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा जिल्हा परिषद चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक ०८/०६/२०२६ रोजी निर्गमित केली. व त्या नंतर दिनांक ०४.०७,२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री योगराज यशवंत थिटे यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक ११.११.२०२४ पर्यंतची रक्कम रुपये ४,६१,८७५/- व दिनांक ०१.०४.२०२४ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज १३ टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती भुमापण व उपविभाग जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११(डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून मौजे ग्रुप ग्रामपंचायत वेश्वी मधील श्रीमती साधना कृष्णा शिंदे यांच्या नावे असलेली मिळकत क्र १६९ येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग च्या दिनांक ११.११.२०२४ पर्यंतची रक्कम रुपये ४,६१,८७५/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री योगराज यशवंत थिटे**

मौजे ग्रुप ग्रामपंचायत वेश्वी मधील श्रीमती साधना कृष्णा शिंदे यांच्या नावे असलेली मिळकत क्र १६९ क्षेत्र ७८.०६ चौ मी

स्थळ : अलिबाग
दिनांक : २३.०७.२०२६

सही/-
**श्री के. के. राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
## विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड

फॉर्म झेड
(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)
स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा धरमतर चे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक ११.०६.२०२६ रोजी निर्गमित केली. व त्या नंतर दिनांक ०९.०६.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री प्रशांत तुकाराम पाटील यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक ०४.०९.२०२४ पर्यंतची रक्कम रुपये ३२,४३,५५३/- व दिनांक ०१/०४/२०२४ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज १२ टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११(डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून मौजे आंबेघर ता. अलिबाग मधील श्री प्रशांत तुकाराम पाटील व मनोज तुकाराम पाटील यांच्या नावे असलेली भुमापन व उपविभाग क्र १५/५ येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग च्या दिनांक ०४.०९.२०२४ पर्यंतची रक्कम रुपये ३२,४३,५५३/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री प्रशांत तुकाराम पाटील**

मौजे आंबेघर ता. अलिबाग मधील श्री प्रशांत तुकाराम पाटील व मनोज तुकाराम पाटील यांच्या नावे असलेली भुमापन व उपविभाग क्र १५/५ क्षेत्र ०.६५.०० हे आर

स्थळ : अलिबाग
दिनांक : २३.०७.२०२६

सही/-
**श्री के.के.राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे मोरोंडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली वरकस जमिन मिळकत जुबेर नुर सय्यद, वगैरे, राहणार अलिबाग, ता. अलिबाग यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील जुबेर नुर सय्यद, वगैरे, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, सदर जमिन मालकांचे मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती / संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस
कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| मोरोंडे, ता.अलिबाग, | ४ | ३-८६-००<br>२-०१-०० पो.ख.<br>५-८७-०० एकूण | ७-०८ |

अलिबाग,
दिनांक : २३/०७/२०२६.

सही/
**(ॲड. संजय म. भगत )**
हिराबाग सोसायटी, अे विंग,
टिळक रोड, अलिबाग- रायगड.
खरेदीदारांचे वकील

## जाहीर प्रगटन

**मा. कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार उरण यांचे न्यायालय उरण, ता. उरण, जि. रायगड**

चौकशी अर्ज क्र. ४२७/२०२६

सौ.मधुमती जनार्दन म्हात्रे (लग्नानंतरचे नाव)
मधुमती डाळूराम जोशी (लग्नाअगोदरचे नाव), अर्जदार
रा.जिते. ता. उरण, जि. रायगड

विरूद्ध

ग्रामपंचायत अधिकारी, सामनेवाला
ग्रामपंचायत पिरकोन,
ता. पेण, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार सौ.मधुमती जनार्दन म्हात्रे (लग्नानंतरचे नाव)/ मधुमती डाळूराम जोशी (लग्नाअगोदरचे यांनी मा.कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार उरण यांचे न्यायालयात त्यांची जन्माची नोंद उपलब्ध नसल्याने दिवस ठरवून मिळण्याकरीता अर्ज दाखल केलेला आहे. तरी दिनांक २२/०९/१९८२ रोजी राहत्या घरी मौजे.पिरकोन, ता.उरण येथे जन्म झालेला आहे असे अर्जात नमूद केलेले आहे. अर्जदार यांनी उक्त नोंद सामनेवाला यांच्या कार्यालयात होणेकरीता आदेश मिळणेकामी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

तरी सौ. मधुमती जनार्दन म्हात्रे (लग्नानंतरचे नाव) / मधुमती डाळूराम जोशी (लग्नाअगोदरचे नाव), हीच्या जन्माच्या नोंदीबाबत कोणासही हरकत, घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून १५ दिवसाचे आत लेखी अथवा तोंडी हरकती मा. न्यायालयाकडे योग्य त्या पुराव्यासह सादर कराव्यात.

याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती प्राप्त झाल्या नाहीत तर सौ. मधुमती जनार्दन म्हात्रे (लग्नानंतरचे नाव)/ मधुमती डाळूराम जोशी (लग्नाअगोदरचे नाव), जन्माची नोंद सामनेवाला यांच्या कार्यालयास घेणेकामी त्यांना आदेश पारीत करणेंत येतील. तद्नंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घेणेंत यावी.
आज दिनांक २१/०७/२०२६ रोजी में. कोर्टाच्या सही शिक्यानिशी देण्यात आली.

सही/-
**(डॉ.उध्दव कदम)**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार उरण**

# निवडक



## कौटिल्य अभ्यास मंडळाचे उद्घाटन

**अलिबाग** : वेश्वी येथील प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शुक्रवारी (दि.१७) अर्थशास्त्र विभागाअंतर्गत कौटिल्य अभ्यास मंडळाचे उद्घाटन करण्यात आले आहे. तसेच, ॲडम स्मिथ स्मरण दिनानिमित्त ॲडम स्मिथ आणि वर्तमान अर्थव्यवस्था या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. द्वितीय व तृतीय वर्षातील अर्थशास्त्र विषयाचे विद्यार्थी विशाल, सिद्धी सिंदकर, समृद्धी ओव्हाळ यांनी स्टॉक मार्केट, डिजिटल इकॉनोमी अँड सायबर क्राईम तसेच क्लायमेट चेंज अँड ग्रीन इकॉनोमी या विषयांवर सादरीकरण केले. या कार्यक्रमासाठी उद्घाटक आणि प्रमुख वक्ते म्हणून पेण येथील पतंगराव कदम महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. शेख आलम गफूर हे उपस्थित होते. त्यांनी आपल्या वक्तव्यात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ॲडम स्मिथ यांचे अर्थव्यवस्थेतील योगदान स्पष्ट करतानाच त्यांचे विचार वर्तमान अर्थव्यवस्थेत कसे लागू पडतात, हे विद्यार्थ्यांना पटवून दिले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांनी आपल्या अध्यक्षीय वक्तव्यात विद्यार्थ्यांच्या सादरीकरणांचे कौतुक करतानाच कौटिल्य अभ्यास मंडळाला शुभेच्छा दिल्या. अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रसिका म्हात्रे यांनी आपल्या प्रस्ताविकात हे कार्यक्रम करण्यामागील विभागाची भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार अर्थशास्त्र विभागातील सहा. प्रा. जयश्री ठाकूर यांनी केले. या कार्यक्रमासाठी कला विभाग प्रमुख डॉ. नम्रता पाटील, विज्ञान विभाग प्रमुख प्रा.पूजा म्हात्रे, प्रा. नितीन कराळे, प्रा. हर्षल काठे, प्रा. स्वराली ठाकूर तसेच अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

## कासकर कन्यांना ॲडव्होकेट पदवी

**खांब** : रोहा-अष्टमी येथील सामाजिक कार्यकर्ते डॉ. असिफ कासकर यांच्या कन्या झेबा कासकर आणि दरेन कासकर यांनी अग्रेल स्कूल ऑफ लॉ येथून विधी शिक्षण यशस्वीपणे पूर्ण करून ॲडव्होकेट ही पदवी संपादन केली आहे. झेबा आणि दरेन यांनी प्रचंड जिद्द, अथक परिश्रम, चिकाटी आणि अढळ आत्मविश्वासाच्या बळावर हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळे केवळ कासकर कुटुंबाचाच नव्हे, तर संपूर्ण समाजाचाही गौरव वाढला आहे. विशेषतः मुलींसाठी त्यांनी एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. समाजासाठी आयुष्य वेचणाऱ्या या कुटुंबातील दोन्ही कन्यांनी कायद्याच्या क्षेत्रात यश मिळविल्याने अनेकांनी समाधान व्यक्त केले आहे. न्याय, सत्य आणि समाजहिताची मूल्ये जपत त्या आपल्या कार्यातून समाजात वेगळी ओळख निर्माण करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. त्यामुळे झेबा व दरेन यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी विविध सामाजिक, शैक्षणिक, राजकीय तसेच कायदे क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा देत त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.




## अध्यक्षपदी स्नेहल कल्याणकर

**पनवेल** : सामाजिक कार्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटीच्या २०२६-२७ या वार्षिक कार्यकाळासाठी स्नेहल कल्याणकर यांनी अध्यक्षपदाची सूत्रे अधिकृतपणे स्वीकारली आहेत. पनवेल येथील तथास्तु हॉलमध्ये दि.१६ जुलै रोजी आयोजित करण्यात आलेल्या पदग्रहण सोहळ्यात नव्या कार्यकारिणीचा शपथविधी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. मावळत्या अध्यक्षा सिंपल आंचलिया यांनी आपल्या स्वागतपर भाषणात २०२५-२६ या कार्यकाळातील सामाजिक कार्याचा आढावा पीपीटीच्या माध्यमातून मांडला. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, महिला सक्षमीकरण आदी विविध क्षेत्रांमध्ये राबविण्यात आलेल्या ७६ सामाजिक प्रकल्पांची माहिती त्यांनी दिली. तसेच, क्लबला वर्षभरातील उत्कृष्ट कार्याबद्दल डिस्ट्रिक्ट स्तरावर मिळालेल्या पुरस्कार व सन्मानपत्रांची माहिती देत सर्व सदस्यांचे आभार मानले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते अध्यक्षपदाची कॉलर व पिन प्रदान करून स्नेहल कल्याणकर यांच्याकडे अध्यक्षपदाची अधिकृत धुरा सोपविण्यात आली. यावेळी उपाध्यक्षा बिजल मिरानी, इमिजिएट पास्ट प्रेसिडेंट सिंपल आंचलिया, सचिव विजयता कोठारी, खजिनदार ध्वनी तन्ना, आयएसओ गौरी देसाई, संपादक प्रतिभा डांगी, क्लब करस्पाँडंट दुर्गा चौधरी, संयुक्त सचिव अरुंधती बंडसोडे, सल्लागार हेतल बालड तसेच कार्यकारिणी सदस्य तनिषा चेतवानी, सिमरन सचदेव आणि शुभांगी दीक्षित यांनाही पदाची पिन प्रदान करून पदग्रहण करविण्यात आले.



# पालिकेच्या बेजबाबदार कारभारावर संताप

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिकेच्या निष्काळजी आणि बेजबाबदार कारभाराचा आणखी एक धक्कादायक नमुना समोर आला आहे. पावसाळ्यापूर्वी धोकादायक झाडांची छाटणी करण्यासाठी लाखो रुपयांची कामे मंजूर झाल्याचा दावा केला जात असताना, प्रत्यक्षात अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या आजही रस्त्यावर, वीजवाहिन्यांवर आणि वाहनांवर धोकादायक अवस्थेत लोंबकळत असल्याचे वास्तव आहे. याच निष्काळजीपणामुळे खारघर येथे उभ्या असलेल्या चारचाकी वाहनावर एका मोठ्या झाडाची फांदी कोसळल्याने त्या वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. त्यामुळे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपशहर प्रमुख नंदू वारुंगसे यांनी, या घटनेनंतर पनवेल महानगरपालिकेच्या कार्यपद्धतीवर तीव्र संताप व्यक्त केला आहे.

पनवेल महानगरपालिकेकडून पावसाळ्यापूर्वी धोकादायक झाडांची छाटणी करण्यासाठी लाखो रुपयांची कामे मंजूर झाल्याचा दावा केला जात होता. परंतु, प्रत्यक्षात अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या आजही रस्त्यावर, वीजवाहिन्यांवर आणि वाहनांवर धोकादायक अवस्थेत लोंबकळत असल्याचे वास्तव आहे. त्यामुळे याच निष्काळजीपणाचा फटका मंगळवारी (दि.२१) खारघर सेक्टर १३ येथील एनकेजीएसबी बँकेजवळ उभ्या असलेल्या चारचाकी वाहनाला बसला. याठिकाणच्या एका मोठ्या झाडाची फांदी या उभ्या असलेल्या वाहनावर कोसळल्याने वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, ही घटना एखाद्या नागरिकाच्या जीवावरही बेतू शकली असती. त्यामुळे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपशहर प्रमुख नंदू वारुंगसे यांनी, पालिकेच्या कार्यपद्धतीवर तीव्र संताप व्यक्त केला आहे.

त्यांनी सांगितले की, पावसाळा सुरू होण्यापूर्वीच खारघर परिसरातील धोकादायक झाडे आणि लोंबकळणाऱ्या फांद्यांची छाटणी करण्यासाठी त्यांनी अनेक वेळा लेखी पत्रव्यवहार करून प्रशासनाला इशारा दिला होता. संबंधित अधिकाऱ्यांचे लक्ष वेधून संभाव्य दुर्घटनांची शक्यता स्पष्टपणे मांडली होती. मात्र, प्रशासनाने या निवेदनांकडे दुर्लक्ष केले आणि वेळेत कोणतीही प्रभावी कारवाई केली नाही. या घटनेमुळे प्रशासनाच्या दाव्यांवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. झाडांच्या छाटणीसाठी निधी खर्च झाल्याचा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्षात अनेक रस्त्यांवर धोकादायक झाडे कायम आहेत. त्यामुळे कामे प्रत्यक्ष झाली की, केवळ कागदोपत्री पूर्ण झाल्याचे दाखवून बिले मंजूर करण्यात आली, असा संशय व्यक्त केला जात आहे.

पुढे बोलताना, "ठेकेदार मालामाल आणि जनता संकटात" अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. सामान्य नागरिकांच्या कराच्या पैशातून मंजूर होणाऱ्या विकासकामांचा लाभ नागरिकांना मिळण्याऐवजी काही ठेकेदार आणि संबंधित यंत्रणेलाच होत असल्याचे चित्र दिसत आहे. प्रत्यक्षात कामांचा दर्जा तपासला जात नाही, अधिकाऱ्यांकडून पाहणी केली जात नाही आणि नागरिकांच्या तक्रारींकडेही गांभीर्याने पाहिले जात नाही, असा आरोप त्यांनी केला आहे.

### कठोर कारवाई करण्याची मागणी

जर पावसाळ्यापूर्वी झाडांची छाटणी व्यवस्थित झाली असती, तर आज ही घटना घडली असती का? या घटनेत सुदैवाने केवळ वाहनाचे नुकसान झाले; एखादा नागरिक, विद्यार्थी किंवा दुचाकीस्वार त्या ठिकाणी असता तर त्याची जबाबदारी कोण स्वीकारली असती? या प्रकरणाची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करून झाडांच्या छाटणीसाठी मंजूर झालेल्या निधीचा वापर, काम करणारे ठेकेदार, कामाची प्रत्यक्ष पाहणी करणारे अधिकारी आणि काम पूर्ण झाल्याचे प्रमाणित करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी. तसेच, निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकारी व ठेकेदारांवर कठोर प्रशासकीय आणि कायदेशीर कारवाई करावी, अशी नंदू वारुंगसे यांनी मागणी केली.

## कर्जतमधील स्मशानभूमी परिसरात वृक्षारोपण

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने स्व. अजित पवार यांच्या जयंती निमित्त राष्ट्रवादी काँग्रेसच्या कर्जत मधील जनसंपर्क कार्यालयात त्यांना श्रद्धांजली वाहून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मुद्रे गुरुनगर येथील स्मशानभूमी परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.


• (छायाचित्रः संजय गायकवाड)

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, राजिपचे माजी कृषी सभापती अशोक भोपतराव, नगराध्यक्ष पुष्पा दगडे, उपनगराध्यक्ष संतोष पाटील यांच्यासह ॲड. पूजा सुर्वे, मधुरा चंदन, अशोक राऊत, महेंद्र चंदन, प्रशांत पाटील, कुमेश मोरे, सुचिता खोत, नेहा शिंदे, अंजली कडू, सुमिता गायकवाड, राधिका पवार, बळवंत घुमरे, सोमनाथ ठोंबरे, बिनिता घुमरे, भारती पालकर, सुवर्णा निलधे, पंकज पाटील, भानुदास पालकर, अनिल मोरे, राकेश देशमुख, राजू पवार, चेतन मुसळे, अतुल कडू, योगेश गायकवाड, स्वप्नील मुसळे, सुयोग मांडे आदी उपस्थित होते. तसेच, उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप देखील करण्यात आले. यावेळी सभापती नमिता घारे, एकनाथ धुळे, उषा ठोंबरे, केतन बेलोसे, रवींद्र घारे, शेखर बैलमारे, संभाजी तवळे आदी उपस्थित होते.

## युवक बेपत्ता

**पनवेल** : २२ वर्षीय युवक बेपत्ता झाल्याची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. करण कैलास मुकादम असे या युवकाचे नाव असून, तो वडघरे परिसरातील रहिवाशी आहे. करण मुकादम हा रंगाने सावळा असून, त्याची उंची सुमारे ५ फूट ९ इंच, काळे केस, काळे डोळे, अंगात राखाडी रंगाचा अर्ध्या बाह्यांचा टी-शर्ट व काळ्या रंगाची हाफ जिन्स परिधान केलेली आहे. या युवकाबाबत कोणालाही माहिती मिळाल्यास पनवेल शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## लोकमान्य टिळकांना अभिवादन



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

लोकमान्य टिळक यांच्या जयंतीनिमित्त अलिबाग नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी लोकमान्य टिळक यांनी स्वराज्य, राष्ट्रप्रेम, शिक्षण आणि सामाजिक जागृतीसाठी दिलेल्या अतुलनीय योगदानाचे स्मरण करण्यात आले. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच" हा लोकमान्य टिळकांचा विचार आजही देशातील प्रत्येक नागरिकासाठी प्रेरणादायी असल्याचे नगराध्यक्षा अक्षया नाईक यांनी नमूद केले. यावेळी उपस्थितांनीही लोकमान्य टिळक यांच्या कार्याला अभिवादन करत त्यांच्या राष्ट्रनिर्मितीच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प व्यक्त केला.

## जनआरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**। आपटा । प्रतिनिधी ।**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त लोहोप येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मुख्यमंत्री जनआरोग्य शिबीर संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाटन जनआरोग्य समिती अध्यक्षा नेहा पारंगे, जि.प. सदस्य संतोष बैलमारे, बिरला कार्बन युनिट हेड रघुवंशी, सरपंच दिपाली पाटील तसेच पंचायत समीती सदस्या गौरी गडगे यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरासाठी कामोठ्यातील एमजीएम हॉस्पिटल, एमजीएम डेंटल हॉस्पिटल, पनवेलमधील लक्ष्मी आय हॉस्पिटल, लाईफलाईन हॉस्पिटल, खारघरमधील मेडिकव्हर हॉस्पिटल मधील नामांकित तज्ज्ञ डॉक्टरांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

## आरोग्य शिबिराने जयंती साजरी

**रसायनी**: ग्रुप ग्रामपंचायत वासांबे-मोहोपाडा तर्फे बुधवारी (दि.२२) स्व. अजितपवार यांची जयंती आरोग्य तपासणी शिबीर भरवून साजरी करण्यात आली. सरपंच उमा मुंढे व उपसरपंच दीपक कांबळे यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन केले. यावेळी ग्रामपंचायत सदस्या प्रतिक्षा राऊत, कविता मांडे, आकाश जुईकर, केदार भोईर यांच्यासह हरीश उतेकर, वर्षा पाटील, सारिका कांबळे, आरती उतेकर, शारदा काळे, उज्वला शेंडकर, गणेश काळे, प्रमोद राईलकर आदी उपस्थिती होती.

## कचरा टाकून अपमानास्पद वागणूक

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

म्हसळा येथील ग्रामीण रुग्णालयात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष राज पार्टे व त्यांच्या सहकाऱ्यांनी औषध निर्माण अधिकाऱ्यावर कचरा टाकून अपमानास्पद वागणूक दिल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेचे तीव्र पडसाद उमटले असून, श्रीवर्धन येथील डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी या कृत्याचा जाहीर निषेध नोंदवला आहे.



मिळालेलया माहितीनुसार, दि.२० जुलै रोजी म्हसळा ग्रामीण रुग्णालयात मनसेचे राज पार्टे आणि त्यांचे कार्यकर्ते सदिच्छा भेटीसाठी आले होते. यावेळी औषध वाटप विभागात त्यांनी वैद्यकीय अधिकारी डॉ. कर्ण बेलकोने व औषध निर्माण अधिकारी सागर सानप यांच्याशी अरेरावी केली. रुग्णालयातील अस्वच्छतेचा दाखला देत कार्यकर्त्यांनी बेसिन वर चढून कपाटावरील व खिडकीतील धूळ काढून ती थेट औषध निर्माण अधिकारी सानप यांच्या डोक्यावर टाकली व ॲप्रॉनला पुसली. या संपूर्ण कृत्याचा व्हिडिओ समाज माध्यमांवर प्रसारित करण्यात आल्याने आरोग्य कर्मचाऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरण पसरले आहे. शासकीय कामात अडथळा आणून कर्मचाऱ्यांचा अपमान केल्याप्रकरणी संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई करण्याची मागणी म्हसळा पोलिसांकडे तक्रार अर्जाद्वारे करण्यात आली आहे. या घटनेचा श्रीवर्धन व म्हसळा तालुक्यातील वैद्यकीय वर्तुळाने निषेध केला असून, दोषींवर तातडीने कडक कारवाई व्हावी, अशी आक्रमक भूमिका डॉक्टरांनी घेतली आहे.

## तळवली तर्फे दिवाळी शाळेचा कायापालट

**। सुतारवाडी । प्रतिनिधी ।**

स्थानिक विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी आणि ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी कॉर्पोरेट कंपन्या व सामाजिक संस्थांचे योगदान मोलाचे ठरत आहे. याचेच एक उत्तम उदाहरण तळवली तर्फे दिवाळी येथील रायगड जिल्हा परिषद शाळेत पाहायला मिळाले. डी.आर.टी. अंथिया अरोमा केमिकल्स प्रा. लि. कंपनी आणि आरंभ संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने तळवली शाळेला विविध अत्याधुनिक शैक्षणिक व भौतिक सोयी-सुविधा पुरवण्यात आल्या आहेत. त्याचा लोकार्पण सोहळा सोमवारी (दि.२०) उत्साहात पार पडला.



या सोहळ्यांतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांना आधुनिक पद्धतीने शिकता यावे, यासाठी स्मार्ट बोर्ड, चिमुरड्यांसाठी सुसज्ज विज्ञान प्रयोग कक्ष आणि डिजिटल युगाची गरज ओळखून अत्याधुनिक कॉम्प्युटर लॅबचे उद्घाटन करण्यात आले. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आता डिजिटल स्क्रीनवर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांतून शिकण्याची आणि प्रत्यक्ष प्रयोग करून संगणक साक्षर होण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. यावेळी संजय तेलगे, वैभव जैतपाल, महेंद्र पानसरे, कुलदीप सुतार, प्रतिश घावटे, दिगंबर घावटे, नामदेव सुतार, राहुल दपके, दिपक पानसरे, प्रशांत दपके, प्रमोद दपके, समिधा दपके, चित्रा पानसरे, साक्षी घावटे, रोहिणी सुतार, दीपिका ठकेकर, अस्मिता सुतार, ज्योती तेलंगे, अमिषा वडे, वर्षा काटे, रेवती जाधव, मंगल जाधव व समस्त ग्रामस्थ, महिला मंडळ हे उपस्थित होते.

## महाविद्यालयाच्या इमारतीचे भूमीपूजन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या मोर्बा सोशल सोसायटी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या नवीन इमारतीचा भूमिपूजन सोहळा शनिवारी (दि.२५) सायंकाळी ४.०० वाजता मोर्बा येथे संपन्न होणार आहे. मोर्बा सोशल सोसायटी ही नामांकित शिक्षण संस्था असून, या संस्थेच्या एस.एस.हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज मोर्बा येथील शाळा व महाविद्यालयात उर्दू व मराठी माध्यमातून सुमारे १ हजारहून अधिक ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या संस्थेचा दहावी व बारावी परीक्षेचा निकाल दरवर्षी नेत्रदीपक लागत असल्याने या संस्थेबद्दल पालक वर्गात विशेष आनंद आहे. संस्थेची उत्तरोत्तर होत असलेली भरभराटी विद्यार्थ्यांची दरवर्षी वाढणारी संख्या विचारात घेऊन या संस्थेची नवीन प्रशस्त इमारत उभारण्याचा संकल्प संस्था चालकांनी व ग्रामस्थांनी सोडला. त्यानुसार सी.एस.आर. फंडातून मंजूर झालेल्या मोर्बा सोशल सोसायटी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या नवीन इमारतीचा भूमिपूजन सोहळा शनिवारी संपन्न होत असल्याने हा सोहळा तमाम मोर्बेकरांना आनंद देणारा क्षण आहे.

**भक्ती, शक्ती अन् निसर्गाचा संगम** | **चिरनेर ठरतंय पर्यटकांचे आकर्षण**

# त्रिवेणी संगमात पर्यटकांचा ओढा

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर हे गाव भक्ती, शक्ती आणि निसर्गाच्या त्रिवेणी संगमासाठी प्रसिद्ध आहे. या ऐतिहासिक ठिकाणी पर्यटकांना अध्यात्म, स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास आणि सुंदर नैसर्गिक ठिकाणांचा अनुभव एकत्र घेता येतो. त्यामुळे पावसाळ्यात पर्यटक मोठ्या संख्येने येत आहेत. त्यात चिरनेर गावात महागणपतीचे मंदीर आहे. दुसरीकडे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील संघर्षमय चिरनेर जंगल सत्याग्रहही याच भूमीवर घडला होता. त्याचप्रमाणे येथील धरण डोंगर आणि निसर्ग याची उधळण झालेला हा परिसर आहे.

चिरनेरमध्ये पेशवेकालीन स्वयंभू महागणपतीचे भव्य व देखणे मंदिर आहे. अष्टविनायकांनंतर महाराष्ट्रात या गणपतीला मोठे स्थान असून, लाखो भाविकांचे हे श्रद्धास्थान आहे. कोकणातील उरण व कर्नाळा प्रांताचा कारभार नानासाहेबांचे सुभेदार रामजीपंत फडके यांनी चालविला. हा कारभार सांभाळताना त्यांनी अनेक ठिकाणी मंदिरे उभारली. तसेच, देवळांचा जीर्णोद्धार केला. चिरनेर येथील गणपती मंदिर हेमाडपंथीय धाटणीचे दिसून येते. आतील व बाहेरील रचनेवरून, पाषाणावरील कलाकुसरीचे मंदिराचे हे काम म्हणजे शिल्पकलेचा आणि वास्तुशास्त्राच्या बांधणीचा उत्कृष्ट नमुना आहे. अशा या पेशवे कारकीर्दीत बांधलेल्या मंदिरातील महागणपतीची मूर्ती आज बहुजन समाजाची आराध्य देवता झाली आहे. मूर्ती भव्य व पूर्वाभिमुख असून शेंदूर चर्चित आहे. श्रींच्या उजव्या हातात परशु आहे. तर, दुसरा हात आशीर्वादाचा आहे. डावीकडील वरच्या हातात पाश, तर दुसऱ्या हातात मोदक आहे, डोक्यावर मुकुट दिसून येते. चिरनेरचा हा गणपती डाव्या सोंडेचा म्हणजे तो रिद्धीविनायक आहे. पूर्वी या गणपतीला कौल लावण्याची पद्धत होती. या गणपती मंदिराच्या सभा मंडपाचा उपयोग चिरनेर जंगल सत्याग्रहातील आरोपींना बंदिस्त ठेवण्यासाठी केला होता. चिरनेर परिसरातील सामान्य जनतेने भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास घडविला, त्यामागे गणपतीची प्रेरणा होती. तसेच, भारतीय स्वातंत्र्य लढ्यात या भूमीने मोठी शक्ती दाखवली होती. २५ सप्टेंबर १९३० रोजी ब्रिटिशांच्या जंगल कायद्याविरुद्ध येथे प्रसिद्ध चिरनेर जंगल सत्याग्रह झाला. या आंदोलनात आठ ग्रामस्थ हुतात्मा झाले. त्यांच्या स्मरणार्थ अक्कादेवी जंगलात हुतात्मा स्मारक उभारण्यात आले आहे. त्याचबरोबर हिरवीगार वनराई, शेती आणि टेकड्यांनी वेढलेला उरणचा परिसर निसर्गाने नटलेला आहे. येथील अक्कादेवी बंधारा (धरण) आणि आजूबाजूचा परिसर पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरत आहे.








## संस्कृती घरत हिचे निधन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील खारपाडा येथील संस्कृती भालचंद्र घरत (सोनू) हिचे मंगळवारी (दि.२१) निधन झाले आहे. निधनासमयी तिचे वय अवघे १८ वर्षांचे होते. तिच्या पश्चात आई-वडील, भाऊ, काका-काकी आणि चुलते असा मोठा परिवार आहे. तिचा दशक्रिया विधी गुरुवारी (दि.३०) श्रीक्षेत्र नाशिक येथे, तर उत्तरकार्य विधी दि.२ ऑगस्ट रोजी राहत्या घरी खारपाडा येथे होणार असल्याचे घरत कुटुंबियांकडून सांगण्यात आले.





## राशीभविष्य

- **मेष :** कामाचा उत्साह राहील. दिलासादायक घटना घडतील. विद्यार्थ्यांना अपेक्षित प्रगती साधता येईल.
- **वृषभ :** 'इच्छा तेथे मार्ग...'ची प्रचिती येईल. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. हितशत्रूंवर मात करू शकाल.
- **मिथुन :** दानधर्माकडे ओढा राहील. मानसिक स्वास्थ्य लाभेल. चर्चा, सुसंवादातून प्रश्न मार्गी लागतील.
- **कर्क :** मोठ्या खरेदीला चालना मिळेल. सर्व बाबतीत अनुकूलता राहील. आता कशाचीही चिंता करू नये.
- **सिंह :** अडचणीतून मार्ग निघेल. स्थावर प्रश्न विचारानं सोडवावे, स्थापत्य, क्रीडा क्षेत्रात संधी लाभतील.
- **कन्या :** अनावश्यक खर्च टाळावा. कौटुंबिक जबाबदाऱ्यांनी जाणीव ठेवा. प्रेम प्रकरणात वाद संभवतात.
- **तूळ :** उपजत कला-गुणांना वाव मिळेल. आर्थिक बाबतीत समाधान लाभेल. विद्यार्थ्यांना अडचणी येतील.
- **वृश्चिक :** कामांचं नीट नियोजन करावं. अडथळ्यांची शर्यत पार करावी लागेल. बोलताना विचार करावा.
- **धनु :** कामाचा ताण राहील. नोकरीत वरिष्ठांची मर्जी सांभाळावी. महत्त्वाचे करार शक्यतो प्रलंबित ठेवावे.
- **मकर :** धनलाभाचे योग आहेत. संतती संबंधात शुभघटना घडतील. नव्या योजनांना चालना मिळू शकेल.
- **कुंभ :** कौटुंबिक वाद-विवाद संभवतात. व्यवसायात आवक उत्तम राहील. दूरच्या प्रवासाचे बेत आखाल.
- **मीन :** आपापल्या क्षेत्रात नावलौकीक वाढेल. ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा. बकी चिंता नको.

स्टाईल स्टेटमेंट

## आरामदायी विमानप्रवासासाठी...

बॉलिवूड सेलेब्जच्या एअरपोर्ट लूकची कायमच चर्चा होत असते. विमान प्रवासादरम्यान स्टायलिंग सेन्स जपण्यासोबतच कंफर्टचाही विचार करावा लागतो. म्हणूनच विमान प्रवासादरम्यान काय कॅरी करायला हवं, याबाबतचं मार्गदर्शन...

* विमान प्रवासादरम्यान बराच काळ बसून रहावं लागतं. विमानातल्या तापमानात सातत्याने बदल होत असतात. अशा वेळी कमी रक्तपुरवठ्यामुळे पायांना सूज येऊ शकते. हे टाळण्यासाठी तुम्ही कॉम्प्रेशन सॉक्स कॅरी करू शकता. या सॉक्समुळे रक्ताभिसरणाच्या क्रियेला चालना मिळते आणि पायांना सूज येणार नाही.

* हाय हिल्स सँडलचा मोह टाळा. नवी कोरी पादत्राणंही घालू नका. त्याऐवजी नियमित वापरातली पादत्राणं घाला. स्लीप ऑन शूज किंवा स्नीकर्सचा पर्याय तुमच्याकडे आहे. यामुळे प्रवासादरम्यान पायांना आराम मिळेल. चालतानाही त्रास होणार नाही. **(क्रमशः)**

## २४ जुलै

दिन विशेष

- १९६९ : अपोलो ११ या अंतराळयानाचा प्रवास सुखरुप पूर्ण.
- २०१४ : कोळसा गैरव्यवहारप्रकरणी विशेष न्यायालयाची स्थापना.
- २०१५ : फाशी टाळण्यासाठी याकूब मेमनने सुप्रीम कोर्टाचा दरवाजा ठोठावला.
- २०१७ : इस्रोचे माजी अध्यक्ष आणि उडुपी रामचंद्र राव यांचे निधन.
- २०१८ : उत्तर कोरियाकडून अण्वस्त्रे आणि बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांची निर्मिती करण्याची केंद्रे निकामी करण्यास सुरूवात.

सफर देशांची

## अनोखं 'रियुनियन आईसलँड'

'रियुनियन आईसलँड' हे हिंदी महासागरातलं मॉरिशसपासून २०० किलोमीटर अंतरावरचं बेट आहे. या बेटाच्या पश्चिमेला मादागास्कार हा देश आहे. पूर्वीच्या काळी हे बेट 'बॉरबॉन' या नावाने ओळखलं जायचं. 'युरोपियन युनियन'चा घटक असल्यामुळे या बेटांवर युरो हे चलन वापरलं जातं. हे बेट खूप सुंदर आहे. उंच पर्वतरांगा हे इथलं वैशिष्ट्य. या बेटांवर जागृत ज्वालामुखीही आहे. पोर्तुगिजांनी सोळाव्या शतकात या बेटांचा शोध लावला. 'सेंट डेनिस' ही रियुनियन आईसलँडची राजधानी. १६४३ मध्ये फ्रान्सने या बेटांवर ताबा मिळवला आणि 'बॉरबॉन' हे नाव दिलं. १६६२ मध्ये फ्रेंच लोकांनी या बेटावर वसाहती स्थापन केल्या. १७९३ पासून हा भाग रियुनियन आईसलँड या नावाने ओळखला जाऊ लागला. १८१० ते १८१५ या काळात या बेटांवर ब्रिटिशांचं राज्य होतं. मात्र त्यानंतर त्यावर फ्रान्सने ताबा मिळवला. हा देश साखर, व्हॅनिला आणि मासे यांची निर्यात करतो. मॉरिशसमधून दक्षिण आफ्रिकेत जाणाऱ्या बोटी, जहाजं या बेटांवर थांबतात. फ्रेंच ही इथली अधिकृत भाषा आहे. मात्र इथले लोक 'रियुनियन क्रेओले' ही भाषा बोलतात. या बेटांवर विविध संस्कृतींचे लोक रहातात.

### पंचांग

**शुक्रवार, २४ जुलै २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, आषाढ शु. १०, चंद्रराशी : वृश्चिक, नक्षत्र : अनुराधा, योग : शुक्ल, सूर्योदय ६.१५ सूर्यास्त ७.१५

### फॉरवर्ड्स

**फ़िक्र हैं यहाँ सबकों ख़ुद क़ो साबित करने क़ी...**

**ज़ैसे ये ज़िन्दग़ी ज़िन्दग़ी नहीं क़ोई इल्ज़ाम हैं...!**

आरोग्यमंत्र

## दातदुखी वर रामबाण उपाय

साधारणपणे दात किडल्याने दातदुखी उद्भवते. आहार, बदलती जीवनशैली यासारख्या कारणांसह मानसिक ताणतणावांमुळेही दातांचे आरोग्य बिघडत असल्याचे निदर्शनास आले आहे. अनेकजण दातांच्या समस्यांनी हैराण आहेत. डॉक्टरांकडे जाण्याआधी काही घरगुती उपाय केल्यास दातांच्या समस्यांपासून आराम मिळू शकतो. १) मिरे पावडर एक चतुर्थांश चमचा मीठात एक चिमटभर मिरे पावडर मिसळून दुखणाऱ्या भागात लावावे. आराम मिळेल.



२) तीन ते चार थेंब मोहरीच्या तेलामध्ये एक चिमटभर सैंधव मीठ टाकावे व दात आणि हिरड्यांना मसाज करावा. आराम मिळेल. ३) लिंबात व्हिटामिन सी असते. जो दात दुखत आहे. तेथे लिंबाच्या चकत्या ठेवल्यानेही आराम मिळते. ४) दात दुखीसोबत सुज असेल तर बटाटा सोलून त्याच्या चकत्या कारव्यात. दुखणे असलेल्या भागावर १५ मिनटांपर्यंत ठेवावे. आराम मिळेल. ५) जो दात दुखत असेल तेथे पेरुची पाने ठेऊन पाने चावावीत. आराम मिळेल. तसेच एक कप पाण्यामध्ये ही पाने उकळून घ्या. या पाण्याचा माउथवॉश प्रमाणे वापर केल्याने आराम मिळेल. ६) पेपरमिंट नावाने ओळखल्या जाणाऱ्या पुदीन्याच्या तेलाचे काही थेंब दुखत्या दातावर टाकल्याने आराम मिळेल. ७) तेजपत्ता प्राकृतिक वेदनानाशक आहे. दुखण्या पासुन त्वरित आरामासाठी त्याचा वापर केला जातो. त्यात अनेक औषधींचे गुणधर्म आहेत. दातांची सडन आणि दुर्गंधी ते दूर करते. दुखणाऱ्या भाग़ावर १५ ते २० मिनिटांपर्यंत बर्फ लवावा. अनेकदा असे केल्याने दात दुखीपासून सुटका मिळते.

### भटकंती

दोस्तांनो, पावसाळ्यात ट्रेकिंग करायला खूप धम्माल येते. आकाशातून कोसळणाऱ्या जलधारांमध्ये चिंब भिजत आपण डोंगरमाथ्याच्या दिशेने कूच करू लागतो. हिरवाईने नटलेला आसपासचा परिसर आपल्याला खुणावत असतो. मान्सून ट्रेकिंगसाठी उत्तम ठिकाण म्हणजे कळसूबाई. कळसूबाई हे महाराष्ट्रातलं सर्वात उंच शिखर आहे. १६४६ मीटर उंचीचं कळसूबाई शिखर गिर्यारोहकांना नेहमीच आकर्षित करतं. मान्सूनमध्ये तर या परिसराचं सौंदर्य खूप खुलतं.

**(क्रमशः)**

करिअरवाटा

## ॲप्सवरून शोधा नोकरी

नोकरीच्या प्रयत्नात असणारे उमेदवार नवनवीन पर्याय धुंडाळत असतात. कोणत्या माध्यमातून नोकरीबाबत नेमकी माहिती उपलब्ध होईल, प्राथमिक मार्गदर्शन मिळेल असा प्रश्न त्यांच्या मनात असतो. हल्ली काही ॲप्सही या कामी साह्यभूत ठरत आहेत. त्याद्वारे सर्व प्रकारच्या नोकऱ्यांची माहिती उपलब्ध होऊ शकते. प्रामुख्याने सरकारी नोकऱ्या मिळवू इच्छिणाऱ्यांना ही ॲप्स उपयुक्त ठरतात. यातून रेल्वे, बँका, पोलीस खाते आणि विविध विद्यापीठे यांच्यातील रिकाम्या जागा, त्यांच्या भरतीची परिस्थिती, आवश्यक अर्हता वगैरे सगळा तपशील प्राप्त होऊ शकतो. माहिती-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील विविध कंपन्यांची माहितीही यातून प्राप्त होऊ शकते. असं असलं तरी नोकऱ्या मिळवण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या परीक्षा, त्यांची तयारी याबाबतचं मार्गदर्शन उपलब्ध होणंही गरजेचं आहे. त्यादृष्टीने कुठली ॲप उपयुक्त ठरतात, हे जाणून घ्यायला हवं. विशेषत: स्पर्धा परीक्षांचा अभ्यासक्रम, त्यासाठी वापरावयाची पुस्तकं आणि स्टडी मटेरियल या बाबींचं मार्गदर्शन मिळवण्यावरही विद्यार्थ्यांनी भर द्यायला हवा. अशा तऱ्हेने नवनवीन पर्यायांद्वारे नोकरीविषयक नेमकी माहिती मिळवण्याचा प्रयत्न करणं अधिक महत्त्वाचं ठरत आहे.




खेचाखेची

## काळ निर्णय

जयंतराव साळगावकर आणि डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे एकाच दिवशी निधन झाले. ( अर्थात एक नैसर्गिक आणि दुसरे आपण जाणतोच )
दुसऱ्या दिवशी लोकसत्तामध्ये हेडिंग,

'काळ निर्णय आणि काळ निर्दय'

### वेगळं काही

रायपूरमधल्या एका शाळेतल्या विद्यार्थिनींनी 'नो पबजी गेम क्लब' स्थापन केला आहे. पबजी गेमच्या आहारी गेलेल्या मुलीच या क्लबच्या सदस्य आहेत. पबजीची सवय मोडून त्या आनंदी आयुष्य जगत आहेत. या मुली नो पबजी गेम लिहिलेली पट्टी कपाळावर बांधून शाळेत येतात. यामुळे जवळपास ४० विद्यार्थ्यांची पबजीची सवय सुटली आहे. आता या मुली 'नो पबजी गेम' लिहिलेल्या राख्या तयार करून रक्षाबंधनाच्या निमित्ताने मुलांना बांधणार आहेत. ओवाळणी म्हणून पबजी गेम न खेळण्याचं वचन घेण्यात येणार आहे. पबजीसारख्या मोबाईल गेमची सवय सुटावी यासाठी विद्यार्थिनी आणि शाळेने राबवलेला हा उपक्रम नक्कीच कौतुकास्पद आहे.

हिरवी सोबत

## बागेसाठी जागा नाही?

पावसाळ्यात लावलेली रोपं चांगली जगतात. त्यामुळे या दिवसात बागेमध्ये नवीन रोपं लावली जातात. घराभोवती बाग नसेल तर इनडोअर प्लांट्स लावण्याचाही प्रयत्न होतो. अर्थात या रोपांना योग्य प्रमाणात पाणी देणंही गरजेचं असतं. याविषयी जाणून घेऊ या.



* इनडोअर प्लांट्सची पानं वारंवार सुकत असतील तर पुरेसं पाणी मिळत नसल्याची लक्षणं असू शकतात. त्यामुळे योग्य वेळी पाणी देणं गरजेचं आहे. * रोपट्यांना पुरेसं पाणी मिळतंय की नाही हे सोप्या पद्धतीने तपासता येईल. यासाठी बोट कुंडीत हलकेच दाबा. माती मऊ, थोडी-फार मोकळी लागत असेल तर पुरेसं पाणी दिलं गेलं आहे हे समजतं. याउलट पाणी जास्त झालं असेल तर माती चिकट होते. * इनडोअर प्लांट्सच्या पानांकडे लक्ष देणंही गरजेचं आहे. पानांची हळूहळू होणारी वाढ, बदलता रंग अशा बाबींची नोंद घ्यावी. * इनडोअर प्लांट्ससाठी पावसाचं पाणी सर्वोत्तम असतं. अशा वेळी शक्य असल्यास पावसाचं पाणी साठवावं आणि रोपट्यांना द्यावं. * वापरानंतर उरलेला चहाचा चोथा या रोपट्यांच्या कुंडीत टाकू नये.

## सुडोकू १३०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | ७ | ३ | | २ | ५ | |
| | ५ | ८ | | ४ | | | | |
| ९ | | | | | | | | |
| ८ | | | | | | ६ | | |
| | १ | | ५ | ६ | २ | | ७ | |
| | | ४ | | | | | | २ |
| | | | | | | | | ७ |
| | | | | २ | | १ | ८ | |
| | ८ | ३ | | ५ | १ | | | ६ |

**टीप -**
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १२९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ५ | १ | ९ | ६ | ४ | २ | ७ | ३ |
| ९ | ४ | ३ | ८ | २ | ७ | ६ | ५ | १ |
| ७ | ६ | २ | १ | ५ | ३ | ४ | ८ | ९ |
| १ | ९ | ४ | ५ | ३ | ८ | ७ | ६ | २ |
| ६ | ८ | ५ | ७ | ९ | २ | ३ | १ | ४ |
| २ | ३ | ७ | ६ | ४ | १ | ५ | ९ | ८ |
| ४ | ७ | ८ | २ | १ | ५ | ९ | ३ | ६ |
| ५ | २ | ६ | ३ | ८ | ९ | १ | ४ | ७ |
| ३ | १ | ९ | ४ | ७ | ६ | ८ | २ | ५ |

## शब्दकोडे क्रमांक १३०



**आडवे शब्द :-**
१) दुसऱ्याकरता खर्च करणे
५) कायदेशीर
९) अंगरखा
११) पंच, मध्यस्थ
१२) चरबी
१४) मगज
१५) अत्यंत मऊ कापडप्रकार
१७) दृष्टीभेट,
२०) काव्य
२१) धाप, धमकी
२३) मनाचा ओढा
२४) वेदनेची उसळी
२५) मोहित होणे, फिदा होणे
२६) प्रामाणिक, साधा
२८) कीव
३०) उपयोगात आणणे,
३२) मला
३३) पटुत्व, कौशल्य
३४) चलाख, हुशार
३६) सापाने टाकलेली त्वचा
३७) घाव, दिवस
३८) धान्य (हिं)
३९) राजवाडा
४०) तफवत, भेद
४१) नवा कोरा
४४) अरण्य
४६) स्तुती करणारा
४७) झाकण असलेले पात्र
४९) ताजा, नव्या दमाचा
५१) रस्ता
५२) शीतल
५३) माळी
५५) निर्बंध नसलेला, स्वच्छंदी
५७) मला
५८) हमाल
६०) चौक
६१) रक्षण करणारा
६३) सवड, फुरसत, अवकाश
६५) माळ, हार
६६) समुद्र
६७) संगीतातील एक राग
६९) पृथ्वी
७१) रम्य
७३) रोग पसरविणारा किटक
७४) मीठ
७६) च्यासह
७८) सत्वांश
८०) स्त्री , बाई
८१) टरफल
८२) पालव
८३) व्यापारी फायदा

**उभे शब्द :-**
१) सैनिकांची तुकडी
२) औषध
३) सुळे
४) डमरू, डौर,
६) गाव, शहर
७) किंमत
८) रंजन करणे, रंजविणे
९) सारखा
१०) चिखलाची जमीन
१३) सरबत इ पेय
१६) वल्लरी
१८) ढग, लवकर
१९) पायाला भेगा पडण्याचा आजार
२०) समजणे
२२) चर्चा
२५) हिंदुस्थान
२६) एक कोल्हापुरी दागिना
२७) किरकोळ सामान
२९) वेदना
३१) तपासनीस
३२) मनाने, मनातल्या मनात
३३) बासरी
३५) धोबी
३६) गोजी, पाडी, जनावराचे पिल्लू
३८) ऐटबाज, गर्विष्ठ
३९) रात्रीचा पाऊस
४२) दात
४३) पद्धतीप्रमाणे
४५) नकल करणारा
४६) गुणाकाराच्या विरुद्धची क्रिया
४८) उपवन
५०) नष्ट, पराभूत
५१) मोठी पसरट वाटी
५४) हवेचे आवरण
५६) कावळा
५७) दहावी रास
५८) वजन, बोजा
५९) गंध
६०) शहाणा, सुसंस्कृत
६२) क्षमा करण्याचा स्वभाव
६४) खरगोश
६६) धैर्य, हिंमत
६८) एक द्विदल धान्य
७०) छिद्र
७२) चाकर
७३) सामान, वस्तू
७५) बारा महिन्याचा काळ
७६) मनाला टोचणारे दु:ख
७७) गाडीचे छत
७९) चंपक,

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# ‘मर्यादित’ राष्ट्रकुलमध्ये भारताचा कस

## बॉक्सिंग, ॲथलेटिक्स, वेटलिफ्टिंगवर आशा अवलंबून

**। ग्लासगो । वृत्तसंस्था ।**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत अव्वल पाच देशांतील स्थान टिकवून ठेवण्याची गेल्या दोन दशकांपासून परंपरा कायम राखताना यावेळी भारताचा कस लागणार आहे.

क्रीडा प्रकारांची संख्या कमी केल्यामुळे भारताला बर्मिंगहॅममधील ६१ पदकांचा आकडा गाठणे कठीण असले, तरी आघाडीच्या देशांमध्ये स्थान मिळवून ऑलिम्पिक खेळांमध्ये आपले अस्तित्व दाखवून देण्यासाठी भारतीय संघ प्रयत्नशील राहील. यासाठी बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग आणि ॲथलेटिक्स खेळाडूंची कामगिरी निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

आर्थिक अडचणींना सामोरे जात असलेल्या राष्ट्रकुलने आता खेळांची संख्या कमी करून आयोजन खर्चाला कात्री लावली आहे. त्यामुळे गुरुवारपासून सुरू झालेल्या या बहु-क्रीडा महाकुंभाचे मर्यादित स्वरूपदेखील स्पर्धेचा खरा आत्मा टिकवून ठेवू शकते, हे सिद्ध करण्याचे मोठे




आव्हान आयोजकांसमोर आहे.

ओव्हीओ हायड्रो येथे होणाऱ्या दिमाखदार उद्घाटन सोहळ्याने गेल्या तीन दशकांतील सर्वांत लहान राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेची अधिकृत सुरुवात होईल. यामध्ये राष्ट्रकुलमधील ७४ देशांतील सुमारे ३,००० खेळाडू केवळ १० खेळांमध्ये आणि चार वेगवेगळ्या ठिकाणी एकमेकांशी स्पर्धा करतील. यात १२६ खेळाडूंचे भारतीय पथकही आपली दावेदारी उपस्थित करेल. सर्वसमावेशक खेळांचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून आयोजकांनी यातील सहा खेळांमध्ये पॅरा स्पर्धांचेदेखील आयोजन केले आहे.

**खर्चाला कात्री**

वाढत्या खर्चामुळे ऑस्ट्रेलियाच्या व्हिक्टोरिया राज्याने ऐनवेळी यजमानपदावरून माघार घेतली होती. त्यामुळे राष्ट्रकुल स्पर्धेच्या भवितव्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. अशा कठीण परिस्थितीत ग्लासगो शहराने पुढे येत या स्पर्धेला आधार दिला. यापूर्वी २०१४ मधील आवृत्तीचे यशस्वी आयोजन करणाऱ्या या स्कॉटिश शहराने पुन्हा एकदा आपले दरवाजे खुले केले आहेत. यावेळी त्यांनी जुन्या स्टेडियम्स आणि पायाभूत सुविधांचा पूर्णपणे वापर करून बर्मिंगहॅम २०२२ च्या तुलनेत तब्बल ६० टक्के कमी खर्चात, म्हणजेच सुमारे १६० दशलक्ष पौंडमध्ये ही स्पर्धा आयोजित केली आहे.

स्पर्धेचे हे मर्यादित स्वरूप यशस्वी करून दाखवण्याचे मोठे आव्हान ग्लासगो आणि आयोजकांसमोर असताना, भारताला कमी खेळांतही अधिकाधिक पदक जिंकण्याच्या आव्हानाला सामोरे जावे लागेल. मँचेस्टर २००२ स्पर्धेपासून भारताने प्रत्येक राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पदकतालिकेत अव्वल पाचमध्ये स्थान मिळवले आहे.

जागतिक स्तरावर सर्व खेळांमध्ये पारंपरिक महासत्ता नसतानाही भारताने राष्ट्रकुलमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. मात्र, कुस्ती, बॅडमिंटन, टेबल टेनिस आणि नेमबाजी या खेळांचा यंदाच्या स्पर्धेत समावेश नाही. त्यामुळे भारताच्या पदकसंख्येला मोठा फटका बसेल.

चार वर्षांपूर्वी बर्मिंगहॅममध्ये भारताने जिंकलेल्या ६१ पदकांपैकी तब्बल ३१ पदके (बॅडमिंटन ६, क्रिकेट १, हॉकी २, स्क्वॉश २, टेबल टेनिस ७ आणि कुस्ती १२) वगळलेल्या खेळांमधून मिळाली होती. त्यामुळेच यंदाची मोहीम भारतासाठी कठीण मानली जात आहे. ही पोकळी भरून काढण्याची मुख्य जबाबदारी आता ॲथलेटिक्स, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंगवर असेल.

संघ बर्मिंगहॅममधील ऐतिहासिक कामगिरीची पुनरावृत्ती करेल, अशी भारताला आशा आहे. तेथे महिलांनी सुवर्ण आणि पुरुषांनी रौप्यपदक जिंकून इतिहास रचला होता. ज्युडो खेळाडूंनी गेल्या आवृत्तीत तीन पदके मिळवून दिली होती. यंदा तीव्र स्पर्धेतही ही कामगिरी सुधारण्याचा त्यांचा प्रयत्न असेल. याशिवाय, सहा खेळांमध्ये भारताचे पॅरा-खेळाडूही पदकतालिकेत मोलाचे योगदान देतील, अशी अपेक्षा वर्तविण्यात येत आहे.

**महिला बॉक्सिंगपटू लयीत**

बॉक्सिंगमध्ये सर्वांचे लक्ष ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती लवलिना बोरगोहेन (७५ किलो) हिच्यावर असेल. तिच्याकडे नसलेले एकमेव मोठे पदक जिंकण्यासाठी ती रिंगमध्ये उतरेल. ५७ किलो वजनी गटातील विश्वविजेती जॅस्मिन लम्बोरिया बर्मिंगहॅममधील कांस्यपदकाचा रंग बदलण्यास उत्सुक असेल. महिलांच्या स्पर्धेत आशियाई विजेती प्रीती पवार (५४ किलो), साक्षी चौधरी (५१ किलो) आणि अरुंधती चौधरी (७० किलो) यांच्याकडूनही भारताला आशा आहे. पुरुष विभागात नरेंद्र बेरवाल (९० किलोपेक्षा अधिक), विश्वचषक पदकविजेता सचिन सिवाच (६० किलो) यांच्याकडून पदकाची अपेक्षा आहे.

### ॲथलेटिक्समध्ये नीरजकडून अपेक्षा

भारताने ॲथलेटिक्ससाठी कमाल मर्यादेनुसार ३२ सदस्यांचे पथक पाठवले असून, ते २२ पदक स्पर्धांमध्ये भाग घेतील. या पथकाचे नेतृत्व दोन वेळचा ऑलिम्पिक पदकविजेता नीरज चोप्रा करत आहे. यंदा नीरजला सुवर्णपदक मिळवणे सोपे जाणार नाही. श्रीलंकेच्या रुमेश पाथिरागेने गेल्या महिन्यात रोम डायमंड लीगमध्ये ९२.६२ मीटरचा अप्रतिम थ्रो करून विजय मिळवला. त्यामुळे त्याचे तगडे आव्हान नीरजसमोर असेल. ऑलिम्पिक विजेता पाकिस्तानचा अर्शद नदीमही मैदानात असेल. नीरज व्यतिरिक्त भारताला उंच उडीत सर्वेश कुशारे, लांब उडीत मुरली श्रीशंकर, तिहेरी उडीत प्रवीण चित्रवेल, तसेच पुरुष व महिला दोन्ही ४ बाय ४०० मीटर रिले संघांकडून पदकांच्या अपेक्षा असतील. बर्मिंगहॅममध्ये ॲथलेटिक्स पथकाने आठ पदके जिंकली होती. मात्र, यावेळी तगड्या स्पर्धकांमुळे ती कामगिरी गाठणे आव्हानात्मक असेल.

### मीराबाईला हॅट्ट्रिकची आस

राष्ट्रकुल स्पर्धेत भारतासाठी नेहमीच पदकांची लयलूट करणाऱ्या वेटलिफ्टिंगची मदार प्रामुख्याने ऑलिम्पिक रौप्यपदक विजेती मीराबाई चानू हिच्यावर असेल. मणिपूरची ३१ वर्षीय मीराबाई राष्ट्रकुल सुवर्णपदकांची हॅट्ट्रिक करण्याच्या इराद्याने उतरत असून, ती आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची सर्वांत भरवशाची खेळाडू राहिली आहे. तथापि, नुकत्याच झालेल्या उत्तेजक चाचण्यांमध्ये काही राष्ट्रीय खेळाडू दोषी आढळल्यामुळे वेटलिफ्टिंगचे पथक अवघ्या ११ सदस्यांवर आले आहे. त्यामुळे सातत्याने यश मिळवून देणाऱ्या या खेळातील भारताची पदकाची संधी कमी झाली आहे.

---

## निवडक

### ललित मोदी परतणार

**नवी दिल्ली :** आयपीएलचे संस्थापक ललित मोदी १६ वर्षांनंतर भारतात परतण्याच्या तयारीत आहेत. एका अपीलीय न्यायाधिकरणाने १६ जुलै रोजी आयपीएल २००९ च्या दक्षिण आफ्रिकेतील आयोजनाशी संबंधित फेमा प्रकरणात निकाल दिला होता. यात मोदींना दिलासा देत ईडीने लावलेला दंड रद्द केला होता.



निकालानंतर ललित मोदी म्हणाले की, आता त्यांच्या भारत परतण्याचा मार्ग मोकळा झाला आहे आणि ते या वर्षाच्या अखेरीस किंवा पुढील वर्षाच्या सुरुवातीला भारतात परत येऊ शकतात. त्यांनी सांगितले की, त्यांची मुलगी ऑक्टोबरमध्ये बाळाला जन्म देणार आहे, त्यानंतर ते भारतात येण्याची योजना आखत आहेत. हे प्रकरण २००९ मध्ये आयपीएलला भारतातून दक्षिण आफ्रिकेत हलवण्याशी संबंधित आहे. त्यावेळी लोकसभा निवडणुकांमुळे सुरक्षिततेच्या कारणास्तव स्पर्धा भारतातून दक्षिण आफ्रिकेत हलवण्यात आली होती. त्याच्या आयोजनासाठी बीसीसीआयने दक्षिण आफ्रिकेत सुमारे २४३.४५ कोटी रुपये पाठवले होते. नंतर ईडीने आरोप केला की, ही रक्कम भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पूर्वपरवानगीशिवाय परदेशात पाठवण्यात आली, ज्यामुळे फेमाचे उल्लंघन झाले.

### लवलीनाचे पदक पक्के

**नवी दिल्ली :** २०२६ चे राष्ट्रकुल खेळ स्कॉटलंडमधील ग्लासगो येथे आयोजित केले जात आहेत आणि २३ जुलै रोजी होणाऱ्या उद्घाटन सोहळ्यापूर्वी भारताला एक आनंदाची बातमी मिळाली आहे. लव्हलिना बोरगोहेन महिलांच्या ७५ किलो वजनी गटातील बॉक्सिंगमध्ये किमान कांस्यपदक जिंकणार हे निश्चित झाले आहे. खरे तर, ७५ किलो वजनी गटात केवळ पाच महिला बॉक्सर होत्या, त्यापैकी अव्वल तीन खेळाडूंना उपांत्य फेरीत थेट प्रवेश मिळाला आहे, ज्यात लव्हलिना बोरगोहेनचाही समावेश आहे, ज्यामुळे तिचे कांस्यपदक निश्चित झाले आहे.भारतीय स्टार महिला बॉक्सर लव्हलिना बोरगोहेन, जिने ऑलिम्पिकमध्येही



पदक जिंकले आहे, तिचा सामना २०२६ च्या राष्ट्रकुल खेळांच्या उपांत्य फेरीत तुवालूच्या तफाकीशी होईल. महिलांच्या ७५ किलो वजनी गटाचा उपांत्य फेरीचा सामना ३१ जुलै रोजी खेळला जाईल आणि लव्हलिना अंतिम फेरीत पोहोचेल अशी सर्वांना अपेक्षा आहे. जर ती यशस्वी झाली, तर ती निश्चितपणे किमान रौप्यपदक जिंकण्यास पात्र ठरेल.भारतीय संघाकडून यावेळी अधिक चांगल्या कामगिरीची अपेक्षा यावर्षी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत केवळ १० खेळांचा समावेश आहे आणि त्यामुळे पदकांच्या स्पर्धांची संख्याही कमी झाली आहे. पदकांची संख्या वाढवणे हे भारतीय संघासाठी एक मोठे आव्हान असेल. भारताकडून २०२६ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी १२५ खेळाडूंचा संघ पाठवण्यात आला आहे, जो विविध खेळांमध्ये सहभागी होईल.

---

## ‘सुसज्ज सुविधांमुळे भारताला २०३० राष्ट्रकुलचे यजमानपद’

**ग्लासगो :** अहमदाबादमधील सुसज्ज आणि जागतिक दर्जाच्या क्रीडा पायाभूत सुविधांमुळे भारताला २०३०च्या शंभराव्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे यजमानपद मिळाल्याची माहिती राष्ट्रकुल क्रीडा संघटनेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी केटी सॅडलेर यांनी दिली.

गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये भारताला या ऐतिहासिक खेळांचे यजमानपद बहाल करण्यात आले होते. ऑस्ट्रेलियाच्या व्हिक्टोरिया राज्याने वाढत्या खर्चामुळे २०२६ च्या स्पर्धा आयोजनातून माघार घेतली होती. त्यानंतर खर्च आटोक्यात आणण्यासाठी राष्ट्रकुल संघटनेने नवीन धोरण स्वीकारताना क्रीडा प्रकारांची संख्या कमी केली.

राष्ट्रकुल स्पर्धेसाठी भारत आणि नायजेरिया या आमच्या दोन मोठ्या सदस्यांनी स्वारस्य दाखवले होते. भारतात आधीच जागतिक दर्जाच्या क्रीडा सुविधा सज्ज होत्या. त्यामुळे नवीन बांधकामांवर मोठा खर्च करण्याची गरज नव्हती. सरकारची ही गुंतवणूक कौतुकास्पद आहे, असे सॅडलेर म्हणाल्या. २०३०च्या राष्ट्रकुलमध्ये भारताचा पारंपरिक क्रीडा वारसा जगासमोर आणला जाणार आहे. यामध्ये कबड्डी, खो-खो, मल्लखांब आणि योगासन या देशी खेळांचा समावेश करण्याबाबत सध्या गांभीर्याने विचार सुरू आहे.

## वेस्ट इंडीजने शेवटचा सामना जिंकला

### न्यूझीलंडविरुद्ध २-३ ने मालिका गमावली, हेटमायरची अर्धशतकी खेळी

**। ब्रिजटाऊन । वृत्तसंस्था।**

यजमान वेस्ट इंडीजने न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेतील शेवटच्या सामन्यात २ विकेट्सने विजय मिळवला. या विजयानंतरही संघाने ५ सामन्यांची मालिका २-३ ने गमावली. ब्रिजटाउनमध्ये कॅरेबियन संघाने २६९ धावांचे लक्ष्य ४७.३ षटकांत ८ विकेट्स गमावून गाठले.

टॉस हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करणाऱ्या न्यूझीलंडने ५० षटकांत ९ गडी गमावून २६८ धावा केल्या. संघाने १६ धावांवर पहिली विकेट गमावली होती. येथे हेन्री निकोलस १० धावा



करून बाद झाला. त्याला मॅथ्यू फोर्डने बोल्ड केले.५व्या षटकात पहिली विकेट गमावल्यानंतर सलामीवीर विल यंग आणि निक केलीने किवींचा डाव सांभाळला. दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी ९० चेंडूंमध्ये ८६ धावांची भागीदारी केली. ही भागीदारी विटेल लुईसने विल यंगला बोल्ड करून तोडली. विल यंगने ५६ धावा केल्या. यंग बाद झाल्यानंतर केलीने मार्क चॅपमनसोबत डाव पुढे नेला, पण चॅपमन ११ धावा करून बाद झाला. चॅपमन बाद झाल्यानंतर विल यंग ६४ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. मार्क चॅपमन बाद झाल्यानंतर क्रीजवर आलेल्या टॉम लॅथमने न्यूझीलंडची धावसंख्या २०० च्या पुढे नेली. त्याने ६९ धावांची अर्धशतकी खेळी केली. शेवटी कर्णधार मिचेल सँटनर आणि नॅथन स्मिथने ५० षटकांत संघाची धावसंख्या २६८/९ पर्यंत पोहोचवली. विटेल लुईस आणि अल्झारी जोसेफला प्रत्येकी दोन बळी मिळाले. २६९ धावांचे लक्ष्य गाठण्यासाठी मैदानात उतरलेल्या कॅरिबियन सलामीवीरांनी पन्नास धावांची भागीदारी केली. मात्र, ५९ धावांच्या सांघिक धावसंख्येवर ते पॅव्हेलियनमध्ये परतले. एकीम ऑगस्टे ३४ आणि जस्टिन ग्रीव्ह्स २२ धावा काढून बाद झाले. केसी कर्टी २० आणि कर्णधार शाई होप ३९ धावा काढून बाद झाले. एका वेळी संघाची धावसंख्या १२३/४ अशी झाली होती. सुरुवातीचे बळी लवकर गमावल्यानंतर, रदरफोर्डने हेटमायरसोबत मिळून वेस्ट इंडिजला २०० धावांच्या पुढे नेले.

---

## हॉकी विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा

**नवी दिल्ली :** हॉकी विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय हॉकी संघाची घोषणा करण्यात आली आहे. हॉकी इंडियाने या प्रतिष्ठेच्या स्पर्धेसाठी २० सदस्यांच्या मजबूत ताफ्याची निवड केली असून, अनुभवी डिफेंडर आणि स्टार ड्रॅग-फ्लिकर हरमनप्रीत सिंगकडे संघाच्या नेतृत्वाची धुरा सोपवण्यात आली आहे. तर मध्यफळीतील अत्यंत अनुभवी शिलेदार मनप्रीत सिंगकडे मिडफिल्डची महत्त्वपूर्ण जबाबदारी असेल. गेल्या ५० वर्षांपासून हॉकी विश्वचषकाच्या विजेतेपदाची प्रतीक्षा करणाऱ्या भारतीय संघासमोर यंदा नवा इतिहास रचण्याचे मोठे आव्हान असणार आहे. भारताने १९७५ मध्ये पहिल्यांदा आणि शेवटच्या वेळी विश्वचषकावर आपले नाव कोरले होते. त्यानंतर या विजेतेपदाचा दुष्काळ संपवण्याची ही सुवर्णसंधी भारतीय संघाकडे चालून आली आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताला कांस्यपदक मिळवून देणाऱ्या हरमनप्रीतकडून या स्पर्धेतही चमकदार कामगिरीची अपेक्षा आहे.

## डेविड वॉर्नर अडचणीत

- मद्यधुंद अवस्थेत ड्रायव्हिंग प्रकरणात गुन्हा कबूल
- जेलसह कठोर कारवाईची शक्यता

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

ऑस्ट्रेलियाचा माजी क्रिकेटपटू डेव्हिड वॉर्नर पुन्हा एकदा एका मोठ्या वादात सापडला आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाल्यानंतर फ्रँचायझी टी-२० लीगमध्ये खेळण्याचा निर्णय घेतलेला वॉर्नर, २०१६ मध्ये पाकिस्तान सुपर लीगमध्ये खेळत असताना ईस्टरच्या सुट्टीत ऑस्ट्रेलियाला परतला होता. पोलिसांनी त्याला गाडी चालवताना तपासणीसाठी थांबवले असता तो मद्यधुंद अवस्थेत आढळला.

डेव्हिड वॉर्नरने बुधवारी सिडनी न्यायालयामध्ये मद्यपान करून गाडी चालवल्याचा गुन्हा कबूल केला. या प्रकरणी न्यायालय १८ ऑगस्ट रोजी शिक्षा सुनावणार आहे.

ऑस्ट्रेलियाच्या देशांतर्गत टी-२० लीग बिग बॅश (बीबीएल) मध्ये सिडनी थंडर फ्रँचायझीचा कर्णधार असलेला वॉर्नर, न्यायालयीन कामकाजादरम्यान स्वतः हजर नव्हता. त्याऐवजी, त्याचे वकील बॉबी हिल सिडनी न्यायालयामध्ये डेव्हिड वॉर्नरच्या वतीने हजर झाले आणि त्यांनी मद्यपान करून गाडी चालवल्याचा गुन्हा औपचारिकपणे कबूल केला.

पीएसएल २०२६ च्या मध्यावधी सुट्टीदरम्यान डेव्हिड वॉर्नर ईस्टरच्या सुट्टीसाठी घरी परतला होता, जिथे गाडी चालवत असताना त्याला पोलिसांनी थांबवले. वृत्तानुसार, वॉर्नरला २१ जुलै रोजी वेव्हरली स्थानिक न्यायालयात हजर राहण्याची आवश्यकता नव्हती, परंतु त्याचे वकील, बॉबी हिल यांनी सांगितले की, ईस्टरच्या रविवारी मध्यम प्रमाणात मद्यपान करून गाडी चालवल्याच्या आरोपाखाली फलंदाजाने आपला गुन्हा कबूल केला आहे.



हिल यांनी सांगितले की दोन्ही पक्ष वस्तुस्थितीवर चर्चा करत आहेत. ही घटना ५ एप्रिल रोजीची आहे. सिडनीच्या पूर्वे कडील भागात रस्त्याच्या कडेला केलेल्या चाचणीत वॉर्नरच्या शरीरात अल्कोहोल असल्याचे निष्पन्न झाले.

जेव्हा त्याला दुसऱ्या चाचणीसाठी मारुब्रा पोलीस स्टेशनमध्ये नेण्यात आले, तेव्हा त्याच्या रक्तातील अल्कोहोलचे प्रमाण ०.१०४ होते, जे कायदेशीर मर्यादेपेक्षा दुप्पट होते. वॉर्नरला आता १८ ऑगस्ट रोजी शिक्षा सुनावण्यात येईल. त्याला किमान सहा महिन्यांची वाहन चालवण्यावर बंदी, २,२०० ऑस्ट्रेलियन डॉलर्सपर्यंतचा दंड आणि कमाल नऊ महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते.

## सिंधूने पुनरागमनाचे श्रेय दिले विराटला

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दोनवेळा ऑलिम्पिक पदक विजेत्या पीव्ही सिंधूने तिच्या दमदार पुनरागमनाचे श्रेय भारतीय क्रिकेटपटू विराट कोहलीला दिले आहे. तिने २ दिवसांपूर्वी शनिवारी जपान ओपन सुपर-७५० चे विजेतेपद पटकावले. सिंधूने सुमारे २ वर्षांनंतर कोणतेही विजेतेपद जिंकले होते. यापूर्वी ती तिच्या कारकिर्दीतील सर्वात कठीण टप्प्यातून जात होती.

३१ वर्षीय पीव्ही सिंधूने एका सोशल मीडिया पोस्टद्वारे तिच्या पुनरागमनात कोहलीच्या भूमिकेचा खुलासा केला. तिने सांगितले की, कारकिर्दीतील सर्वात कठीण टप्प्यात तिने विराटचा सल्ला घेतला होता आणि त्याच्या एका शिकवणीने तिची संपूर्ण विचारसरणी बदलली.

सिंधूने लिहिले मी सततच्या दुखापती, खराब कामगिरी आणि मानसिक दबावाखाली असताना विराट कोहलीशी संपर्क साधला. कोहलीने काही मिनिटांतच उत्तर दिले आणि दुसऱ्या दिवशी त्यांची भेट घेतली. यावेळी त्यांचे



पती व्यंकट दत्ता साई देखील उपस्थित होते. सिंधू म्हणाली, दुखापतीदरम्यान अनेकदा आत्मविश्वास डगमगला, पण मी स्वतःवरील विश्वास गमावला नाही. जपान ओपनचे हे विजेतेपद केवळ एक ट्रॉफी नाही, तर माझा प्रवास अजून संपलेला नाही, याचा पुरावा आहे.

सिंधू म्हणाली की, त्या भेटीतील चर्चा खाजगी राहील, पण विराटची सर्वात मोठी शिकवण होती की, ट्रॉफीच्या मागे धावण्याऐवजी खेळात पुन्हा आनंद शोधायला हवा. ती म्हणाली की, आता ती सकाळी ५:३० वाजता सरावासाठी ट्रॉफी जिंकण्यासाठी नाही, तर खेळाबद्दलच्या तिच्या आवडीमुळे उठते.या मानसिक बदलामुळे सिंधूने तिच्या खेळात अनेक सुधारणा केल्या.

---

### चौथा भारतीय फलंदाज ठरणार | सहा हजार धावांसाठी १६ धावांची गरज

## अभिषेक शर्मा इतिहास रचण्याच्या उंबरठ्यावर

**। हरारे । वृत्तसंस्था ।**

गुरुवारी (२३ जुलै) हरारे स्पोर्ट्स क्लब येथे पाच सामन्यांच्या टी २० आंतरराष्ट्रीय मालिकेतील पहिल्या सामन्यात जेव्हा भारतीय क्रिकेट संघ झिम्बाब्वेविरुद्ध खेळेल, तेव्हा सर्वांच्या नजरा सलामीवीर अभिषेक शर्मावर असतील. सायंकाळी ४:३० वाजता सुरू होणाऱ्या या सामन्यात, या स्फोटक डावखुऱ्या फलंदाजाला एक असा टप्पा गाठण्याची संधी मिळेल, जो त्याला भारतीय आणि




जागतिक क्रिकेटमधील उच्चभ्रू खेळाडूंच्या प्रतिष्ठित गटात स्थान मिळवून देईल.

सध्या आयसीसी टी आंतरराष्ट्रीय फलंदाजी क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेला, अमृतसरमध्ये जन्मलेला २५ वर्षीय अभिषेक शर्मा, आपल्या टी २० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील एका मोठ्या टप्प्याच्या जवळ पोहोचला आहे. सिकंदर रझाच्या नेतृत्वाखालील झिम्बाब्वे संघाविरुद्धच्या या सामन्यात जर त्याने आणखी फक्त १६ धावा केल्या, तर तो टी २० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ६,००० धावा पूर्ण करेल. जर अभिषेक शर्माने या सामन्यात १६ धावा केल्या, तर तो २०० किंवा त्यापेक्षा कमी डावांमध्ये ६,००० टी-२० धावा पूर्ण करणारा चौथा भारतीय फलंदाज ठरेल. सध्या, अभिषेकने २०३ टी-२० सामन्यांमध्ये १९९ डावांत एकूण ५,९८४ धावा केल्या आहेत. या २०३ सामन्यांपैकी, त्याने ५३ सामने भारतीय राष्ट्रीय संघाकडून खेळले आहेत, सहा सामने झिम्बाब्वेविरुद्ध खेळले आहेत. जर त्याने आपल्या २०० व्या डावात हा पराक्रम केला, तर तो राहुल, विराट आणि गिल यांच्या एलिट यादीत सामील होईल.

## कोल्हापूर येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम उभारले जाणार

- राज्य क्रीडा विभागाबरोबर सामंजस्य करार
- खेळाडूंना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध होणार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

कोल्हापूर येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम उभारण्यासाठी मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री तथा क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या उपस्थितीत जिल्हा क्रिकेट असोसिएशन, कोल्हापूर आणि क्रीडा विभाग यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य करारामुळे भविष्यातील खेळाडूंना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध होणार आहेत.

जागतिक दर्जाच्या सुविधा ही संकल्पना केवळ क्रिकेटपुरती मर्यादित न राहता मल्टी स्पोर्ट्स हब म्हणून विकसित करण्यात येणार आहे. येथे बॉक्सिंग, ज्युडो, आर्चरी, कुस्ती, जलतरण, टेबल टेनिस, फेन्सिंग आदी खेळांसाठी अत्याधुनिक सुविधा निर्माण करण्यात येतील. तसेच क्रिकेट म्युझियम उभारण्यात येणार असून स्थानिकांना रोजगाराच्या नव्या संधीही उपलब्ध होणार आहेत.

करवीर तालुक्यातील मौजे विकासवाडी येथील १२.७६ हेक्टर जागा कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशन यांना आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम व संबंधित क्रीडा पायाभूत सुविधा उभारण्यासाठी हस्तांतरित करण्यात आली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)